**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६८

निर्णय दिनांक १६-०८-२००७

श्री. शंकर मारोती इंगळे, : अपिलार्थी
आनंदनगर चौक,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक पोलीस महानिरीक्षक, (नि. व स.), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
मुंबई

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस महासंचालक,
पोलीस मुख्यालय, मुंबई – ४०० ००१

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शंकर मारोती इंगळे, नांदेड व जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस महासंचालक, मुंबई हे गैरहजर आहेत तर जन माहिती

अधिकारी तथा सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (नि. व स.), मुंबई यांचे वतीने श्री. चंद्रकांत तुकाराम कोत्रे कार्यालय अधीक्षक हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये श्री. वामन ग. कदम या पोलीस उपनिरीक्षकाच्या संदर्भात काही माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. अपिलार्थीने मागणी केलेली या माहितीच्या अर्जामध्ये – " वामन ग. कदम रा. बीड यांनी पोलीस खात्यात नोकरी केलेला कालावधी, त्यांनी राजीनामा दिला किंवा त्यांना बडतर्फ करण्यात आले, व त्यांच्या राजीनाम्याची किंवा बडतर्फीची प्रमाणित प्रत" या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने सदरील माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत अपिलार्थीस कोणताच प्रतिसाद मिळाल्याचे उपरोक्त कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १९-०५-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याविषयी आयोगास विनंती केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाच प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) अन्वये

अनुक्रमे शास्ती लावण्याची व प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दोघेही गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी यांच्या कार्यालयातील कार्यालयीन अधीक्षक श्री. चंद्रकांत तुकाराम कोत्रे यांना अपिलाच्या सुनावणीसाठी पाठविले आहे. या प्रकरणी अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ नुसार कारवाई करुन अपिलार्थीस आपला निर्णय जास्तीत जास्त ३० दिवसाच्या आत कळविणे क्रमप्राप्त होते तथापि त्यांच्या कार्यालया-तील उपलब्ध कागदपत्रावरुन त्यांनी या अर्जाची मुळातच दखल विलंबलाने घेतल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने असे सांगितले की, त्यांना अपिलार्थीने दिनांक ११-०४-२००६ रोजी त्यांच्या कार्यालय प्रमुखास उद्देशून केलेला अर्ज यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक ३१-०५-२००६ रोजी प्राप्त झाला. या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे केलेला अर्ज मुळातच, ज्या कर्मचा-यांनी या अर्जावर त्वरीत कारवाई करणे अभिप्रेत आहे त्यांच्याकडेच एक महिना व २० दिवस इतक्या उशिराने प्राप्त झाल्याचे दिसून येते. यावरुन पोलीस महा संचालकाच्या कार्यालयास माहिती अधिकार कायद्यान्वये प्राप्त झालेल्या अर्जाचे फारसे गांभीर्य वाटत नसावे असे अनुमान काढण्यास हरकत नाही. याच बरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेण्याची त्यांची कृती त्यांच्यातील बेफिकीर व बेजबाबदार वृत्ती दर्शविते असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०८-२००६ रोजी अंतीमतः ती माहिती पुरविल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित अधिका-याने सांगितले. अपिलार्थीने प्रथम अर्ज दिनांक ११-०४-२००६ रोजी केला असल्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी दिनांक १०-०५-

२००६ रोजी अगर तत्पुरर्ती अपिलार्थीस संबंधित अधिका-यांनी देणे क्रमप्राप्त होते तथापि त्यांनी ही माहिती देण्यास विहीत मुदतीपेक्षा ३ महिने ८ दिवस इतका जास्त विलंब लावल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेली माहिती २० वर्षापुर्वीची असल्याने व माहितीचे अभिलेखे वेळेत उपलब्ध न झाल्याने अर्जदार यांना विहीत मुदतीत माहिती देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे, त्यांनी आयोगास दिनांक १३-०८-२००७ रोजी सादर केलेल्या पत्रात मांडले आहे. माहिती जरी २० वर्षापुर्वीची असली तरी आस्थापना विषयक अभिलेखे व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी ही संबंधित कार्यालय प्रमुखाची असते त्यामुळे माहिती देण्यास उशीर झाल्याचे हे कारण आयोगास ग्राह्य धरता येणार नाही.

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी केवळ असमर्थनीय विलंब लावला आहे एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी-च्या प्रथम अपिलाची कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता त्यांच्यातील बेजबाबदार वृत्तीही या ठिकाणी आयोगास दर्शविली आहे. त्यांच्या कार्यशैलीतील अशा प्रकारच्या बेजबाबदार वर्तना-ची दखल पोलीस महासंचालक यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्याच बरोबर या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे सचिव (गृह) यांनी प्रशासकीय कारवाई करुन यासंबंधीचा आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ महिन्याच्या आत पाठवावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगवशात असे आढळून आले आहे की, पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात किमान आवश्यक ते ज्ञान अद्यापही प्राप्त नाही तेव्हा या कायद्यातील कलमांच्या अंमल-बजावणी संदर्भात पोलीस महासंचालक यांनी त्यांच्याकरिता वेळोवेळी कार्यशाळा / शिबिरे आयोजित करावीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या ३ महिने ८ दिवस इतक्या विलंबाबाबत त्यांच्यावर सचिव (गृह) यांनी प्रचलीत सेवा नियमानुसार प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ महिन्याच्या आत पाठवावा.

३. पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयातील कर्मचारी / अधिकां-याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात, पोलीस महासंचालक यांनी त्यांच्या करिता वेळोवेळी कार्यशाळा / शिबिरे आयोजित करावीत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शंकर मारोती इंगळे, आनंदनगर चौक, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (नि. व स.), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, जुने विधान भवन, कुलाबा, मुंबई – ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस महासंचालक, पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, जुने विधान भवन, कुलाबा, मुंबई – ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (गृह), मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ रामाआ/अपील/सिआर/२७७
निर्णय दिनांक १६-०८- २००७.

१. श्री.खंडागळे अर्जुन उमाजी .. अपिलार्थी.
विनायकनगर, मुर्शदपूर आष्टी,
तालूका- आष्टी, जिल्हा-बीड.

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
मुख्याध्यापिका, श्री.ना.दा.ठाकरसी,
बालिका विद्यामंदिर,
५९१, नारायण पेठ,पुणे ४११०३०.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

जिल्हापरिषद, पुणे.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १६-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,श्री.खंडागळे अर्जुन उमाजी (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, श्री.ना.दा.ठाकरसी बालिका विद्यामंदिर,पुणे, श्रीमती.माधुरी सोमवारगीर गोसावी (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, पुणे, श्री प्रकाश मेघःश्याम परब ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २५-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या संस्थेतील शिक्षण सेवक या पदावर भरती प्रकरणी नियुक्तीच्या संदर्भात एकूण ५ मुद्यावर माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये- जनमाहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जाच्या सत्यप्रती, मुलाखतीसाठी बोलाविलेल्या लोकांची यादी, मुलाखत घेतलेल्या वृत्तांताची सत्यप्रत, अंतिमतः नियुक्त झालेल्या उमेदवाराच्या नियुक्तीच्या आदेशाची सत्यप्रत, त्यांच्या जातीची प्रमाणपत्रे व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी मंजूरी दिलेल्या पदासाठीच्या पत्राची सत्यप्रत- या मुद्यांचा समावेश होतो.

सदर माहिती श्री.ना.दा.ठाकरसी बाल विद्यामंदिर, पुणे या शिक्षण संस्थेने दिनांक ०५-०७-२००५ रोजीच्या शिक्षण सेवक या पदाकरिता दिलेल्या जाहिराती संदर्भात होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत डाकेने अपेक्षिली आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे हे पत्र प्राप्त झाल्यानंतर दिनांक- ०६-०५-२००६ रोजी अपिलार्थीस पत्र व २५-०५-२००६ रोजी स्मरणपत्र पाठवून ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये ७५/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याविषयी सूचित केले. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील आवक-जावक रजिष्टरच्या प्रती आयोगास सादर करुन त्यांनी अपिलार्थीस दोन पत्रे पाठविल्याचा पूरावा सादर केला. जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे शुल्क भरण्याच्या या विनंतीनूसार अपिलार्थी यांनी कार्यवाही न करता जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २०-०६-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे. तर अपील करण्याची कारणे, संबंधीत शिक्षण संस्थेने दिनांक- ०५-०७-२००५ च्या जाहिरातीनूसार शिक्षण सेवक म्हणून कोणाला नियुक्ती दिली, हे कळविले नाही, असे दिले आहे. या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २८-०८-२००६ रोजी प्रथम सुनावणी घेतली. तथापि या सुनावाणीमध्ये त्यांनी निश्चीत कोणता निर्णय घेतला, हे कळण्यास मार्ग नाही. कारण या सुनावणीचे आदेश त्यांनी पारीत केले नाहीत. तथापि आज उपस्थित असलेल्या जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, या सुनावणीच्यावेळी त्यांनी, अपिलार्थीस मागितलेल्या तीन मुद्यांवर माहिती दिली आहे. उर्वरीत दोन मुद्दे म्हणजे संस्थेकडे प्राप्त झालेल्या अर्जाच्या सत्यप्रत व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी मंजूरी दिलेल्या पदाच्या पत्राची प्रत, ही माहिती अपिलार्थीस त्या देवू शकल्या नाहीत. कारण या दोन मुद्यावरील माहिती सुनावणीचे वेळी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध होती व ती

माहिती, कार्यालयात येवून घेवून जाण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुचविले होते. तथापि अपिलार्थी हे जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर न राहिल्याने त्यांना ती माहिती प्राप्त होवू शकली नाही.

तथापि जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनूसार दिनांक- २२-०८-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दिनांक- २५-०४-२००६ रोजीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील विहित केलेल्या मुदतीत प्रथमतः प्रतिसाद देवून अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये ७५/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्या विषयी सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने हे शुल्क कोणत्याही प्रकारे जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरता त्यांनी सरळ जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक- २०-०६-२००६ रोजी प्रथम अपील करणे पसंत केले.

अपिलार्थी यांनी, माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये विहित केलेल्या तरतुदीनूसार जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रुपये ७५/- इतके शुल्क या प्रकरणी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे पत्र त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्वरीत भरणे आवश्यक होते. तथापि त्यांनी हे शुल्क न भरता त्यांना हव्या असलेल्या माहितीची मागणी प्रथम व व्दितीय अपीलामध्ये कायम ठेवली आहे. आवश्यक ते शुल्क न भरता वेगवेगळया प्राधिकरणाकडे अपील करुन मोफत माहिती मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला या प्रकरणी दिसून येतो. अपिलार्थीस खरोखरच जर माहितीची आवश्यकता असती तर अपिलार्थी ते शुल्क भरुन

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती ते हस्तगत करु शकले असते. जनमाहिती अधिकारी यांनी आज आयोगास त्यांच्याकडे ती सर्व माहिती उपलब्ध असल्याचे सांगितले. ही माहिती त्यांनी त्यांच्या बरोबर आज सुनावणीच्या वेळी आणली होती. सदर माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस त्यांनी मूळअर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आढळून येते.

अपिलार्थी हे दारिद्रयरेषे खालील नागरीक नाहीत. त्यामूळे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविलेले शुल्क भरणे या प्रकरणी अनिवार्य आहे. तेंव्हा असे आदेशित करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीकडून आवश्यक ते शुल्क आकारुन त्यांनी सदर शुल्क भरल्यानंतर त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## **निर्णय**

१. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद
दिनांक १६-०८-२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.खंडागळे अर्जुन उमाजी, विनायक नगर, मुर्शदपूर, आष्टी, तालूका-आष्टी, जिल्हा-बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,श्री. ना.दा.ठाकरसी बालिका विद्यामंदिर, ५९१, नारायण पेठ, पुणे- ४११०३०, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, पुणे,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५०७

निर्णय दिनांक १६-०८-२००७

श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, : अपिलार्थी

एन-११, के-४०/४, नवजीवन कॉलनी,

हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा कार्यकारी अभियंता,

पाटबंधारे विभाग औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र

विकास प्राधिकरण, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, औरंगाबाद (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग औरंगाबाद श्री. मनोज रघुनाथ अवलगावकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद श्री. कोहिरकर अजय प्रभाकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००२ ते २००६ या कालावधीतील माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये – ‘‘गिरजा प्रकल्पाच्या २००२ ते २००६ पर्यतच्या कालावधीत प्रकल्पावर कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांची संपूर्ण यादी, संबंधित अधिकारी कर्मचारी वर्गाचा नियंत्रण समितीचा तपशील, प्रकल्पावरील रेती किंवा गाळ विक्रीचे आदेश शासनाकडून वाटप केले असल्यास कंत्राटदाराचे नांव व पत्ता, संबंधित करारनाम्याची सत्यप्रत, कार्यक्षेत्र, कार्यकाल व संबंधित नियम, प्रकल्पाच्या नियमांतर्गत असलेला गाळ व रेती विक्री करुन त्यांचा पैसा ज्या खात्यावर जमा केला त्याचा तपशील, प्रकल्पाच्या आसपासच्या शेतक-यांस विहिरी किंवा बोरवेल जमिनीत करण्याचा अधिकार

शासनाने केला असल्यास त्याची सत्यप्रत, विहिरींची संख्या, परवानगी दिलेल्या विहिरीचीं व बोअरची संख्या, त्यांना परवानगी देणा-या अधिका-याचे नाव व पत्ता व नियमाप्रमाणे ठरवलेल्या अंतरावर विहिरी व बोअरवेलधारकाचे नांव व पत्ता" – या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने सदरील माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास प्रथम प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०६-२००६ चे पत्रान्वये देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये सदर माहिती उपलब्ध असून अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे ती त्यांच्या कार्यालयातून व्यक्तिशः घेऊन जाण्यास सूचित केले. तदनंतर अपिलार्थी यांनी दिनांक २८-०६-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून सदर माहिती प्राप्त करुन घेतली. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः प्राप्त करुन घेतल्याचे त्यांनी दिलेल्या याच पत्रावरील पोचपावतीत म्हटले आहे. याच पोच पावतीमध्ये अपिलार्थीने ही माहिती अपूर्ण असल्याचे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १६-०६-२००६ चे पत्रान्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची दिनांक १७-०७-२००६ रोजी सुनावणी घेऊन दिनांक २६-०७-२००६ रोजी अंतीम आदेश पारीत केले.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवरही समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक २९-०९-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधित जन माहिती

अधिका-याने त्यांना अपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिन रुपये २५० इतकी शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविलेल्या माहितीप्रमाणे गिरजा प्रकल्प विभागातर्फे फक्त एकाच विहिरीकरिता १९९५ मध्ये तत्कालीन अधीक्षक अभियंता पाटबंधारे मंडळ यांच्या मार्फत परवानगी दिली आहे तर अपिलार्थीस दिल्या गेलेल्या विहिरीच्या यादीमध्ये एकूण २३ विहिरींचा तपशील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेला आहे. याचा अर्थ २२ विहिरी या एक तर महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ आस्तित्वात येण्यापुर्वीच्या असल्या पाहिजे किंवा त्या बेकायदेशीररित्या खणल्या गेल्या असल्या पाहिजेत.याच बरोबर अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, गिरजा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रमध्ये आजपावेतो किमान २५० अनाधिकृत खणलेल्या विहिरी व बोअरवेल आस्तित्वात आहेत. यापैकी काही बोअर-वेल्स धरणाच्या ५० ते १०० मिटरवर घेतल्या आहेत. अपिलार्थीस जरी जन माहिती अधिकारी यांची बोअरवेल धरणापासून किमान अंतर २०० मीटर असे कळविले असले तरी २०० मीटरपेक्षा कमी क्षेत्रामध्ये ब-याच विहिरी आज रोजी आस्तित्वात असून संबंधित शेतक-यांनी महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ मधील कलम १०५ (१) चा भंग केला आहे. गिरजा लाभक्षेत्रातील असलेल्या अवैध बोअरवेलची माहिती लेखी देण्यास ते आजही तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी माहिती देण्याकरिता २ महिने २३ दिवस इतका विलंब लावल्याचे दिसून येते. उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपिलार्थीने ज्यावेळी ही माहिती मागविली त्यावेळचे कार्यकारी अभियंता यांची दिनांक २०-०५-२००६ रोजी बदली झाली व त्यांनी या पदाचा कार्यभार स्विकारल्या-नंतर त्यांनी लगेच अपिलार्थीस दिनांक १५-०६-२००६ रोजी पैसे भरण्याचे सूचित केले व

दिनांक २८-०६-२००६ रोजी त्यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध कागदपत्रावरुन पुरविली. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केलेला मुद्दा विचारात घेतला असता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती, देण्यापोटी ३० दिवसाहून जास्त कालावधी लावून आपल्या कर्तव्यात कसूर केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे त्यामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे सचिव (जलसंपदा) यांनी यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास २ महिन्याच्या आत सादर करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस ही माहिती अपूर्ण असल्याचे का वाटते हे विचारले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना प्राप्त झालेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २, ५ च्या संदर्भातील माहिती त्यांना अपुरी मिळाल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ चे स्वरुप पाहता अपिलार्थीने विचारल्याप्रमाणे कोणतेही तत्सम प्राधिकरण अथवा नियंत्रण समिती जलसंपदा खात्यात आस्तित्वात नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी स्पष्ट केले आहे. तर ज्या अधिका-यांनी बोअरवेल व विहिरींना परवानगी दिली आहे त्या अधिका-याचे नाव अपिलार्थीने विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी संबंधित अधिका-याचा फक्त हुद्दा कळविला आहे. त्यामुळे अपिलार्थीस फक्त मुद्दा क्रमांक ५ वर त्यांना अंशतः अपूर्ण माहिती मिळाली हा त्यांचा युक्तिवाद या मर्यादेपर्यतच मान्य करण्यात येतो.

अपिलार्थीने अवैध विहिरी व बोअरवेलच्या संबंधी जे मुद्दे आयोगासमोर मांडले ते या टप्प्यावर विचारात घेणे आयोगास आवश्यक वाटते. धरणाच्या लाभक्षेत्रात अवैधरित्या बोअरवेल अथवा विहिरी खणून महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ मधील तरतुदींचा जर भंग होत असेल तर या प्रकरणी संबंधित मुख्य अभियंता यांनी त्वरेने लक्ष पुरविणे गरजेचे आहे असे आयोगाचे मत आहे. त्या दृष्टीने त्यांना असे सूचविण्यात येते की अपिलार्थीकडून

गिरजा मध्यम प्रकल्प लाभक्षेत्रातील अवैध विहिरी / बोअरवेल यांची माहिती त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या प्रकरणी चौकशी करावी आणि नियमांचा भंग होण्यास जे पाटबंधारे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन अवैध बोअरवेल / विहिरी यांच्याबाबत आपल्या स्तरावर पुढील निर्णय घ्यावा. त्यांनी केलेल्या या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमित झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पाश्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येते.

**<u>निर्णय</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येते.

२. अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती न दिल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांच्यावर सचिव जलसंपदा यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा.

३. अपिलार्थीकडून अवैध बोअरवेलची / विहिरीच्या संदर्भात माहिती प्राप्त झाल्यानंतर मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, गारखेडा, औरंगाबाद यांनी या प्रकरणातील चौकशी करुन संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करुन अवैध बोअरवेल / विहिरीसंदर्भात आपला निर्णय घ्यावा, त्यांनी हे आदेश पारीत झाल्या पासून २ महिन्याच्या आत आपला अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक     १६ ऑगस्ट २००७          राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, एन-११, के-४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, गारखेडा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ रामाआ/अपील/सिआर/५०८

निर्णय दिनांक १६-०८- २००७.

१. श्री.कल्याण सोपानराव सोनवणे, .. अपिलार्थी.
एन-११, हडको, औरंगाबाद.

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
महिला व बाल कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १६-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,श्री. कल्याण सोपानराव सोनवणे (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा महिला व बाल कल्याण अधिकारी, जिल्हापरिषद, औरंगाबाद, यांचे प्रतिनिधी श्री.सुनिल दिनकरराव खडके, वरिष्ठ-लिपीक (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, औरंगाबाद,श्री.विवेकानंद विश्वंभर गुजर ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०४-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या खात्याशी संबंधित एकूण ४ मुद्यावर माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- औरंगाबाद जिल्हयातील महिला व बालकल्याण विभागामार्फत वाटप केलेल्या लाभार्थ्यांची व इतर तपशीलवार माहिती सत्यप्रतीसह, शिलाई मशीन, पिठाची गिरणी, मळणी यंत्र, टिन-पत्रे, विद्युत मोटार,

पाईप, कांडप यंत्र, ऑईल इंजिन, पावर स्प्रे, लेडीज सायकल, शेळी पालन, गाय पालन, इत्यादी केलेल्या वाटपाची तपशीलवार सत्यप्रत, ज्यांना वाटप केले आहे अशा लाभार्थ्याची गावनिहाय नावे व पत्ते व या कामी शासनाने मंजूर केलेले अनुदान व त्यावर झालेला खर्च- या मुद्यांचा समावेश होतो.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- १८-०७-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जिल्हास्तरावरील माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रुपये ५५८/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सुचविले. तर पंचायत समितीच्या स्तरावरील माहिती गटविकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचविले. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. सदर पत्र अंडर पोस्टींग सर्टीफिकेट व्दारे दिनांक-२१-०७-२००६ रोजी पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास सांगून पोस्टाची पावती आयोगास दाखविली. अपिलार्थीस पंचायत समिती स्तरावरील माहिती देण्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी सर्व गटविकास अधिका-यांना दिलेली वेगवेगळी पत्रे दिनांक- ३०-०७-२००६ रोजी पाठविल्याचे अभिलेख जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केले. या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिल्या असल्याचे त्यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीवरुन दिसून येते.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने दिनांक-२१-०८-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले.

या अपीलाची सुनावणी दिनांक- ०६-०९-२००६ रोजी घेवून जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली सर्व माहिती, जनमाहिती अधिकारी यांना देण्याचे दिनांक-१४-०९-२००६ रोजी सुनावणी निर्णयात आदेशीत केले.

जनअपिलीय अधिकारी यांनी आदेश देवूनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार दिनांक- २९-०९-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवून त्यांना विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल संबंधित जनमाहिती अधिकारी यांना प्रतिदिन २५०/-रुपये इतकी शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद मांडला की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ते शुल्क भरण्याच्या सूचना देणारे पत्र प्राप्त झाले नाही. त्याचबरोबर सदर पत्र अपिलार्थीस अंडर पोस्टींग सर्टीफिकेट व्दारे पाठविल्याचा मुद्दा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर प्रथमतः उपस्थित केला आहे. त्यांनी हा मुद्दा जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम सुनावणीच्या वेळेस उपस्थित केला नव्हता. असे अपिलार्थीचे म्हणणे त्यांनी आज मांडून अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रा बाबत शंका व्यक्त केली आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती घेवून जाण्या संदर्भात अधिनियमातील विहित तरतूदीच्या आत अंडर पोस्टींग सर्टीफिकेट व्दारे पत्र पाठविले व ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये ५५८/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. अपिलार्थीस ही माहिती न देण्यामध्ये त्यांचा कोणताही असद्हेतू नव्हता. अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती त्यांच्याकडे आजरोजी अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहे.

या प्रकरणी त्यांनी दिनांक- २१-०९-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये देखील, अपिलार्थीस ही माहिती तयार असल्याचे व या माहितीपोटी लागणारे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरल्यास ही माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याचे आश्वासीत केले आहे. दोन्हीही

बाजूने आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडे अंडर पोस्टींग सर्टीफिकेट व्दारे वेळेत पत्रव्यवहार केला आहे व अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क भरुन माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. तर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना सदर पत्र प्राप्त झाले नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर जी कागदपत्रे नव्याने सादर केली आहेत. याबद्दल त्यांना शंका आहे.

या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पंचायत समिती स्तरावरील माहिती संबंधित गटविकास अधिकारी यांच्याकडून घेण्याचे सूचित केले आहे. जनमाहिती अधिकारी यांची ही सूचना बरोबर नाही. कारण जनमाहिती अधिकारी व गटविकास अधिकारी हे एकाच प्राधिकरणाचे दोन वेगवेगळे घटक आहेत. त्याचबरोबर या योजनाकरिता लागणारा निधी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे संबंधित गटविकास अधिका-यांना पुरविला जातो. ही वस्तुस्थिती पहाता दिलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीचा विनियोग कशा प्रकारे होतो व त्यातून काय लक्ष्य साध्य होते हे पहाण्याची जबाबदारी जनमाहिती अधिकारी यांची आहे, हे निश्चीत त्यामूळे अपिलार्थीने जरी पंचायत समिती स्तरावरील माहिती मागविली असेल तरी जनमाहिती अधिकारी यांनी सर्व संबंधित पंचायत समिती कार्यालयाकडून मागवून घेवून ती एकत्रीत करावी व अशा त-हेने पंचायत समिती स्तरावरील व जिल्हा स्तरावरील अशी एकत्र माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून पंधरा दिवसाचे आत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी, असे आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती उपलब्ध होवू न देण्यामागे जनमाहिती अधिकारी यांचा हेतुपुरःसर परस्पर टाळाटाळ करण्याचा अथवा इतर कोणताही असद्हेतू असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्यामूळे जनमाहिती अधिकारी

यांचेवर शास्तीचे आदेश नाहीत. तथापि त्यांनी यापूढे अशा प्रकारे प्राप्त होणा-या अर्जावर अधिक सतर्कतेने कार्यवाही करावी, अशा त्यांना सूचना देण्यात येत आहेत.

प्रसंगावशात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, औरंगाबाद यांना सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती प्रमाणे इतर योजना संदर्भातील माहिती, वेळोवेळी जनसामान्या कडून त्यांना यापूढे विचारली जाण्याची शक्यता लक्षात घेवून त्यांनी जिल्हापरिषदेच्या संकेतस्थळावर अशा प्रकारच्या सर्व योजनांची माहिती अशा प्रकारचे निर्णय झाल्यानंतर लागलीच त्यांनी लाभार्थ्यांच्या यादीसह, प्रसिध्द करावा. जेणेकरुन जिल्हापरिषदेच्या कारभारामध्ये त्यांना अधिक पारदर्शकता आणणे सहज शक्य होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

३. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने त्यांच्या मूळअर्जा व्दारे मागणी केलेली सर्व माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद
दिनांक १६-०८-२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.कल्याण सोपानराव सोनवणे, एन-११, हडको, औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा महिला व बालकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५०९

निर्णय दिनांक १६-०८-२००७

श्री. शरच्चंद्र माधव पंडित, : अपिलार्थी

एन ३, प्लॉट नं. ७४, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शरच्चंद्र माधव पंडित, औरंगाबाद हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम), औरंगाबाद श्री. विठ्ठल गंगारामजी बोडखे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद श्री. अर्जून रोहिदास बनसोडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दैनिक सकाळ दिनांक १०-०९-२००६ रोजीच्या आवृत्तीमध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीसंदर्भात - सन २००२ ते २००५ या ३ वर्षाच्या कालावधीमधील खालील प्रमाणे माहिती विचारली होती.

> " आलेल्या - खर्च झालेल्या - व रिकाम्या डब्यांचा ताळमेळ लागला किंवा नाही याची सखोल माहिती द्यावी व संबंधिताचे एम. एस. ए व आर. एम. आर. देण्यात यावा. (व्यवहार झालेल्या महिन्याचेच)"

अपिलार्थीने सदरील माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

विहीत मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नाही म्हणून अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०१-

२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०२-२००७ रोजी घेऊन सुनावणी आदेश दिनांक २१-०२-२००७ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची तयारी दर्शविल्यामुळे अपिलार्थीस १५ दिवसात माहिती देण्याचे त्यांना सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त होऊनही माहिती दिली नाही त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडला गेला की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २१-०२-२००७ च्या पत्रामध्ये सूचित केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०६-२००७ रोजी सदर प्रकरणी काही अनियमितता झाली असल्यामुळे त्याची खात्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे. सदर चौकशी अद्याप अपुर्ण आहे चौकशी पूर्ण झाल्यानंतर आपणास माहिती पुरविण्यात येईल अशा अर्थाचे पत्र लिहिले आहे. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक १९-०६-२००७ रोजी प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये सांगितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः ज्या आर. एम. आर. व एम. एस. ए ची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती त्या आर. एम. आर. व एम. एस. ए च्या प्रती अपिलार्थीस विहीत

मुदतीत पुरविण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण नव्हती कारण सार्वजनिक बांधकाम विभागातील प्रत्येक विभागाचे जे मासिक लेखे महालेखापाल यांना दरमहा सादर केले जातात त्यामध्ये विभागाच्या आर. एम. आर. व एम. एस. ए यांचा समावेश असतो ही माहिती नव्याने तयार करावयाची नव्हती. असे असतांनाही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती पुरविली नसल्याचे सिध्द झाले आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या दिनांक ०९-०२-२००७ च्या सुनावणीमध्ये देखील अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०९-०२-२००७ रोजी देण्याचे कबूल केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी आदेशामध्ये देखील तसा स्पष्ट उल्लेख केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे कबूल करुनही अपिलार्थीस कबूल केलेल्या कालावधीमध्ये माहिती दिली नाही हे या प्रकरणी अशा प्रकारे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेल्या विसंगत भुमिकेमुळे अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेण्यास वंचित राहिले असे सिध्द होत आहे. या प्रकरणाची जर उच्च स्तरीय चौकशी चालू असेल तर ज्या कागदपत्रावर ही चौकशी होणे आहे किंवा चालू आहे अशी कागदपत्रे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यास काही हरकत नाही असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने चालू असलेल्या चौकशी प्रक्रियेसंदर्भात कोणतीही माहिती विचारल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या विसंगत भुमिकेमुळे त्यांना मिळू शकली नाही हे निःसंशयपणे सिध्द होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल - माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) प्रमाणे त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमानुसार सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी

मागितलेली आर. एम. आर. व एम. एस. ए संदर्भात मागितलेली माहिती त्यांना १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येते.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येते.

२. सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली आर. एम. आर. व एम. एस. ए संदर्भात मागितलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास २ महिन्यात सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शरच्चंद्र माधव पंडित, एन ३, प्लॉट नं. ७४, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३०७

निर्णय दिनांक १७-०८-२००७

सौ. नुझहत पिता महेबुबखान, : अपिलार्थी

घर नं. ६८७, विद्यानगर, परभणी

जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),

जिल्हा परिषद, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, परभणी

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सौ. नुझहत पिता महेबुब खान, परभणी (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), श्री. म्हातारदेव किसन खांदवे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. ज्ञानेश दगडू शिंदे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-०६-२००६ च्या अर्जान्वये, फैजूल उलूम प्राथमिक शाळा परभणी यांच्या कारभाराबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तथा शासकीय माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ४४ मुद्दयांवर माहिती मागविली होती.

या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०६-०७-२००६ रोजी परत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद परभणी यांच्याकडेच प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी आज आयोगास सांगितले. तथापि या अपील अर्जावर जिल्हा परिषद परभणी यांच्या सामान्य प्रशासन विभागाची दिनांक ०६-०७-२००६ ची पोहोच आहे. याच बरोबर उपस्थित असलेले मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी सुध्दा त्यांच्या कार्यालयात बराच शोध घेऊनही त्यांना हे अपील प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद या दोघांनीही त्यांच्याकडे सदर अपील प्राप्त न झाल्याचे शपथपत्रावर लिहून दिले आहे.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठी व विस्तृत स्वरुपाची आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आवश्यक आहे असे आयोगास वाटते तेव्हा या प्रकरणी अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेशी संपर्क साधून आवश्यक माहिती मिळण्विण्याचा प्रयत्न करुन त्यांच्याकडून या प्रकरणी निर्णय प्राप्त करुन घ्यावा. जन अपिलीय अधिका-याकडून प्राप्त होणा-या या निर्णयावर त्यांचे समाधान न झाल्यास त्या राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ सौ. नुझहत पिता महेबुबखान, घर नं. ६८७, विद्यानगर, परभणी जिल्हा परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

परभणी  यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ रामाआ/अपील/सिआर/३२०
निर्णय दिनांक    १७-०८- २००७.

१. श्री.अजित एम.देशमुख, .. अपिलार्थी.
व्दारा/- गजानन किराणा स्टोअर्स,
कारंजा रोड, बीड.

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
उप जिल्हा निवडणूक अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
जिल्हाधिकारी, हिंगोली.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १७-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,श्री. अजित एम.देशमुख (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा  उप जिल्हा

निवडणूक अधिकारी, श्री.सुभाष नामदेव शिंदे (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,हिंगोली, श्री.नामदेव किशनराव जोगदंड ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २७-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे हिंगोली जिल्हयातील सार्वत्रिक निवडणूकीच्या खर्चावरील ऑडिट रिपोर्टच्या संदर्भात सन १९९९ ते २००६ साला पर्यंतच्या कालावधीतील खालीलप्रमाणे एकूण ५ मुद्यांवर माहिती मागविली होती.

“१. सन १९९९-२००० या वर्षी हिंगोली जिल्हा अस्तित्वात आल्यानंतर प्रथमतः या जिल्हयात झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या ऑडीट रिपोर्टची संपूर्ण प्रत त्यात ऑडीटर यांनी काढलेल्या आक्षेपांसह द्यावी.

२. या निवडणूकी संदर्भात नागपूर येथील A.G. कार्यालयाने जवळपास एक कोटी रु.चा अवास्तव खर्च केला असा आक्षेप घेतला होता. त्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.कुलकर्णी यांनी सन २००२ मध्ये ही रक्कम वसूलपात्र असून तो खर्च झालेला निधी टाळता येण्याजोगा होता असे शासनास व संबंधीतास कळविले होते. म्हणजेच वसूली योग्य कार्यवाहीची शिफारस केली होती. या पाठविलेल्या अहवालाची प्रत द्यावी.

३. जून, २००३ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.सिंघल यांनी श्री.कुलकर्णी यांचा अहवाल खोडून निधी योग्य ठिकाणी खर्च झाल्याचा अहवाल पाठविला. हा अहवाल कोणत्या शासन आदेशाने पाठविला, पाठविण्याची सूचना कोणी दिली त्या आदेशाची / सूचनेची आणि या अहवालाची अशा दोन्ही प्रती द्याव्यात.

४. याबाबत २००४ मध्ये पाठविलेल्या अहवालाचीही प्रत द्यावी.

५. सन २००४ च्या निवडणूकीच्या ऑडीट रिपोर्टची प्रतही द्यावी. यावर A.G.नागपूर यांनी काही मत व्यक्त केले असेल / आक्षेप घेतले असतील तर त्याचीही प्रत द्यावी.

वरील माहिती अपिलार्थीने टपालाने अपेक्षिली होती. अपिलार्थीचा सदर अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- २९-०४-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी त्यानंतर दिनांक- २६-०५-२००६ रोजी तयार करुन ठेवली होती व अपिलार्थीस त्याप्रमाणे कळवून ही माहिती अपिलार्थीस देण्यापोटी लागणारे एकूण शुल्क म्हणून रक्कम रुपये १३०/- त्यांच्या कार्यालयात भरण्या बाबत जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- २६-०५-२००६ च्या पत्राव्दारे कळविण्यात आले.

तदनंतर अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे १३०/- रुपयाची मनिऑर्डर केली व ती जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक-१२-०६-२००६ रोजी प्राप्त झाली. दिनांक १२-०६-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी हे अर्जीतरजेवर होते. त्यांनी दिनांक-०७-०६-२००६ ते १९-०६-२००६ अशी एकुण १२ दिवसाची अर्जीतरजा घेतली होती.

अपिलार्थीने आवश्यक त्या रक्कमेचा भरणा जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात मनिऑर्डरने केला व नंतर दिनांक- २६-०६-२००६ रोजी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी

यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक-१४-०६-२००६ रोजी सुनावणी घेवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनूसार दिनांक-११-०८-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना १५ दिवसाच्या विलंबाने माहिती दिलेली असून त्यामूळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० (१) अन्वये प्रतिदिन २५०/- रुपये इतकी शास्ती त्यांच्यावर लावण्याची व कलम २० (२) मधील तरतुदीनूसार त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडला गेला की, अपिलार्थीचा अर्ज त्यांना दिनांक- २९-०४-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीस मागितलेली माहिती ५ वर्षातील कालावधीची व जुनी असल्यामूळे व निवडणूक शाखेत कर्मचारी नसल्यामूळे ही माहिती तयार करण्यास त्यांना दिनांक- २६-०५-२००६ पर्यंतचा कालावधी लागला. माहिती तयार झाल्यानंतर त्यांनी लागलीच अपिलार्थीस दिनांक- २६-०५-२००६ रोजी ही माहिती तयार असल्याचे व माहिती प्राप्त करण्याप्रित्यर्थ लागणारे शुल्क १३०/-रुपये त्यांचे कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस त्याचदिवशी सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर रक्कम त्यांच्या कार्यालयामध्ये दिनांक- १२-०६-२००६ रोजी मनिऑर्डर व्दारे भरली. ज्यावेळी ही रक्कम जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरली त्यावेळी जनमाहिती अधिकारी हे मंजूर अर्जीत रजेवर गेले होते. या कालावधीमध्ये त्यांच्या पदाचा कार्यभार कोणाकडेहि सोपाविला गेला नव्हता. जनमाहिती अधिकारी हे तदनंतर दिनांक- १९-

०६-२००६ रोजी कामावर रुजू झाले. त्यावेळी त्यांना अपिलार्थीने सदर रक्कमेचा भरणा केल्याची माहिती नव्हती. तथापि तदनंतर संबंधित लिपीकाने जनमाहिती अधिकारी यांना दिनांक- २५-०६-२००६ रोजी अपिलार्थीकडून ही रक्कम प्राप्त झाल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी लागलीच अपिलार्थीस दिनांक- २७-०६-२००६ रोजी ही माहिती पाठविली. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये कबूल केले आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलातील मुद्या क्रमांक-५ मध्ये आयोगापुढे असे प्रतिपादन केले आहे की, पैसे भरुन घेवून माहिती देण्यास जनमाहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक विलंब केला आहे. त्याचबरोबर तयार असलेल्या माहितीची फी किती होती, हे देखील अर्ज दाखल केल्यानंतर उशिराने कळविले. यावरुन जनमाहिती अधिकारी हे माहिती देण्याबाबत किती उदासीन आहे, हे स्पष्ट हेते व माहिती अधिका-याने उशिराने माहिती देण्याची कृती ही जाणीवपूर्वक माहिती  टाळण्याच्या उद्देशाने केलेली आहे.

अपिलार्थीच्या वरील मुद्याशी राज्य माहिती आयोगास सहमती दर्शविता येणार नाही. कारण या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी कुठेहि अपिलार्थीस  माहिती नाकारण्याच्या दृष्टीने वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती ५ वर्षाची व  त्यांच्या हाताखाली पुरेसे कर्मचारी नसल्यामूळे, (अपिलार्थीस मागितलेली माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे या कालावधीत फक्त एकच कनिष्ठ लिपीक प्रतिनियुक्तीवर कामाला होता.) त्यांना ही माहिती तयार करण्यास सुमारे ३ आठवडे इतका कालावधी लागला व माहिती तयार झाल्यानंतर त्यांनी लागलीच अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क भरण्याचे दुस-या दिवशी सूचित केले. यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी पासून माहिती मुद्दामहून दडवून ठेवल्याचे सिध्द होत नाही. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी

यांच्याकडून पत्र प्राप्त झाल्यानंतर सुमारे १७ दिवसाने आवश्यक ते शुल्क जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले आहे. शुल्क भरण्याच्या वेळी जनमाहिती अधिकारी हे मंजूर अर्जीतरजेवर होते. हे पहाता, अपिलार्थीस माहिती न देण्यामागे जनमाहिती अधिकारी यांचा कोणताही असद्‌हेतू होता किंवा त्यांच्याकडून ही माहिती देण्यासाठी टाळाटाळ झाली असे सिध्द होत नाही. अपिलार्थीस माहिती उपलब्ध न होण्याची कारणे जनमाहिती अधिकारी यांच्या नियंत्रणा बाहेरची असल्यामूळे अपिलार्थीस माहिती उपलब्ध होवू शकली नाही. हे एवढे अपिलार्थीस माहिती न पुरविण्याचे हे एकच कारण दिसून येते. यामध्ये जनमाहिती अधिकारी हे निसंशयःपणे दोषी असल्याचे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीने व्दितीय अपीलामध्ये उल्लेख केलेल्या जनमाहिती अधिका-यास शास्ती लावण्याचा अथवा त्यांचेवर विभागीय चौकशीची शिफारस करण्या संदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

तथापि जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार त्यांच्याकडे येणा-या माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त अर्जावर ते कार्यालयात गैरहजर असले तरिही भविष्यात या संदर्भात त्यांचे कार्यालयाकडून त्वरित कार्यवाही केली जाईल, अशी कार्यपध्दती अंमलात आणावी. असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या निमीत्ताने महसूल विभागाने जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अपु-या कर्मचारीवृंदाच्या जागा भरण्याबाबत तातडीने पावले उचलावीत, म्हणजे एखादा अधिकारी रजेवर गेल्यास कार्यालयाचे नियमीत काम थांबणार नाही व जनसामान्यास आवश्यक ती माहिती मिळणे सूकर होईल, असे आयुक्त, औरंगाबाद यांना सुचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

४. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक १७-०८-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.अजित एम.देशमुख, व्दारा/- गजानन किराणा स्टोअर्स, कांरजा रोड,बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, हिंगोली, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३२६

निर्णय दिनांक १७-०८-२००७

श्री. अजित एम. देशमुख, : अपिलार्थी
व्दारा गजानन किराणा स्टोअर्स,
कारंजा रोड, बीड जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्य रचनाकार,
पिंपरी चिंचवड नव नगर विकास प्राधिकरण
सेक्टर – २४, निगडी, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अध्यक्ष पिंपरी चिंचवड नव नगर विकास
प्राधिकरण सेक्टर – २४, निगडी, पुणे

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अजित एम. देशमुख, बीड हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्य रचनाकार, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण श्री. अनिल शंकर काळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचे प्रतिनिधी श्री. सुगंध उमाप सहाय्यक अधीक्षक हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १७-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिलेल्या दिनांक १८-११-२००५, १७-१२-२००५ व ०६-०३-२००६ च्या निवेदनासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे ५ मुद्दयावर मागितली होती.

"१. मी उपरोक्त तीन निवेदने सादर केल्यानंतर आपण त्यावर केलेल्या सर्व आदेशांच्या, कार्यवाहीच्या तसेच यावर लिहिलेल्या टिपणी व रोजनाम्याची सत्यप्रत द्यावी,

२. प्राधिकरणाचे एकूण क्षेत्र किती होते, त्यापैकी विक्री केलेले किती व सद्या शिल्लक किती आहे याची सविस्तर माहिती,

३. गत एक वर्षात एक जानेवारी २००५ ते आजपर्यत किती क्षेत्र विक्री केले व त्यातून प्राधिकरणास किती रुपयाची प्राप्ती झाली याची सविस्तर माहिती,

४. प्राधिकरण सभा क्रमांक २१९ दिनांक १०-१२-२००१ ची विषयपत्रिका, नोटीसबुकची प्रत सभेच्या संपूर्ण ठरावाची सविस्तर प्रत द्यावी,

५. भूखंड वाटप नियम १९७३ व विकास नियंत्रण नियमावली १९७३ ची सत्यप्रत द्यावी."

वरील माहिती अपिलार्थीने टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास प्रतिसाद म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००६ चे पत्रान्वये फक्त मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या या माहितीमध्ये अपिलार्थीने विचारलेल्या उर्वरीत मुद्यावरील माहितीसंदर्भात कोणतेही भाष्य केलेले नाही.

जन माहिती अधिका-याकडून अशा प्रकारे मिळालेल्या अर्धवट माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (१) चे तरतुदी अन्वये प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) नुसार कारवाई करण्याची विनंती करुन आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०७-२००६ रोजी घेऊन आपला निर्णय पारीत केला तथापि ही सुनावणी घेण्यापुर्वीच दिनांक १७-०६-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पाठविली होती त्यामुळे हा मुद्दा लक्षात घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) चे तरतुदी अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिका-यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने माहितीची मागणी केलेल्या प्रथम अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसात निर्णय घेऊन त्याप्रमाणे अपिलार्थीस कळवावयास हवे होते. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या अर्जास प्रथम प्रतिसाद

दिनांक १०-०४-२००६ रोजी म्हणजे विहीत मुदतीत दिला. त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०४-२००६ रोजी एकूण ५ मुद्दयापैकी फक्त एकाच मुद्दयावर माहिती दिली. उर्वरीत मुद्दयावरील माहिती संदर्भात या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी काहीही भाष्य केलेले नाही. तदनंतर त्यांनी अपिलार्थीस थेट दिनांक १७ जून २००६ रोजी उर्वरीत मुद्दयावर माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस अश त-हेने प्राप्त झालेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहीत केलेल्या तरतुदीपेक्षा २ महिने इतक्या उशिराने प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे ही माहिती उशिरा देण्याच्या समर्थनाप्रित्यर्थ असा युक्तिवाद मांडला गेला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील वेगवेगळ्या शाखाशी संबंधीत होती त्यामुळे संबंधित शाखेकडून ही माहिती गोळा करुन नंतर ती अपिलार्थीस पुरविण्यास विलंब झाला. या व्यतिरिक्त दुसरी कोणती कारणे अपिलार्थीस माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याकरिता होती याची विचारणा केली असता या व्यतिरिक्त दुसरे कोणतेही कारण नव्हते असे त्यांनी आयोगासोर सांगितले. थोडक्यात अपिलार्थीस माहिती देण्यास नियमातील विहीत कालावधीपेक्षा जो जास्तीचा विलंब झाला आहे त्याप्रित्यर्थ त्यांच्याकडे कोणतेही समर्थन नव्हते, म्हणजेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेला विलंब असमर्थनीय होता असे निःसंशय सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार या नियमांच्या उल्लंघनाच्या प्रयोजनार्थ जन माहिती अधिका-यास माहिती देण्यास कार्यालयातील जे इतर कर्मचारी / अधिकारी जबाबदार आहेत त्यांनाही जन माहिती अधिकारी असे समजावे असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणात त्यांना ज्या ज्या कर्मचा-यांकडून विहित मुदतीपेक्षा उशिरा माहिती प्राप्त झाली त्या

सर्व कर्मचा-यांना, अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांच्यावर प्रतिदिन रुपये २५० प्रमाणे एकूण ६२ दिवसाच्या विलंबाबाबत रुपये १५५०० ( रुपये पंधरा हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची जन माहिती अधिकारी निहाय विभागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नव नगर विकास प्राधिकरण यांनी करावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या विनंतीमध्ये त्यांनी त्यांच्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक १ चे संदर्भात माहिती प्राप्त झाली नसल्याचे निर्देशित केले असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे दिलेला अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसल्याने ही माहिती अपिलार्थीस देण्याच्या या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी काही कारवाई करणे अपेक्षित नव्हते व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०६-२००६ च्या पत्राव्दारे कळवून इतर माहिती दिली आहे. सदर माहिती पुरेशी आहे असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणात ज्या ज्या शाखेकडून त्यांना उशिरा माहिती प्राप्त झाली त्या सर्व कर्मचा-यांना, अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती देण्यास त्यांनी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांच्यावर प्रतिदिन रुपये २५० प्रमाणे एकूण ६२ दिवसाच्या विलंबाबाबत रुपये १५५०० इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची जन माहिती अधिकारी निहाय विभागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी

चिंचवड नव नगर विकास प्राधिकरण यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसात करावी व रकमेचा भरणा हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाचे आत शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड या लेखाशीर्षाखाली करावी व अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अजित एम. देशमुख, व्दारा गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य रचनाकार, पिंपरी चिंचवड नव नगर विकास प्राधिकरण सेक्टर – २४, निगडी, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष पिंपरी चिंचवड नव नगर विकास प्राधिकरण सेक्टर – २४, निगडी, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नव नगर विकास प्राधिकरण सेक्टर – २४, निगडी, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/४५१

निर्णय दिनांक- १८-०८-२००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विजयकुमार बापुराव बोरकर,<br>'सौभद्र,' टि.व्ही.केंद्राच्या पुर्वेस समतानगर,<br>तालूका जिल्हा- अहमदनगर, | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे विभाग क्र.१,अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक<br>अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे, | | |

# विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १८-०८-२००७ रोजी अहदमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विजयकुमार बापुराव बोरकर ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रमांक-१, अहमदनगर, श्री.विजय डिंगाबर होशिंग (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, लघुपाटबंधारे पुणे पाटबंधारे मंडळ पुणे, यांचे प्रतिनिधी श्री. सुरेश वसंत कुलकर्णी, सहाय्यक अधिक्षक अभियंता (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २०-०१-२००७ च्या अर्जान्वये मठपिंप्री तालूका- अहमदनगर येथील के.टी.वेअर क्रमांक-१ संदर्भात दिनांक- ०१-०१-१९७८ ते ०१-११२-२००६ या २८ वर्षाच्या कालावधीतील आठ मुद्यावर जनमाहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“१)मठपिंप्री (हातवळण) त्ता.नगर येथील के.टी.वेअर क्र.१ (गट नं.३०३ लगत) ची ठळक वैशिष्टये व लाभक्षेत्राचा नकाशा

२) सदर के.टी.वेअहरच्या मूळ बांधकामाच्या अंतिम देयकाची नक्कल व अंतिम मापाच्या मोजमाप पुस्तकाची नक्कल.

३) सदर के.टी.वेअरचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर वर्षनिहाय भिजलेले क्षेत्र व वसूल झालेली पाणीपट्टी, साठवलेले पाणी,

४) सदर के.टी.वेअहरवर जानेवारी १९९५ ते डिसेंबर १९९७ दरम्यान बंधा-याचे देखभाल/ दुरुस्तीवर केला गेलेला खर्च. तसेच सदर काळातील तेथे कार्यरत असलेले शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांची नावे व सध्याची पदे व पत्ते.

५) सदर के.टी.वेअर (बंधा-यात) मध्ये सन १९९६ मध्ये टाकलेल्या नीडल विषयाचा पत्रव्यवहार, आदेश वगैरे पत्रव्यवहार.

६) सदर के.टी.वेअरसाठी सन १९९६-९७ मध्ये बंधा-याचे आकस्मिक कामांकरीता केलेला बाबनिहाय खर्चाचा तपशिल द्यावा.

७) सदर के.टी.वेअर दिनांक २१-१०-९६ रोजी फुटल्यानंतर दिनांक- ११-०४-१९९७ रोजी मा.मंडळाधिकारी, वाळकी सर्कल, तालूका-नगर यांनी केलेल्या पंचनाम्याच्या जबाबांच्या, मंडळाधिकारी व तहसीलदार, ता.नगर, यांच्या अहवालांच्या कागदपत्रांसह मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी आपणाकडे पाठविलेल्या संपूर्ण प्रकरणाच्या नकला,

८) मठपिंप्री ता.नगर येथील गट नंबर ३०२ व ३०३ च्या भू-संपादनचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे पाठविल्याच्या पत्राची नक्कल तसेच परिशिष्ट 'अ' शेडयुल 'अ' ची नक्कल. तसेच सदरहू जमिनींच्या भू-संपादनाचे प्रयोजन काय आहे याबाबतचा खुलासा."

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्या क्रमांक-१ च्या सत्यासत्यते बाबत मुख्य

अभियंता, पाटबंधारे विभाग, पुणे यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून

अहमदनगर ( वि.बा.बोरगे)
दिनांक- १८-०८-२००७. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

१. श्री. विजयकुमार बापुराव बोरकर, सौभद्र, टि.व्ही.केंद्राच्या पुर्वेस समतानगर, तालूका जिल्हा- अहमदनगर,

२. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र.१,अहमदनगर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे, सिंचन भवन, मंगळवारपेठ, बारनेरोड पुणे ४११०११, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, मंगळवारपेठ, बारनेरोड पुणे-४११०११, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (यासोबत अपिलार्थीने दिनांक-१८-०८-२००७ रोजी आयोगासमोर दिलेले लेखी निवेदनाची मूळप्रत जोडली आहे. )

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४५९

निर्णय दिनांक १८-०८-२००७

श्री. सुनिल दत्तात्रय सुतार, : अपिलार्थी
घर नं. ६५९/अ, सदर बाजार, भिंगार,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,
शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,
शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०८-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुनिल दत्तात्रय सुतार, अहमदनगर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर अहमदनगर श्री. बापुसाहेब शंकरराव गोरे जन माहिती अधिकारी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात

येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर श्री. काकासाहेब सिततुरा रामटेके (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दैनिक वृत्तपत्र सकाळ दिनांक २९-११-२००६ मध्ये प्रसिध्द झालेल्या वृत्ताच्या संदर्भात एकूण ३ मुद्दयावर अहमदनगर विभागीय व भिंगार विभागाच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाही संदर्भात माहिती मागितली होती.

"१. या मोहिमे अंतर्गत कोणाकोणाचा वीज पुरवठा खंडीत केला, त्यांचेकडे किती थकबाकी, केव्हापासून केव्हापर्यंत आहे इत्यादी माहिती नावासह तपशीलवार.

२. ज्या ज्या वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला त्या वीज ग्राहकांचा व वीज कंपनीचा मागील आठ वर्षात काही पत्रव्यवहार, नोटीसा इत्यादी झाला आहे किंवा नाही, ज्याचा झाला आहे त्यांची माहितीची पत्रव्यवहाराची कागदपत्रे इत्यादीची तपशीलवार माहितीचे कागदपत्रे. वरील माहिती वीज ग्राहकांचे नांव, पत्ता, ग्राहक नंबर इत्यादीसह तपशीलवार माहितीची प्रमाणित प्रती मिळाव्यात.

३. वीज वितरण कंपनीचे मालकाचा, एम. डी. चा संचालकांचा व उर्जामंत्र्यांचा, उर्जा मंत्रालयाचा नांव, पत्ता (पत्रव्यवहाराचा), फॅक्स नंबर, टेलीफोन नंबर, मोबाईल नंबर इत्यादी माहिती अत्यंत महत्वाचे पत्रव्यवहाराकरिता व संपर्कासाठी अतिशिघ्र ४८ तासाचे आत मला देण्यात यावा.

वरील माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०२-२००७ रोजी प्रथमतः माहिती दिली. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार अधीक्षक अभियंता अहमदनगर यांच्याकडे दिनांक २२-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. हे अपील त्याच दिवशी अधीक्षक अभियंता यांनी संबंधित कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी अहमदनगर विभाग जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत, यांच्याकडे पाठविले.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या या अपिलावर विहीत मुदतीत निर्णय न दिल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद मांडला की, त्यांनी या प्रकरणी दिनांक १४-०८-२००७ रोजी म्हणजेच आयोगाच्या सुनावणीच्या आधी ४ दिवस अगोदर या प्रकरणातील प्रथम सुनावणी घेतली असून या प्रकरणामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आदेशित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या कथित सुनावणी आदेशाप्रित्यर्थ ते आयोगाकडे कोणतीही कागदपत्रे सादर करु शकले नाहीत. सुनावणीच्या वेळी त्यांच्याकडे त्यांनी सुनावणी घेतल्याच्या पुराव्याप्रित्यर्थ कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. तथापि जन अपिलीय अधिकारी हे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे जबाबदार अधिकारी असल्याने त्यांच्यावर आयोग विश्वास ठेवत आहे. अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारे निर्णय दिल्याचे मान्य करीत आहेत. या निर्णयाव्दारे अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळणार असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेले व्दितीय अपील सुनावणीची त्यांना आता आवश्यकता नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अपिलार्थीस व्दितीय अपील सुनावणीची आता आवश्यकता वाटत नसल्याने व त्यांना आवश्यक ती माहिती ७ दिवसात मिळणार असल्याने व जन अपिलीय अधिकारी यांचे

आदेशावर अपिलार्थी यांचे कोणतेही म्हणणे नसून त्यांनी, जन अपिलीय अधिका-यांचे आदेश पूर्णपणे मान्य आहेत असे त्यांनी सुनावणीमध्ये सांगितले.

वरील परिस्थिती पाहता आयोगास ही सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही असे आयोगाचे मत झाले आहे.

प्रसंगवशात अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी एकूण ५६ दिवसाच्या विलंबाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहीत कालावधीपेक्षा ५६ दिवस इतक्या विलंबाने प्रतिसाद देऊन आपल्या कार्यशैलीतील आपल्या कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द केला आहे. सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) नुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मुंबई यांनी प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपीलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल दत्तात्रय सुतार, घर नं. ६५९/अ, सदर बाजार, भिंगार, अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगढ, बांद्रा, मुंबई – ५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४६०

निर्णय दिनांक १८-०८-२००७

श्री. सुनिल दत्तात्रय सुतार, : अपिलार्थी

घर नं. ६५९/अ, सदर बाजार, भिंगार,

अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा उप कार्यकारी अभियंता,

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,

शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,

शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०८-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुनिल दत्तात्रय सुतार, अहमदनगर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर अहमदनगर श्री. बापुसाहेब शंकरराव गोरे जन माहिती अधिकारी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर श्री. काकासाहेब सिततुरा रामटेके (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ९ मुद्दयावर वीज ग्राहकाची वीज संचाच्या

संदर्भात माहिती मागतिली होती. या माहितीचा कालावधी २००० ते २००६ असा दर्शविला असून अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-११-२००६ च्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयात ही माहिती देण्यापोटी एकूण २०००० रुपये इतके शुल्क भरण्याबाबत कळविले. तथापि अपिलार्थीने सदर फी न भरता जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते पत्रव्यवहार करत राहिले.

तदनंतर या संदर्भात त्यांनी दिनांक २२-०२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार अधीक्षक अभियंता यांच्याकडे प्रथम अपील केले. अधीक्षक अभियंता यांनी सदर अपील त्याच दिवशी म्हणजे दिनांक २२-०२-२००७ रोजी संबंधित कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत त्यांच्याकडे वर्ग केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी विहीत मुदतीत निर्णय न घेतल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार दिनांक २४-०४-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद मांडला की, त्यांनी या प्रकरणी दिनांक १४-०८-२००७ रोजी म्हणजेच आयोगाच्या सुनावणीच्या आधी ४ दिवस अगोदर या प्रकरणातील प्रथम सुनावणी घेतली असून या प्रकरणामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आदेशित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावर अपिलार्थी यांचे समाधान झाले असल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या कथित सुनावणी आदेशाप्रित्यर्थ ते आयोगाकडे कोणतीही कागदपत्रे सादर करु

शकले नाहीत. सुनावणीच्या वेळी त्यांच्याकडे त्यांनी सुनावणी घेतल्याच्या पुराव्याप्रित्यर्थ कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. तथापि जन अपिलीय अधिकारी हे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे जबाबदार अधिकारी असल्याने त्यांच्यावर आयोग विश्वास ठेवत आहे. अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारे निर्णय दिल्याचे मान्य करीत आहेत. या निर्णयाव्दारे अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळणार असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेले व्दितीय अपील सुनावणीची त्यांना आता आवश्यकता नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अपिलार्थीस व्दितीय अपील सुनावणीची आता आवश्यकता वाटत नसल्याने व त्यांना आवश्यक ती माहिती ७ दिवसात मिळणार असल्याने व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपिल आदेशावर अपिलार्थी यांचे कोणतेही म्हणणे नसून त्यांनी त्यांना हे आदेश पूर्णपणे मान्य आहेत असे त्यांनी सुनावणीमध्ये सांगितले.

वरील परिस्थिती पाहता आयोगास ही सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही असे आयोगाचे मत झाले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

## **<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल दत्तात्रय सुतार, घर नं. ६५९/अ, सदर बाजार, भिंगार, अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४६१

निर्णय दिनांक १८-०८-२००७

श्री. सुनिल दत्तात्रय सुतार, : अपिलार्थी

घर नं. ६५९/अ, सदर बाजार, भिंगार,

अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,
शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,
शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०८-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुनिल दत्तात्रय सुतार, अहमदनगर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर अहमदनगर श्री. बापुसाहेब शंकरराव गोरे जन माहिती अधिकारी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर श्री. काकासाहेब सिततुरा रामटेके (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे भिंगार सब स्टेशन हद्दीतील वीज व वीज ग्राहक या संदर्भात खालील प्रमाणे एकूण ११ मुद्दयावर माहिती विचारली होती.

“१. भिंगार सब स्टेशन अंडर कोणकोणती गावे व किती व कोणकोणती हद्द येते.

२. ३१ डिसेंबर २००५ अखेर विजेचे कनेक्शन मागणा-या किती व कोणकोणत्या अर्जदारांचे अर्ज प्रलंबीत आहेत, का आहेत, किती अर्ज नामंजूर केले आहेत, का केले आहेत व त्यांनी विजेची मागणी केव्हा केली होती अशा सर्व वीज मागणी अर्जदारांची तपशीलवार माहितीची सहिशिक्यानिशीची प्रमाणित माहिती.

३. ०१ जानेवारी २००६ ते ऑक्टोंबर २००६ पर्यत किती व कोणकोणाचे व कोण-कोणत्या घर नंबर मध्ये व कोणत्या स्वरुपाचे वीज मागणीचे एकूण किती अर्ज आले, त्यापैकी किती वीज कनेक्शन्स अर्जाची नियमानुसार पुर्तता होवून वीज कनेक्शन्स दिले, किती अर्ज प्रलंबीत आहेत, केव्हापासून आहेत, का आहेत, किती वीज मागणीचे अर्ज नामंजूर केले, किती वीज मागणीचे अर्ज व कनेक्शन्स नाकारले, का नाकारले या सर्वांची तपशीलवार माहितीची प्रमाणित प्रत.

४. नवीन वीज कनेक्श देण्यासाठी व घेण्यासाठी वीज कंपनीचे नियम व अटी यांचे अधिकृत सविस्तर माहितीची नियमावलीची सहीशिक्यानिशीची प्रमाणित प्रत.

५. भिंगार सब स्टेशन हद्दीत ग्रामपंचायत, कॅन्टोनमेंट बोर्ड इ. चे नाहरकत प्रमाणपत्र न घेता किती, कोठे व कोणाकोणास वीज कनेक्शन्स दिलेले आहेत.

६. भिंगार सब स्टेशन हद्दीतील रेसिडेन्सीयल मिटर्सचा व्यावसायिक व औद्योगिक वापर कोठे-कोठे व कोणाकोणाचा चालू आहे व त्याबद्दल केलेली कार्यवाही.

७. भिंगार सब स्टेशन हद्दीतील औद्योगिक व व्यावसायिक / घरगुती असे दोन्ही किंवा तीनही वीज संच असलेल्या कोणकोणत्या वीज ग्राहकांचे सन १९९८ ते २००१ या कालावधीत नेमके कधी फक्त औद्योगिक वीज मिटर संच ठेवून त्यांचे व्यवसायिक व घरगुती वीज कनेक्शन्स कायमस्वरुपी काढून नेले, त्या वीज ग्राहकांची मीटरसंचाचे तपशीलासह माहिती.

८. २००१ पुर्वी वीज ग्राहकांचा मूळ ग्राहक नंबर बदलून नवीन ग्राहक नंबर दिला असे किती व कोणकोणते वीज ग्राहक आहेत. २००१ सालानंतर ग्राहक नंबर बदलले आहेत अशा सर्व वीज ग्राहकांची मीटर संचासहची दोन्ही ग्राहक नंबरसह तपशीलवार माहिती व ग्राहक नंबर बदलले असल्यास त्याचा शासनाचा, वीजमंडळाचा, वीज कंपनीचा सरकारी नियमाची प्रमाणित प्रत व सरकारी आदेशाची प्रमाणित प्रत.

९. भिंगार सब स्टेशन हद्दीत कोणकोणत्या ठिकाणी बेकायदेशीर वीज वापर आकडे टाकून वीज चोरी व अंडर ग्राऊंड वायरिंग करुन वीज चोरी चालू आहे किंवा नाही, असल्यास सर्वावर कार्यवाही केली की, काही ठराविक लोकांवर कार्यवाही केली. काय कार्यवाही केली, जानेवारी २००६ ते ऑक्टोंबर २००६ पर्यत किती दंड वसूल केला इ. तपशीलवार माहितीची प्रमाणित प्रत.

१०. कोणकोणत्या औद्योगिक वीज ग्राहकांना त्याच प्रिमायसेसमध्ये व्यावसायिक व घरगुती वीज संच आहेत अशा वीज ग्राहकांची तपशीलवार यादी व व्यवसायिक व घरगुती वीज संच नसलेल्या औद्योगिक वीज ग्राहकांची यादी.

११. किती व कोणकोणत्या वीज ग्राहकांचे तात्पुरते व कायमचे वीज कनेक्शन्स बंद आहेत, केव्हापासून आहेत, त्या वीज ग्राहकांची तपशीलवार माहिती, ऑक्टोंबर २००६ अखेरपर्यतची व त्यांचेकडे असलेली थकबाकी.”

वरील माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-११-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये २०,००० इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याविषयी कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडील हे पत्र अपिलार्थीस दिनांक २२-११-२००६ रोजी प्राप्त झाले. तदनंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिनांक २३-११-२००६, ०४-१२-२००६ च्या त्यांच्या पत्रान्वये या

रकमेचे विश्लेषण विचारले. तथापि या पत्रास उत्तर न देता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या बिलाच्या संदर्भात दिवाणी न्यायालयात दावा दाखल झाला असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस द्यावयाची किंवा कसे याबाबत कायदेशीर मार्गदर्शन नाशिक येथील कायदा सल्लागार यांच्या-कडून मागितले असल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रावर दिनांक १८-०१-२००७ रोजी अपिलार्थीने जन माहिती अधिका-यास परत एक स्मरणपत्र दिले. अपिलार्थीच्या या पत्रास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००७ रोजी उत्तर देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याचे निर्देशित केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस ही माहिती प्रत्यक्ष द्यावयाची तयारी दर्शविली होती व अपिलार्थीस सीडी घेऊन आल्यास सदर सीडीवर ही माहिती लोड करुन देण्याची तयारी दर्शविली होती.

तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी विनंती केल्याप्रमाणे कारवाई न करता अधीक्षक अभियंता यांच्याकडे दिनांक २२-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या प्रकरणी अधीक्षक अभियंता जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांच्याकडे दाखल झालेले अपिलार्थीचे हे अपील त्याच दिवशी त्यांनी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांच्याकडे वर्ग केले. कार्यकारी अभियंता हे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत. तथापि या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी विहीत मुदतीत सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद मांडला की, त्यांनी या प्रकरणी दिनांक १४-०८-२००७ रोजी म्हणजेच आयोगाच्या सुनावणीच्या

आधी ४ दिवस या प्रकरणातील प्रथम सुनावणी घेतली असून या प्रकरणामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आदेशित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या कथित सुनावणी आदेशाप्रित्यर्थ त्यांनी आयोगाकडे कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. सुनावणीच्या वेळी त्यांच्याकडे त्यांनी सुनावणी घेतल्याच्या पुराव्याप्रित्यर्थही कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. तथापि जन अपिलीय अधिकारी हे जबाबदार अधिकारी असल्याने त्यांच्यावर आयोग विश्वास ठेवत आहे. जन माहिती अधिकारी यांचे आदेशावर अपिलार्थी यांचे कोणतेही म्हणणे नसून त्यांना हे आदेश पूर्णपणे मान्य आहेत असे त्यांनी सुनावणीमध्ये सांगितले.

वरील परिस्थिती पाहता आयोगास ही व्दितीय सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही असे आयोगाचे मत झाले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल दत्तात्रय सुतार, घर नं. ६५९/अ, सदर बाजार, भिंगार, अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४६२

निर्णय दिनांक १८-०८-२००७

श्री. सुनिल दत्तात्रय सुतार, : अपिलार्थी

घर नं. ६५९/अ, सदर बाजार, भिंगार,

अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा उप कार्यकारी अभियंता,

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,

शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,

शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०८-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुनिल दत्तात्रय सुतार, अहमदनगर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर अहमदनगर श्री. बापुसाहेब शंकरराव गोरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर श्री. काकासाहेब सिततुरा रामटेके (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वीज कंपनी व वीज ग्राहक या संदर्भात खालील प्रमाणे एकूण १० मुद्दयावर माहिती मागितली होती.

“१. श्री. एस. एल. काचोळे यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित अहमदनगर शहर उपविभाग क्रमांक १ या कार्यालयात सहाय्यक अभियंता ह्या पदाचा कार्यभार केव्हा स्विकारला त्याचा दिनांक व व वर्ष व त्यांना या कालावधीत मिळालेले एकूण वेतन (आजअखेर).

२. श्री. काचोळे यांनी पदभार स्विकारलेपासून (सहाय्यक अभियंता शहर उपविभाग क्रमांक १ येथे) प्रतिदिनी मुदतबाह्य झालेली थकबाकी किती व आजअखेर एकूण थकबाकी किती.

३. वसुलीसाठी कार्यवाही न केल्याने मुदतबाह्य झालेल्या थकबाकीमुळे वीज कंपनीचे किती नुकसान झाले व ते झालेले नुकसान भरुन देण्याची निश्चित व नेमकी जबाबदारी कोणाची आहे त्यांचे नाव, पदनाम व हुद्दा इ. तपशीलवार माहिती मिळावी.

४. विद्युत ग्राहक हक्क विवरणपत्र मिळावे (सर्टिफाईड कॉपी).

५. दिनांक १०-०२-२००६ रोजी आपणास दिलेल्या पत्राची, त्यावरील टिपणी, अहवाल व शे-यासह व त्या अर्जात मागणी केलेली कागदपत्राचे, २५-०६-९१ चे मिटर रिडरच्या अहवालाची सर्टिफाईड प्रत मिळावी.

६. ग्राहक क्रमांक १६२०१५५५६७६४ व ग्राहक क्रमांक १६२०१५५५६७६६ या ग्राहकांची नाव, पत्ता, वीज संचाचे स्वरुप व त्यांचे नजिकचे काळातील वीज बील इ. ची सर्टिफाईड माहितीची प्रत मिळावी.

७. वीज बिलावर फॉल्टी / फॉल्टी सिन्स अशी नोंद का व कशासाठी केली जाते याची तपशीलवार माहितीची सर्टिफाईड प्रत मिळावी.

८. थकबाकी असलेल्या / प्रिमायसेसमध्ये थकबाकीदारास व अन्य कोणास नवीन वीज कनेक्शन देता येते किंवा नाही या नियमाचे माहितीची सर्टिफाईड प्रत मिळावी.

९. नवीन वीज कनेक्शन घेण्यासाठी व देण्यासाठीच्या अटी व नियमावलीची सर्टिफाईड प्रत मिळावी.

१०. मुंबई येथे मागील तीन वर्षात भारनियमन / लोडशेडींग झाले किंवा नाही झाले असल्यास झालेल्या भारनियमानाचे अंमलबजावणीचे वेळापत्रकाची सर्टिफाईड प्रत मिळावी.”

वरील माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने यापूर्वीच अधीक्षक अभियंता अहमदनगर यांच्याकडे दिनांक २२-०२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले होते. अपिलार्थीने सदर अपील चुकिच्या प्राधिकरणाकडे केले असल्यामुळे अधीक्षक अभियंता यांनी सदर अपील संबंधित कार्यकारी अभियंता जे या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी आहेत - यांच्याकडे त्याच दिवशी दिनांक २२-०२-२००७ रोजी वर्ग केले व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि वर्ग केलेले सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल झाले नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

विहीत मुदतीत अपिलाचा निर्णय न लागल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीस नेमका कोणत्या मुद्दयावर निर्णय हवा आहे हे त्यांनी लेखी स्वरुपात मांडलेले नाही तथापि आज सुनावणीच्या वेळी त्यांना विचारले असता त्यांनी जन माहिती अधिका-याकडून त्यांना विनामूल्य माहिती मिळावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीच्या तर्फे असा युक्तिवाद मांडला गेला की त्यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अधिका-याकडे वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहीत तरतुदीनुसार अर्ज व अपिले करुनही त्यांना आवश्यक ती माहिती मिळाली नाही व जी माहिती त्यांना मिळाली ती नियमातील विहीत केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने व अपूर्ण स्वरुपात मिळाली आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे त्यांनी

युक्तिवाद मांडला की त्यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०२-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक ५ ची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अंशतः दिल्याचे दिसून येते. त्याच बरोबर अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ६ ची माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असेही आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही दुस-या उपविभागाशी संबंधित असल्याने त्यांच्या कडे ती उपलब्ध नाही. अशा वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना कोठे प्राप्त होऊ शकेल याचे मार्गदर्शन या पत्रात केले असते तर ते अधिक उचित ठरले असते. किंबहुना त्यांचेकडून माहिती अधिकार अधिनियमामध्ये अशाच प्रकारची कृती अपेक्षित आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीस ही माहिती देतांना वेगळे जन माहिती अधिकारी कार्यरत होते. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुद्दा क्रमांक ८ वर खोटी माहिती दिलेली आहे. अपिलार्थीस जर ही माहिती खोटी वाटत असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती व वस्तुस्थिती या दोन्ही बाबी संबंधित कंपनीच्या वरिष्ठांकडे मांडून आपल्या तक्रारीचे निवारण करुन घ्यावे अशी त्यांना सूचना देण्यात आली.

एकंदरीत या सर्व प्रकरणामध्ये अपिलार्थीस त्यांनी प्रथम अर्ज केल्यानंतर त्यांना २०-१२-२००६ रोजी किंवा त्यापुर्वी जन माहिती यांनी माहिती पुरविणे अपेक्षित आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी एकूण ६८ दिवसाचा विलंब लावला आहे व या प्रतिसादात्मक पत्रामध्ये देखील त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येते. तेव्हा असे आदेशित करण्यात येते की, (१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपर्यत द्यावयाची माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या

आत विनामूल्य (सीडीसह) द्यावी. (२) जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याची कारणे सध्याचे जन माहिती अधिकारी सांगू शकत नाहीत. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उशीरा माहिती देऊन त्यांच्या कार्यशैली मध्ये कर्तव्य परायणतेचा अभाव असल्याचे सिध्द केले आहे, तेव्हा असे आदेशित करण्यात येत आहे की, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मुंबई यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे दाखविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून २ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपर्यंत द्यावयाची माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य (सीडीसह) द्यावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मुंबई यांनी त्यांच्या-वर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून २ महिन्याच्या आत सादर करावा.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल दत्तात्रय सुतार, घर नं. ६५९/अ, सदर बाजार, भिंगार, अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर तथा ग्रामीण विभाग, अहमदनगर पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगढ, बांद्रा, मुंबई – ५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४५५

निर्णय दिनांक २१-०८-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद निसार मगबूल,<br>व्दारा साप्तहिक "भडकत्या ज्वाला"<br>कार्यालय, मु. पो. मेन रोड, राहुरी,<br>तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, श्रीरामपूर<br>जिल्हा अहमदनगर | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०८-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सय्यद निसार मगबूल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, श्रीरामपूर जिल्हा अहमदनगर श्री. बबन कचरु घुसे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर श्री. राहणे राजेंद्र सावळीराम (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-०४-२००७ चे अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००६ ते २००७ या वर्षाच्या, त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामापोटी आलेल्या खर्चाबाबत खालील प्रमाणे एकूण ५ मुद्दयावर माहिती विचारली होती.

अपिलार्थीने विचारलेल्या माहितीमध्ये - २००६ ते २००७ मध्ये जन माहिती अधिकारी यांनी "१) खड्डे बुजविण्याकरिता एकूण मागणी केलेल्या डांबराचे वजन, २) डांबर कोणत्या एजन्सीच्या नावे मागितले, ३) डांबराचे वजन ज्या ठिकाणी केले त्या ठिकाणाचे नाव व पत्ता, ४) खड्डे बुजविण्याचे काम करणा-या एजन्सीचे नांव, इस्टिमेट तारीख, वर्क ऑर्डर, अंदाजे एकूण रक्कम व ५) खड्डे बुजविण्यापोटी प्रत्येक रस्त्यावर झालेला खर्च."

अपिलार्थीने ही माहिती टपाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम उत्तर दिले. या पत्रामध्ये अपिलार्थीने मागितलेल्या माहिती पैकी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याकामी निरंक खर्च झाला असल्याची माहिती दिली. अपिलार्थीने मागितलेल्या इतर मुद्दयांपैकी कोणतीही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे या पत्रामध्ये दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या अर्धवट माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दिनांक १७-०५-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दिनांक २५-०६-

२००७ रोजी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २० जुलै २००७ पुर्वी अपिलार्थीस ही माहिती सशुल्क देण्याचे सूचित केले. या अपिल निर्णयामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देता येत नाही अशा अर्थाचे एक विधान केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगा-कडे दिनांक २७-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद मांडला की, उपरोक्त कालावधीत ज्या डांबराने खड्डे बुजविले गेले त्याचा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे व त्याच बरोबर या कामाच्या वेळी एका कामगाराला आपघात होऊन त्याच्या बोटाला इजा झाल्याची घटना घडली आहे. तरी देखील अशा प्रकारचे कोणतेही काम झाले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील निरंक माहितीव्दारे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे आयोगास असे सांगण्यात आले की, श्रीरामपूर सार्वजनिक बांधकाम उप विभागामध्ये त्यांच्या अधिपत्याखालील कोणत्याही रस्त्यावरील खड्डे भरण्याचे कोणतेही काम झाले नाही व त्यामुळे त्यांनी रस्त्यावर कोणताही खर्च केलेला नाही. खात्याकडे उपलब्ध असलेल्या नियमित मजुराकडून त्यांनी रस्त्यावरील खड्डे व रस्त्याच्या बाजुची माती घेऊन त्यांचे मिश्रण करुन वाहतूक सुरळीत ठेवली आहे त्यामुळे त्यांनी कळविलेली निरंक माहिती ही बरोबर आहे. खड्डे बुजविण्याचे अंदाजपत्रक जन माहिती अधिकारी यांनी तयार केलेले आहे. अपिलार्थीस अंदाजपत्रके तयार करावयाची तारीख हवी आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील प्रत्येक मुद्दयावर निरंक हीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे.

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकून घेऊन असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी एकत्रित माहिती देण्याऐवजी प्रत्येक मुद्दयावर वेगवेगळ्या स्वरुपात माहिती विनामूल्य द्यावी. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या या माहिती संदर्भात काही शंका असतील तर त्यांनी या शंकाचे निवारण संबंधित अधिका-याच्या वरिष्ठ अधिका-याकडून करुन घ्यावे. वरिष्ठ अधिका-यांनी अपिलार्थीकडून त्यांना या संदर्भात काही विनंती अर्ज प्राप्त झाल्यास त्याची त्यांनी प्राधान्याने दखल घेऊन आपला निर्णय द्यावा.

वरील विवेचनाच्या पाश्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती द्यावी. ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सय्यद निसार मगबूल, व्दारा साप्तहिक "भडकत्या ज्वाला" कार्यालय, मु. पो. मेन रोड, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, श्रीरामपूर जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४५७

निर्णय दिनांक २१-०८-२००७

श्री. जनार्दन शिवमूर्ती एकलहरे, : अपिलार्थी
कार्यालय अधीक्षक, न्यू लॉ कॉलेज, लाल
टाकी रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा अधीक्षक, न्यू ऑर्टस्, कॉमर्स ॲण्ड
सायन्स कॉलेज, लाल टाकी रोड, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्राचार्य, न्यू ऑर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स

कॉलेज, लाल टाकी रोड, अहमदनगर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०८-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. जनार्दन शिवमूर्ती एकलहरे, अहमदनगर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, न्यू ऑर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर श्री. म्हस्के आसाराम रभाजी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, न्यू ऑर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर श्री. सर्जेराव भाऊराव निमसे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४ जून २००७ चे अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कॉलेजातील दिनांक ०१-०६-२००६ ते ०४-०६-२००७ पर्यंतच्या कालावधीतील प्रबंधक पदावरील नेमणुकीसंदर्भात खालील प्रमाणे एकूण ५ मुद्दयावर माहिती विचारली होती.

१. “ महाविद्यालयातील प्रबंधकाचे पद केव्हापासून रिक्त झालेले आहे ?

२. प्रबंधकाचे पद नियमितपणे भरले आहे काय ? भरले असल्यास नेमणूक आदेशाची सत्यप्रत मिळावी.

३. प्रबंधकाचे पद नियमितपणे भरले नसल्यास सदरचे पद प्रभारी नेमणुकीने भरले आहे काय ?

४. प्रभारी नेमणूक केली असल्यास संस्थेच्या महाविद्यालयातील कार्यालय अधीक्षक पदावरील सेवकांची एकत्रित सेवा जेष्ठता यादी विचारात घेतली आहे काय ?

५. एकत्रित सेवा जेष्ठता यादी विचारात न घेता सेवा जेष्ठता डावलून दिनांक ०१-०६-२००६ ते आजतागायत कोणकोणत्या सेवकांना प्रभारी प्रबंधक म्हणून

नेमणूक आदेश दिले आहेत ? संबंधितांना वेळोवेळी दिलेल्या नेमणूक आदेशाच्या सत्यप्रती मिळाव्यात."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे ही माहिती पुरविली आहे. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. हे अपील करण्याची कारणे म्हणून अपिलार्थीने अपूर्ण माहिती, नेमकी माहिती देण्याचे टाळणे व संपूर्ण माहिती पासून त्यांना वंचित ठेवणे - अशी दिली आहेत. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे अपिलार्थीस पत्राने कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची ही पध्दत चुकिची असून त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना दोघांनाही एकत्र बोलावून दोघांचे म्हणणे ऐकून त्यावर आपला ठोस निर्णय अंतीमतः देणे हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती अपील ठरविण्याच्या पध्दतिशी विसंगत दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारच्या प्राप्त झालेल्या पत्राने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार दिनांक २०-०७-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले. यामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन न करता अपील एकत्र निकाली काढले आहे तर जन माहिती अधिकारी यांनी माहिती दडवण्याच्या हेतुने, असद्‌हेतुने त्यांना माहिती दिलेली नाही, तसेच त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी

यांनी अपिलार्थीने केलेल्या अर्जातील शेवटचा मुद्दा महाविद्यालयाशी संबंधीत नसल्याचे कारण देऊन त्यांना माहिती दिलेली नाही व माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) मधील तरतुदी विचारात घेतल्या नसल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावर मुख्य आक्षेप घेऊन त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यास जन माहिती अधिका-यांना भाग पाडावयास हवे होते असे त्यांचे म्हणणे आयोगासमोर मांडले. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या मूळ अर्जातील माहिती एकत्रित सेवा जेष्ठता यादीशी संबंधीत होती व त्यांना त्याची माहिती हवी होती. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या तर्फे असा युक्तिवाद मांडला की, संबंधीत प्रबंधकाचे पद हे एकाकी पद असून त्यांच्याशिवाय संस्थेची अशा प्रकारची एकूण ५ कॉलेजेस असून सर्व अधीक्षकांची एक एकत्रित सेवा जेष्ठता यादी सदर शिक्षण संस्थेच्या कार्यालयामध्ये ठेवली आहे. अपिलार्थीस अपेक्षीत असलेली यादी संबंधीत शिक्षण संस्थेच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असल्याने ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे हे म्हणणे आयोग मान्य करत नाही कारण संबंधीत शिक्षण संस्था व कॉलेज हे एकाच प्राधिकरणाचे वेगवेगळे घटक असून जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकरणी संस्थेकडून या विषयासंदर्भात माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार अभिप्रेत आहे, किंवा जर ही माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधीत संस्थेकडे पाठवून त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी कळविणे भाग होते. तथापि यांनी यापैकी कोणतीही कृती केली नाही. याच बरोबर अपिलार्थीचे अपील ठरवितांना त्यांनी अपिलार्थीस बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून व त्याची नोंद घेऊन आपला निर्णय देणे अपेक्षित होते. तथापि त्यांनी तसे न करता अपिलार्थीच्या अपील अर्जावर एका पत्राव्दारे त्यांचा निर्णय

कळविला. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती चूक आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीमुळे अपिलार्थी यांचा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे पालन केले नाही या आरोपाला पुष्टी मिळते.

तेव्हा वरील वस्तुस्थिती पाहता असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षीत असलेली मुद्दा क्रमांक ५ ची संपूर्ण व साक्षांकीत माहिती सदर संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन, हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत, विनामूल्य पुरवावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पाश्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे अपेक्षीत असलेली मुद्दा क्रमांक ५ ची संपूर्ण व स्पष्ट माहिती (आवश्यक असल्यास संस्थेच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन) अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जनार्दन शिवमूर्ती एकलहरे, कार्यालय अधीक्षक, न्यू लॉ कॉलेज, लाल टाकी रोड, अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, न्यू ऑर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, लाल टाकी रोड, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, न्यू ऑर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, लाल टाकी रोड, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४५८

निर्णय दिनांक २१-०८-२००७

श्री. शंकरराव विठ्ठलराव राऊत, : अपिलार्थी

अव्वल कारकून, व्दारा जिल्हा विभागीय

चौकशी कार्यालय, कलेक्टरेट कंपाऊंड,

अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय),

अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०८-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शंकरराव विठ्ठलराव राऊत अहमदनगर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), अहमदनगर यांचे वतीने पोलीस निरीक्षक श्री. यादवराव रभाजी आव्हाड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-०२-२००६ च्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन २००१ ते १६-०२-२००६ या कालावधीत - , तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी कोतवाली पोलीस निरीक्षक यांना दिनांक १९-०७-२००१ रोजीच्या पत्रान्वये खून प्रकरणाचा तपास करण्याचे आदेशासंदर्भात दिलेल्या खालील ३ मुद्दयावर माहिती मागितली होती.

" तत्कालीन पोलीस अधीक्षक तुकाराम चव्हाण यांच्या सहीने कोतवाली पोलीस निरीक्षक कोतवाली पोलीस निरीक्षक श्री. सुरेश भामरे यांना - अर्धशासकीय पत्र क्रमांक आर/११८/अ.मृ./४१/८४७/२००१ दिनांक १९-०७-२००१ हे पत्र दिले. या पत्रास उत्तर म्हणून कोतवाली पोलीस निरीक्षक यांनी तुकाराम चव्हाण यांना कोतवाली पोलीस निरीक्षक यांनी अर्धशासकीय पत्र क्रमांक ४९/२००१ दिनांक २८-०९-२००१ अन्वये अहवाल दिला. त्यावर पोलीस अधीक्षक कार्यालयाने केलेल्या पुढील कारवाईचा तपशील. २) त्या पत्रानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी किंवा नगर शहर यांना अथवा कोतवाली पोलीस निरीक्षक यांना एडी-४१/२००१ ही फायनल करण्याचे आदेश दिले असेल तसा खुलासा ३) तक्रारदार यांनी दिनांक १९-०७-२००१ ला दिलेल्या तक्रारीप्रमाणे आपलेकडून काही उत्तर दिले असल्यास त्याची प्रत."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०४-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. त्यामध्ये, संबंधीत अहवालावर पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून केलेल्या कारवाईचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, उपविभागीय पोलीस अधिकारी, नगर शहर, पोलीस निरीक्षक कोतवाली यांना एडी ४१/०१ हे प्रकरण फायनल करण्याचे आदेश दिलेले नाहीत व अपिलार्थीने केलेल्या दिनांक १९-०७-२००१ च्या अर्जाप्रमाणे त्यांना काही उत्तर दिले किंवा कसे याचा तपशील पोलीस स्टेशनला उपलब्ध नाही असे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या या पत्रावरुन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीचा परामार्श घेतल्याचे दिसून येते.

तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून यांना माहिती मिळाली नाही असे कारण दर्शवून आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. तथापि या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी झाल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत अपिलार्थीच्या अपिलावर कोणताच निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन पोलीस व पोलीस अधिका-यांनी त्यांच्या मुलाचे खून प्रकरण दडपले असल्याचा पोलीस यंत्रणेवर आरोप केला आहे व त्या संदर्भात त्यांना ही माहिती हवी

असल्याचे आयोगास निदर्शनास आणले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दंडास पात्र असल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा मुद्दा मांडण्यात आला की, त्यांना अपेक्षीत असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही तर जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा मुद्दा मांडण्यात आला की, त्यांनी दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सर्व माहिती दिली आहे. तथापि अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी पूर्णतः दिली नसल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०४-२००६ चे पत्रान्वये अपिलार्थीस सर्व माहिती पुरविल्याचे स्पष्ट केले आहे. अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील माहितीचे स्वरुप पाहिले असता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधीत सर्व नस्त्या पाहण्यासाठी उपलब्ध करुन देणे हे, अपिलार्थीच्या यांच्या मनात असलेल्या शंका दूर करण्याच्या दृष्टीने, सोईचे होईल असे आयोगास वाटते. तेव्हा असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधीत असलेल्या सर्व नस्त्या पाहण्यासाठी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर २ दिवसाच्या आत प्राधान्याने उपलब्ध करुन द्याव्यात.

अपिलार्थीस माहिती देण्यापोटी जन माहिती अधिकारी यांनी जाणुन-बुजून विलंब लावला किंवा नंतर माहिती दडवली असे आढळून न आल्यामुळे संबंधितावर दंडाचे आदेश नाहीत. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची दखल घेऊन सुनावणी घेतली नाही याची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे. जन माहिती अधिकारी व पोलीस अधीक्षक अहमदनगर यांना सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे भविष्यात जी प्रकरणे वेळोवेळी दाखल

होतील त्यांची त्यांनी गांभीर्यपूर्वक दखल घेऊन विहीत मुदतीत सदर प्रकरणे निकाली काढावीत.

वरील विवेचनाच्या पाश्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधीत असलेल्या सर्व नस्त्या त्यांना पाहण्यासाठी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर २ दिवसाच्या आत प्राधान्याने उपलब्ध करुन द्याव्यात.

३. जन माहिती अधिकारी व पोलीस अधीक्षक अहमदनगर यांना सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे भविष्यात जी प्रकरणे वेळोवेळी दाखल होतील त्यांची त्यांनी गांभीर्यपूर्वक दखल घेऊन विहीत मुदतीत अशी प्रकरणे निकाली काढावीत.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शंकरराव विठ्ठलराव राऊत, अव्वल कारकून, व्दारा जिल्हा विभागीय चौकशी कार्यालय, कलेक्टरेट कंपाऊंड, अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८६

निर्णय दिनांक- २२-०८-२००७.

१ कु. मिनाक्षी गुंडेराव शिंदे, : अपिलार्थी
रुणा सदन, राचेट्टे गल्ली, लातूर
जिल्हा-लातूर.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
आस्थापना अधिकारी (अतां-आस्था)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, एस्टेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळमजला,धारावी रोड, माटुंगा,
मुंबई.- ४०० ०१९.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, सहवा मजला,
बांद्रा (पूर्व) मुंबई.

# विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी दिनाक- ३१-०७-२००७ रोजी औरंगाबाद ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी, जनअपिलीय अधिकारी यापैकी कोणीही हजर राहिले नाहीत. तदनंतर दिनांक-२२-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे सुनावणी ठेवण्यात आली. या सुनावणीच्यावेळेस अपिलार्थी कु.मिनाक्षी गुंडेराव शिंदे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी (अतां-आस्था) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,बांद्रा,मुंबई (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,बांद्रा,मुंबई(यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक- १८-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे,त्यांच्याकडील नौकर भरती संदर्भात व महिलाच्या ३० टक्के राखीव धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भात एकूण ११ मुद्यावर माहिती मागविली होती. ही माहिती महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या सन २००६ च्या फेब्रुवारी महिन्यात झालेल्या सहाय्यक प्रोगामरच्या लेखी परीक्षा संदर्भात होती.

अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत्त टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीमध्ये- लेखी परीक्षा देणा-या उमेदवाराची संख्या, खुल्या सर्वसाधारण गटातील आरक्षण, ३० टक्के धोरणास पात्र व लेखी परीक्षा दिलेल्या उमेदवाराची संख्या, क्रिमलेअर गटात मोडणा-या महिला उमेदवारांची संख्या, क्रिमलेअर सर्वसाधारण महिला गटात लेखी परीक्षेस पास झालेल्या उमेदवारांची संख्या,

मुलाखतीस बोलाविलेल्या उमेदवारांची संख्या, जर पात्र उमेदवार उपलब्ध नसतील तर जागा रिकाम्या ठेवणार किंवा कसे, या अटीमध्ये काही सवलत देण्यात आली आहे काय, लेखी परीक्षेस कॉल देण्यापूर्वी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी वर्गवारी, गटवारी केली काय व या परीक्षेच्या उत्तरपत्रिकाच्या छायाप्रति मागणी केल्यास मिळणार काय, या मुद्यांचा समावेश होतो.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दिनांक- १४-०६-२००६ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देवून काही माहिती पुरविलेली आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार दिनांक- २०-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतलेली उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेतल्याने अपिलार्थीने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार दिनांक- १३-०७-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी, जनअपिलीय अधिकारी हे कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या दिनांक- २०-०६-२००६ रोजीच्या प्रथम अपीलावर निर्णय होणे या प्रकरणी आवश्यक असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. तेंव्हा असे आदेशित करण्यात येते की, जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या

दिनांक- २०-०६-२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर हे आदेश पारीत झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्राधान्याने सुनावणी घ्यावी. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी हे हजर असतील याची त्यांनी खात्री करुन घ्यावी. जर जनअपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य नसेल तर त्या राज्य माहिती आयोगाकडे या अपीला विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जनअपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः, अपिलार्थीने त्यांच्याकडे दाखल केलेल्या दिनांक- २०-०६-२००६ रोजीच्या प्रथम अर्जावर, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याचे आत प्राधन्याने प्रथम सुनावणी घ्यावी व आपला लेखी निर्णय त्याच दिवशी अपिलार्थीस पारीत करावा.

औरंगाबाद. ( वि.बा.बोरगे)
दिनांक- २२-०८-२००७. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत-

१. कु.मिनाक्षी गुंडेराव शिंदे, रुणा सदन, राचेट्टे गल्ली, लातूर, जिल्हा-लातूर.
२. जनमाहिती अधिकारी तथा (अता-आस्थापना) प्रकाशगड, प्लॉट नं.जी-९, अनंत केमकर मार्ग, स्टेशनरोड, बांद्रा (पूर्व) मुंबई- ४०० ०५१, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,प्रकाशगड, सहावा मजला, बांद्रा (पूर्व) मुंबई-४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४८१

निर्णय दिनांक २२-०८-२००७

१ श्री. व्यंकटी बळीराम निलावड, : अपिलार्थी
शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा
प्रकल्प अधिकारी, नगर परिषद प्रशासन,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**विरुध्द**

जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, बीड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. व्यंकटी बळीराम निलावड, शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी

कार्यालय, बीड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड श्री. बी. एन. गुट्टे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी श्री. संजय महाव्दार या अर्जदाराने बीड नगरपरिषदेच्या टॅक्स कमिटी बाबत एकच माहिती मुख्याधिकारी नगरपरिषद, बीड व जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड या दोन जन माहिती अधिका-यांकडून म्हणजेच दोन वेगवेगळ्या प्राधिकरणाकडून मागविली होती. यापैकी मुख्याधिकारी, नगर परिषद बीड यांनी संबंधीत अर्जदारास, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिनांक १४-१२-२००५ रोजी दिली. श्री. निलावड हे त्यावेळी मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड व जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड या दोन्ही पदावर कार्यरत होते. अपिलार्थीने मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड यांच्याकडे केलेल्या अर्जावर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहीत कालावधीत माहिती दिली तर जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद प्रशासन या नात्याने त्यांच्याकडे असलेल्या कार्यभाराची माहिती देण्याबाबत त्यांनी नगरपरिषदेस सूचित केले. परंतु हीच माहिती अपिलार्थीस त्यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद बीड या नात्याने दिली असल्यामुळे ती माहिती त्यांनी अर्जदारास परत दिली नाही.

अर्जदाराने श्री. निलावड यांच्याकडून विहीत मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये त्यांच्याविरुध्द जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिका-यास प्रतिदिन रुपये २५० इतकी शास्ती लावण्याची मागणी केली होती व त्याच बरोबर आपली मूळ माहितीची मागणी त्यामध्ये कायम ठेवली होती. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेऊन अर्जदाराचे प्रथम अपील मंजूर केले व

जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्यावर प्रतिदिन रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये ८००० इतकी शास्ती लावून सदर शास्ती त्यांच्या पगारातून वसूल करण्याचे आदेश पारीत केले.

या आदेशाने व्यथित होऊन संबंधीत जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड श्री. निलावड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. यामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिका-यांनी त्यांचे म्हणणे गांभीर्यपूर्वक न पाहता त्यांचेवर लादण्यात आलेली रुपये ८००० इतकी शास्ती रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून आले आहे की, मूळ अर्जदाराने एकच माहिती दोन वेगवेगळ्या प्राधिकरणाकडे मागितलेली आहे. दोन्ही प्राधिकरणाकडे माहिती अधिकारी जरी भिन्न असले तरी प्रत्यक्षात एकच व्यक्ती या दोन्ही पदावर कार्यरत होती. त्यांनी अर्जदारास हवी असलेली माहिती एका प्राधिकरणाचे जन माहिती अधिकारी या नात्याने दिलेली आहे तर अर्जदारास आवश्यक असलेली माहिती मिळाली असल्याने दुस-या प्राधिकरणाचे जन माहिती अधिकारी या नात्याने त्यांनी ही माहिती अर्जदारास दिली नाही परिणामी अपिलार्थीने त्यांच्याविरुध्द माहिती अधिकार अधिनियमा-मधील कलम १९ (१) अन्वये संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले. हे अपील ठरवितांना जन माहिती अधिकारी यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद बीड या नात्याने अर्जदारास मूळ माहिती विहीत मुदतीत दिल्याचे जन अपिलीय अधिकारी यांना माहीत नव्हते कारण संबंधीत जन माहिती अधिकारी हे त्या दिवशी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीस अनुपस्थित राहिले होते.

अर्जदारास त्यांना आवश्यक असलेली माहिती या प्रकरणी मुदतीत मिळाल्याचे निःसंशयपणी सिध्द झाले आहे. विशेषतः अर्जदारास एका प्राधिकरणाकडून विहीत मुदतीत माहिती मिळाली असतांना त्यांनी दुस-या प्राधिकरणाकडे त्याच माहितीकरिता अपील करुन संबंधीत कार्यालयाचा वृथा कालपव्यय केल्याचे दिसून येत आहे, त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे निर्णय घेण्याची, कोणतीही अधिकारिता या अधिनियमात नसूनही त्यांनी जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीत माहिती न देण्याच्या कारणाप्रित्यर्थ प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे एकूण ८००० रुपयाची शास्ती लावली आहे.

वरील प्रमाणे अधिनियमातील तरतुदी व प्रत्यक्ष परिस्थिती पाहता, जन अपिलीय अधिकारी यांनी श्री. व्यंकटी बळीराम निलावड, जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्यावर शास्ती लावण्याचे जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक ०२-०२-२००६ चे आदेश रद्द करण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पाश्वभूमीवर अपिलार्थी (श्री. व्यंकटी बळीराम निलावड) यांचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## **<u>निर्णय</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी श्री. व्यंकटी बळीराम निलावड, जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्यावर शास्ती लावण्याचे त्यांचे दिनांक ०२-०२-२००६ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक     २२ ऑगस्ट २००७     राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. व्यंकटी बळीराम निलावड, शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४२६

निर्णय दिनांक   २३-०८-२००७

श्री. दिलीप नाटू सुरळकर,     :     अपिलार्थी
व्दारा यासीनखॉ पठाण, न्यू ई ५८/२, मु. पो.
दिपनगर, तालुका भुसावळ, जिल्हा जळगाव

## विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत,
पिंपरी सेकम-निंभोरा बु., तालुका भुसावळ
जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
भुसावळ, जिल्हा जळगाव

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दिलीप नाटू सुरळकर दिपनगर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत, पिंपरी सेकम-निंभोरा बु., तालुका भुसावळ जिल्हा जळगाव श्री. विजय काशीनाथ महाजन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भुसावळ, जिल्हा जळगाव श्री. शंकर दोह-या वळवी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पिंपरी सेकम-निंभोरा बु. या ग्रामपंचायतीच्या निधी व खर्चाबाबतची सन २००० ते २००५ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१.	" सन २००० ते २००५ या कालावधीत ग्रुप ग्रामपंचायत पिंप्री सेकम-निंभोरा बु. ला प्रत्येक वर्षी शासकीय योजना मार्फत कोणता व किती निधी मिळाला ? ग्रामपंचायतीचे स्वतःचे वार्षिक उत्पन्न सन २००० ते २००५ प्रत्येक वर्षी किती झाले, तसेच या कालावधीत शासकीय योजनाचा आलेला निधी व ग्रामपंचायतीचा जमा झालेला निधी कुठे व कसा का ? खर्च करण्यात आला याची संपूर्ण पावत्या बिलासह सविस्तर माहिती लेखी स्वरुपात देण्यात यावी.

२.	सन २००० ते २००५ या कालावधीत झालेली कामे कोणमार्फत करण्यात आली ? या सर्व कामाची पूर्णत्वाच्या दाखल्यासह, नकाशासह संपूर्ण नोंदीसहीत लेखी स्वरुपाची माहिती देण्यात यावी.

३.	सन २००० ते २००५ मध्ये झालेल्या ग्रामपंचायतीच्या मासिक व ग्रामसभा याची प्रोसिडींग बुकची नक्कल व उपस्थित सदस्य व ग्रामस्थासह संपूर्ण लेखी माहिती द्यावी."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थी हे दारिद्र्य रेषेखालील असून त्यांचा अनुक्रमांक १५८ असा या अर्जामध्ये नमूद केला आहे.

अपिलार्थीने त्यांच्या अर्जावर जरी तारीख २९-११-२००५ अशी दर्शविली असली तरी सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १७-१२-२००५ रोजी प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदीस अनुसरुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन त्यावर आदेश पारीत केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीस अनुसरुन दिनांक ०८-०४-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. सदर अपील करण्याचे कारण म्हणजे त्यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी झाली नाही असे त्यांनी दर्शविले आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थी यांच्या अपील अर्जाची सुनावणी का घेतली नाही याचे कारण विचारले असता त्यांनी अपिलार्थीचे सदर अपील त्यांचे कार्यालयात प्राप्त झाले नसल्याचे शपथपत्राव्दारे आयोगासमोर कबूल केले आहे. याच बरोबर सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात दाखल केल्याचा पुरावा अपिलार्थीकडे उपलब्ध नाही. सदर अपील जिल्हा परिषदेच्या कार्यालयात प्राप्त झाल्या-प्रित्यर्थ संबंधीत लिपिकाची सही अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या प्रतीवर दिसून येत नाही. या टप्प्यावर या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्राधान्याने सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय जारी करणे हे संयुक्तीक होईल असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाशी अपिलार्थी सहमत नसतील तर ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचन लक्षात घेता असे आदेशीत करण्यात येत आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०१-२००६ च्या प्रथम अपीलावर, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सुनावणी घ्यावी व आपला निर्णय त्याच दिवशी पारीत करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१.  अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.  जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०१-२००६ च्या प्रथम अपीलावर, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सुनावणी घ्यावी व आपला निर्णय त्याच दिवशी पारीत करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीप नाटू सुरळकर, व्दारा यासीनखॉ र. पठाण, न्यू ई ५८/२, मु. पो. दिपनगर, तालुका भुसावळ, जिल्हा जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत, पिंपरी सेकम-निंभोरा बु., तालुका भुसावळ जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भुसावळ, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४७७

निर्णय दिनांक २३-०८-२००७

श्री. विश्वनाथ भागोजी दहे, : अपिलार्थी
व्दारा सहाय्यक संचालक, नगर रचना
कार्यालय, सावित्रीबाई फुले मार्केट, सावेडी,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव,
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
कार्यालय, जालना रोड, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त आयुक्त (महसूल) विभाग,
औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विश्वनाथ भागोजी दहे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती श्री. रामदास नारायण वैद्य (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त

(महसूल) विभाग, औरंगाबाद सौ. रिचा बागला (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये माहिती अधिकारी यांच्याकडे १९९२ सालातील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“ मा. संचालक समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक लोकसेवा/जाप्रप/१९९१/मुलाखत/का-९/११११, दिनांक १२-०५-१९९२ अन्वये दिनांक ०९-०६-१९९२ रोजी मुलाखत झाली. सदर प्रकरण २००० साली आपल्या कार्यालयाकडे वर्ग झाले आहे. त्याचा अनुक्रमांक २४५ असा आहे. माझे जात प्रमाणपत्राबाबत घेण्यात आलेल्या अंतीम निर्णयाची प्रत मिळावी. ”

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने संचालक समाजकल्याण संचालनालय यांच्याकडे या प्रकरणात ०९ नोव्हेंबर २००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपीलाची प्रत आज रोजी अपिलार्थी यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीच्या सदर अर्जावर (दिनांक ०९ नोव्हेंबर २००६) संचालक समाजकल्याण संचालनालय यांच्यातर्फे अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २४-११-२००६ च्या पत्रान्वये अतिरिक्त आयुक्त (महसूल) यांच्याकडे संपर्क साधण्याबाबत सुचविले गेले. त्यानंतर अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अतिरिक्त आयुक्त (महसूल) औरंगाबाद यांच्याकडे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन प्रथम अपील केले. हे अपील करण्याचे कारण त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी दर्शविले आहे. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीचे प्रथम अपील अर्जावर आपले अभिप्राय नोंदवून अपिलार्थीचे अपील मूळ

प्रतीत त्यांना परत केले. जन अपिलीय अधिकारी यांचे या अपिलाच्या मूळ प्रतीवर खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

" आपण मागितलेली माहिती कोणत्या जिल्ह्याचे, कोणत्या कमिटीकडे आहे, त्याचा बोध होत नाही तसेच आपण आवश्यक ते शपथपत्र सोबत जोडले नाही, त्यामुळे आपला अर्ज परत करण्यात येत आहे. परिपूर्ण माहिती अभावी परत."

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिलेले वरील प्रकारचे अभिप्राय या ठिकाणी गैरलागू आहेत कारण माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये करावयाच्या अपील पध्दतीमध्ये अपिलार्थीने कोणत्याही प्रकारचे प्रतिज्ञापत्र दाखल करणे अभिप्रेत नाही. जन अपिलीय अधिकारी यांना सदर प्रकरण कोणत्या जिल्ह्याचे आहे याबाबत जर काही शंका होत्या तर त्यांनी अपिलाची सुनावणी घेऊन या त्यांच्या शंका दूर करुन घेणे आवश्यक होते, तथापि त्यांनी या प्रकरणी कोणतीही कारवाई न करता व कोणत्याही प्रकारची बुध्दी न वापरता अपिलार्थीचे त्यांचे प्रथम अपील मूळ प्रतीत परत करुन आपल्यातील कर्तव्य परायणतेचा अभाव त्यांच्या या कृतीव्दारे स्पष्ट केला आहे.

अपिलार्थीस प्रयत्न करुनही माहिती न मिळाल्यामुळे व जन अपिलीय अधिका-याने त्यांना वर दिलेल्या अभिप्रायामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तिवाद मांडला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-१०-२००६ च्या अर्जावर प्रथम प्रतिसाद त्यांच्या कडील दिनांक ११-०६-२००७ च्या पत्राने दिला आहे. अपिलार्थीच्या या अर्जास प्रथम प्रतिसाद देण्यास सुमारे आठ महिने इतका दीर्घ विलंब लागल्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या प्रचंड कामाच्या व्यापामुळे ते

अपिलार्थीचा अर्ज विचारात घेऊ शकले नाहीत. त्याच बरोबर या कामाकरिता लागणारा आवश्यक कर्मचारीवृंद त्यांच्याकडे उपलब्ध नाही अशी कारणे सांगून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यक्षेत्रात येत नव्हती असे आयोगास आज स्पष्ट केले.

अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात ही माहिती येत नव्हती तर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमामध्ये विहीत केल्याप्रमाणे ५ दिवसाच्या आत हा अर्ज संबंधीत प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करावयाचा होता व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस कळवावयास हवे होते. अपिलार्थीने आयोगाच्या निदर्शनास असेही लेखी निवेदनाव्दारे आणून दिले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी ज्या समितीकडे त्यांचे प्रकरण वर्ग केले आहे त्या समिती क्रमांक दोनशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांच्या अभिलेख्यातील रजिस्टरची तपासणी करता त्यांना सदर प्रकरण त्यामध्ये आढळले नाही. त्याच बरोबर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज ज्या समितीकडे वर्ग केला आहे त्या समिती क्रमांक २ चे ते सदस्य आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज करुनही आज तागायत देखील म्हणजे १० महिने इतका कालावधी लोटला जाऊनही त्यांना अपेक्षीत असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कडून प्राप्त झाली नाही त्यामुळे त्यांच्या मुलीस २००६-०७ या शैक्षणिक वर्षात वैद्यकीय महाविद्यालयीन प्रवेश नाकारण्यात आला आहे व परिणामी त्यांच्या मुलीच्या भवितव्याचे कधीही भरुन न येणारे अपरिमीत नुकसान झाले आहे.

अपिलार्थीने मांडलेल्या युक्तिवाद आयोगास मान्य आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम माहितीचा अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे माहिती अधिकार अधिनियमातील विहीत तरतुदीनुसार वेळेत वर्ग न केल्यामुळे हे प्रकरण उद्भवले आहे तर जन अपिलीय अधिकारी यांनी आपली जबाबदारी झटकून टाकली व त्यामूळे अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यामध्ये ते देखील अप्रत्यक्षरित्या या घटनेस जबाबदार ठरतात. त्यांच्या अपील टाळण्याच्या

वृत्तीची नोंद सचिव (महसूल) यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्याच बरोबर अपिलार्थी यांच्या मुलीचे त्यांना न मिळालेल्या माहिती अभावी जे अपरिमीत नुकसान झाले आहे त्यास निःसंशयपणे जन माहिती अधिकारी हे जबाबदार असल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. या प्रकरणामध्ये आयोगास असे आढळून आले आहे की, प्रत्यक्ष संचालक समाजकल्याण यांना देखील या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी कोण आहे हे माहीत नाही. अपर आयुक्त महसूल हे जात पडताळणी समितीचे पदसिध्द अध्यक्ष असून या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी हे विभागीय समाजकल्याण अधिकारी आहेत एवढी साधी माहिती देखील संचालक दर्जाच्या अधिका-याला असू नये याचे आयोगाला सखेद आश्चर्य वाटते. त्यांनी अपिलार्थीस चुकिच्या प्राधिकरणाकडे अपील करण्याची सूचना दिली व त्यांच्या या चुकिमुळे अपिलार्थीने चुकिच्या प्राधिकरणाकडे अपील केले. जन अपिलीय अधिका-याने कोणतीही दखल न घेता त्यांनी अपील परत पाठविले हा सर्व घटनाक्रम पाहता समाज कल्याण विभागाचे अधिकारी "माहिती अधिकार अधिनियम २००५" हा कितपत गांर्भीयाने पाळतात याची शंका येते. सचिव (सामाजिक न्याय) यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी जबाबदार असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अहवाल आयोगास दोन महिन्याच्या आत सादर करावा.

प्रसंगवशात सदर अपिलार्थी यांचे जात पडताळणी संदर्भात दुसरे प्रकरण अपर आयुक्त (महसूल) औरंगाबाद यांच्याकडे प्रलंबीत आहे. त्या अपिलाचा अपर आयुक्त महसूल यांनी लवकर निर्णय दिल्यास अपिलार्थीचे हे विचाराधीन प्रकरण लवकर मार्गी लागू शकेल असे आजच्या युक्तिवादावरुन स्पष्ट झाले आहे. उपस्थित अपर आयुक्त (महसूल) यांनी अपिलार्थीचे हे प्रकरण २५ दिवसात निकाली काढण्याचे आयोगास आश्वासन दिले आहे. अपर आयुक्त (महसूल) यांनी हे प्रकरण निकाली काढल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनाही अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देणे शक्य होईल असे त्यांचे म्हणणे आहे. तेव्हा अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी द्यावी असे आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २५ दिवसाच्या आत द्यावी.

३. सचिव (सामाजिक न्याय) यांनी या प्रकरणी जबाबदार असलेले जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे प्रशासकीय कारवाई करावी व आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्याच्या आत सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी आपली जबाबदारी टाळून अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यामध्ये ते अप्रत्यक्षरित्या या घटनेस जबाबदार ठरतात. त्यांच्या अपील टाळण्याच्या वृत्तीची नोंद सचिव (महसूल) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३ ऑगस्ट २००७ — राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विश्वनाथ भागुजी दहे, व्दारा सहाय्यक संचालक, नगर रचना कार्यालय, सावित्रीबाई फुले मार्केट, सावेडी, अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, जालना रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त (महसूल) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (महसूल) विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव (सामाजिक न्याय) विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

८ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ रामाआ/अपील/सिआर/४८२

निर्णय दिनांक २३-०८- २००७.

१. श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, .. अपिलार्थी.
पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स,
जालना रोड, बीड
तालूका जिल्हा-बीड.

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
माजलगाव, जिल्हा-बीड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
तालूका जिल्हा-बीड.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २३-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, माजलगाव यांचे तर्फे ॲड. भगवान राजाराम साबळे (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी बँक, ता.जि.बीड, श्री. आप्पाराव लिंबाजी घोलकर(येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ३०-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे वडवणी तालूक्यातील शेतकरी जिनिंग व प्रेसींग या सहकारी संस्थेच्या संदर्भात, संस्थेची नोंदणी झालेल्या दिनांकापासून ते अपिलार्थीने अर्ज

केलेल्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये — या संस्थेच्या सभासदाची व संस्थेच्या सभासदांची प्रमाणित यादी संस्थेच्या पोटनियमाची प्रमाणित प्रत, संस्थेने सहकारी बॅक व शासनाकडून घेतलेले कर्ज व अनुदान, सदर कर्ज घेतलेली तारीख, कर्जाची परतफेड झाली असल्यास त्याचा तपशील व प्राप्त झालेल्या अनुदानाचा विनीयोग, संस्थेकडे दाखल झालेल्या ऑडिट रिपोर्टची प्रत, जर ऑडिट रिपोर्ट दाखल केला नसेल तर त्यावर केलेल्या कार्यवाहीची / आदेशाच्या प्रमाणित प्रती, संस्थेने ऑडिट रिपोर्ट दाखल केला नसल्यास त्यांच्यावर काय कार्यवाही करणार त्याची माहिती, संस्थेच्या लिलावा संदर्भात जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिलेल्या आदेशाच्या प्रती, संस्थेने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे परवानगी मागणीसाठी केलेल्या अर्जाची व सोबत जोडलेल्या कागदपत्राच्या प्रती, लिलाव प्रक्रिया संदर्भातील लिलाव किती वेळा झाला, लिलावाच्या वेळेस हजर असलेले जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अधिका-यांची नांवे व पदनाम याची यादी व संबंधित सहकारी बँक किंवा शासनाचे हजर प्रतिनिधीची नांवे, संबंधित बॅकेचे नाव व पत्ता, लिलावात प्राप्त झालेल्या राशीच्या विनीयोगा संदर्भातील परिपूर्ण माहिती व लिलावामध्ये ही मालमत्ता ज्यांना देण्यात आली त्या संस्थेचे / व्यक्तींची नावे व पत्ता- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली आहे. अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- १४-११-२००६ रोजी ही माहिती अपिलार्थीस देण्यापोटी एकूण १२००/- रुपये शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १६-११-२००६ रोजी हे पैसे त्यांच्या कार्यालयात जमा केले. तदनंतर त्यांनी दिनांक- २८-११-२००६ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०४-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मुळ माहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम २० (१) अन्वये २५०/- रुपये प्रतिदिन शास्ती लावण्याचे व कलम २० (२) मधील तरतूदी नुसार शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्याची विनंती करुन आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या प्रथम अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-१२-२००६, १९-१२-२००६, २८-१२-२००६ व ०२-०१-२००७ रोजी सुनावणी घेतली. जनअपिलीय अधिकारी यांनी या सुनावणीचे अंतिम आदेश दिनांक ११-०१-२००७ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले आहे व त्याचबरोबर व्यवस्थापक, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती सशुल्क देण्याचे सूचित केले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनूसार दिनांक-१५-०२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० (१) अन्वये २५० रुपये प्रतिदिन शास्ती व कलम २० (२) अन्वये कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर केल्याने शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्याची आयोगास विनंती केली आहे. त्याचबरोबर व्यवस्थापक, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांना कलम ७ (६) मधील तरतुदी प्रमाणे विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, त्यांनी विहित मुदतीत म्हणजेच दिनांक १४-११-२००६ रोजी अपिलार्थीस रुपये १२०० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याबाबत सुचना दिल्या आहेत व अपिलार्थीने सदर शुल्क त्यांच्या कार्यालयात दिनांक- १६-११-२००६ रोजी भरल्यानंतर अपिलार्थीस दिनांक-२८-११-२००६ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहिती पैकी काही माहिती त्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, बीड व जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावयाची होती. या दोन प्राधिकरणापैकी बीड जिल्हामध्यवर्ती सहकारी बँक हे प्राधिकरण त्यांच्या कार्यालयाचा भाग नसून एक वेगळे प्राधिकरण आहे व त्यांना एक स्वतंत्र असे अस्तीत्व आहे. जनमाहिती अधिकारी यांनी सदर बॅकेच्या माहिती अधिका-याकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती मिळविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केल्याचे त्यांनी युक्तिवादाचे वेळी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. या प्रकरणी त्यांनी बँकेस दिनांक- ३०-१०-२००६ रोजी, दिनांक-१६-०८-२००७ रोजी पत्र लिहून माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष लेखा परिक्षकाकडे त्यांनी अपिलार्थीने  त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती दिनांक- २०-११-२००६ व १६-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे मागितली होती. यावरुन त्यांनी अपिलार्थीस द्यावी लागणारी माहिती इतर प्राधिकरणाकडे असतांना देखील त्यांच्याकडून ती माहिती मिळविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यांनी बँकेकडे मागणी केलेल्या प्रथम पत्रावर बँकेने त्यांना असे कळविले की, त्यांच्याकडे  स्वतंत्र माहिती अधिकारी नेमले असून अपिलार्थीने बँकेकडील माहिती करिता बँकेच्या जनमाहिती अधिकारी यांच्याकडे वेगळा अर्ज करावयास हवा.

अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडून वेगवेगळया तीन टप्यामध्ये देण्यात आली आहे. प्रथम माहिती दिनांक- २८-११-२००६ रोजी तदनंतर बँकेने अपिलार्थीस दिनांक २२-११-२००७ रोजी सरळ माहिती पुरविली आहे व शेवटी दिनांक- १८-०८-२००७ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी देखिल बँकेकडून त्यांना दिनांक- १७-०८-२००७ रोजी प्राप्त झालेली माहिती लागलीच पुरविली आहे.

अपिलार्थीने मागितलेल्या लेखापरिक्षणाच्या अहवालाची प्रत जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांच्याशी संबंधित होती. त्यांच्याकडून देखील जनमाहिती अधिकारी यांनी विशेष प्रयत्न करुन दिनांक- २२-०८-२००७ रोजी माहिती प्राप्त करुन घेतली व अपिलार्थीस पाठविली. अपिलार्थीस पुरविलेलया मागणीचे स्वरुप पहाता, अपिलार्थीने मूळअर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आता जनमाहिती अधिकारी व बँकेने पर्णतः पुरविल्याचे दिसून येते.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. अपिलार्थीस जरी त्यांना अपेक्षित माहिती मिळाली असली तरी या प्रकरणी त्यांना माहिती मिळण्यास विलंब झाला आहे, हे निश्चीतपणे दिसून येत आहे. तथापी या विलंबास जनमाहिती अधिकारी यांना संपूर्णपणे जबाबदार धरता येणार नाही. कारण अपिलार्थीने मागितलेली माहिती ही वेगवेगळया प्राधिकरणा संदर्भात होती. त्यातील एक प्राधिकरण हे त्यांच्या प्राधिकरणाचा भाग नसून एक पूर्णतः वेगळे प्राधिकरण होते व त्यास स्वतंत्र अस्तित्व होते. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन कागदपत्रावरुन त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केल्याचे निसंशयःपणे सिध्द होत आहे. त्यामूळे त्यांच्यावर काही कार्यवाही करण्याचे आदेश नाहीत.

तथापि या प्रकरणी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे जनमाहिती अधिकारी यांनी घेतलेली भूमिका माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीशी व त्याच्या मूलभत तत्वाशी

पूर्णपणे विसंगत आहे, असे दिसून येत आहे. वास्तविकतः त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहितीची मागणी केल्यानंतर त्यांना ती त्वरेने देणे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे वेगळा अर्ज करण्याची अपेक्षा केली त्यांच्या या भूमिकेशी आयोग सहमत नाही. तेंव्हा बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या जनमाहिती अधिकारी यांना आयोगातर्फे अशी ताकीद देण्यात येत आहे की, त्यांनी भविष्यात शासनाच्या इतर कोणत्याही प्राधिकरणाकडून माहितीची मागणी प्राप्त झाल्यास संबंधित माहिती त्यांनी त्या प्राधिकरणाकडे विहित वेळेत पुरवावी.

प्रथम अपिलाचा निकाल देतांना जनअपिलीय अधिकारी यांनी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे जनमाहिती अधिका-यास अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे सूचित केले आहे. वास्तविकतः अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांना ही माहिती बँकेकडून / जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विनाशुल्क देणे अधिनियमातील कलम ७ (६) मधील तरतुदी प्रमाणे अभिप्रेत आहे. त्यामूळे या प्रकरणी बँकेकडून माहिती मिळविण्यापोटी अपिलार्थीने बँकेमध्ये जर काही शुल्क जमा केले असेल तर ते अपिलार्थीस बँकेने परत करावे, असे आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती मिळविण्यापोटी जो विलंब झाला आहे, त्यास प्रामूख्याने बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांनी घेतलेल्या अडवणूकीची भूमिका व जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, बीड यांच्याकडून जनमाहिती अधिकारी यांना दिलेले असहकार्य या बाबी दिसून येतात. माहिती विलंबाने पुरविण्यास जे विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, बीड व माहिती अधिकारी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक हे दोन्हीही जबाबदार आहेत, त्यांच्यावर अनुक्रमे विभागीय सहनिबंधक, (लेखा परिक्षक) सहकारी संस्था, औरंगाबाद विभाग आणि विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, (प्रशासन) लातूर विभाग

यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून  तीन महिन्याच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

५. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीस माहिती देण्यापोटी  बीड जिल्हामध्यवर्ती सहकारी बँकेने जर काही शुल्क आकारले असेल तर त्यांनी ते अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत  झाल्या पासून सात दिवसाच्या आत परत करावे.

३. माहिती विलंबाने पुरविण्यास जे विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, बीड व माहिती अधिकारी, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक हे दोन्हीही जबाबदार आहेत, त्यांच्यावर अनुक्रमे विभागीय निबंधक, सहकारी संस्था (लेखा परिक्षक) औरंगाबाद  आणि विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन)लातूर विभाग यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे प्रशासकीय कार्यवाही करुनआपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २३-०८-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.प्रेमचंद गुलाबचंद नहार, पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड तालूका जिल्हा-बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माजलगाव, जिल्हा-

बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ माहिती अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ विशेष लेखा परिक्षक, सहकारी संस्था, बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ विभागीय निबंधक सहकारी संस्था (प्रशासन)लातूर, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाजूला, लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखा परिक्षण) औरंगाबाद,बाळासाहेब पवार सहकार भवन, जुना मोंढा, जाफरगेट जवळ, औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९७

निर्णय दिनांक- २४-०८-२००७.

| | | |
|---|---|---|
| श्री.नहुषकुमार शामराव सेलूकर,<br>देशपांडे गल्ली, अंबाजोगाई<br>तालूका-अंबाजोगाई, जिल्हा-बीड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकार तथा<br>नायब तहसीलदार (महसूल),<br>तहसील कार्यालय, अंबाजोगाई,<br>जिल्हा-बीड. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,अंबाजोगाई, जिल्हा- बीड. | | |

## <u>विवेंचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २४-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.नहुषकुमार शामराव सेलूकर, ( यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी नायब तहसीलदार (महसूल) तहसील कार्यालय, अंबाजोगाई, श्री. सुजीत अंगदराव नरहरे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, श्री. प्रशांत सुरेशराव सूर्यवंशी (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

**ग्रहाह |ह्यEऽhह्र +ह्य{ह्यफ्ह्यह्य।ह्र्यxह्य रह्मम्ह्यह |ह्य।ह्यब्दह्य iग्रह्यह्यहSग्रह्यह्यEbङ्गफ्ह्य ह्यnङ्गxह्यह्यहE- ३०-०५-२००६ ऽह्यVह्यSग्रह्यह्य +Vह्यह्यह +xम्ह्यग्रह्य Vह्यxह्यब्दह्यह्यह्यट्ट iह्य +ह्यvह्यEह्यड्र ग्रह्यह्यहSग्रह्यह्यEbट्ठ, iग्रह्यह्यहSग्रह्यह्य Eह्यग्रह्यह्यहफ्ह्यग्रह्यह्य रह्महnङ्गद्रह्यह्यहiह्य Jह्यह्यफ्ह्यफ्ह्य|ह्यब्दह्यह्यhह्य BEÏh्ह्य २० ब्दह्य।tह्यम्ह्यऽ ब्दह्यह्यह्यट्ट iह्य ब्दह्यह्यह्यMह्यiह्यफ्ह्य ट्ट ह्यiह्य. रह्यnङ्गऽ ब्दह्यह्यह्यट्ट iह्य +ह्य{ह्यफ्ह्यह्य।ह्र्यxह्य म्यह्यHचह्य: +{ह्यह्यIह्यफ्ह्य ट्ट ह्यiह्य.**

" १. तहसील कार्यालयाची रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील.

२ तहसीलचे अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये.

३ निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उतरदायित्व प्रणाली.

४. तहसील कार्यालयाची कर्मचारी स्वतःची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके.

५. मा.तहसीलदार यांच्याकडे असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारीवर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सुचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख.

६. मा.तहसीलदार यांच्याकडे असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण.

७. मा.तहसीलदार यांनी आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील.

८. मा.तहसीलदार आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण आणि त्या मंडळाच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकासाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण.

९. आपल्या अधिका-यांची आणि कर्मचा-यांची निर्देशिका.

१०. आपल्या प्रत्येक अधिका-याला व कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन, तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याची कार्यपध्दती.

११. सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रकमांचा अहवाल.

१२. अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिका-यांचा तपशील.

१३. ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील

१४. इलेक्ट्रानिक स्वरुपात आपल्याकडे उपलब्ध असलेल्या किंवा त्यांच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील.

१५. माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणा-या सुविधांचा तपशील.

१६. जनमाहिती अधिका-यांची अपिलीय अधिका-यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील.

१७. आपल्या कार्यालयात रेकॉर्ड ऑफ राईट (आरओआर) बाबत फेरफार नोंदवही व विवादग्रस्त प्रलंबीत प्रकरणांची एकूण संख्या किती आहे. याबाबत पुढीलप्रमाणे तपशील द्यावा. दहा वर्षाखालील, पाच वर्षाखालील किती प्रकरणे आहेत. सदरील प्रकरणातील सद्यःस्थिती काय आहे याबाबतचा सविस्तर तपशील.

१८. तसेच आर.ओ.आर.ची विवादग्रस्त प्रकरणे किती दिवसात निकाली काढावीत याबाबत कायदेशीर तरतूदीचा तपशील.

१९. विद्यमान मा.तहसीलदार व मा.नायब तहसीलदार (महसूल) यांनी अंबाजोगाई तहसील कार्यालयात रुजू झाल्यापासून त्यांचे समोर असलेल्या आरेओआर प्रकरणांची संख्या व त्यांनी त्यांचे कार्यकाळात किती प्रकरणे निकाली काढली याबाबतचा तपशील.

२०. शेत जमीन महसुली अभिलेखात मालक किंवा भोगवटदार म्हणून नाव असलेली व्यक्ती मरण पावल्यास त्यांचे नावाची नोंद केंव्हा व कशा प्रकारे केली जाते. वारस/ हक्कदाराचे नावांची नोंद घेण्याबाबत कायदेशीर काय तरतूद आहे याबाबतची माहिती द्यावी.."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थी यांचा सदर अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०२-०६-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना ही माहिती देण्याप्रित्यर्थ १४/- रुपये तहसील कार्यालयात भरण्याचे दिनांक- १९-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस मिळाले नसल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असे स्पष्टीकरण देण्यात आले की, त्यांच्या कार्यालयातील शिपाई अपिलार्थी यांच्या घरी सतत दोन वेळेला गेले असता घरातील उपस्थित व्यक्तींने हे पत्र घेण्यास नकार दिला. त्यामूळे त्यांनी शेवटचा पर्याय म्हणून हे पत्र पोष्टामार्फत दिनांक- २७-०६-२००६ रोजी त्यांच्याकडे पाठविले.

सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याच्या पुराव्याप्रित्यर्थ त्यांनी पोष्टाव्दारे हे पत्र अपिलार्थीस दिनांक २७-०६-२००६ रोजी पाठविल्याची पोस्टाची अंडर पोस्टींग सर्टिफिकेटची प्रत आयोगास सादर केली. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार दिनांक- ३१-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीचे सदर अपीलअर्ज जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात मिळाले नसल्याचे जनअपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये स्पष्ट केले. तर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी सदर अपील रजिष्टर पोष्टाव्दारे पाठविले असता, जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने हे पत्र स्वीकारण्यास नकार दिला. जनअपिलीय अधिकारी यांनी अपील स्वीकरण्यास कथित नकार दिल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार दिनांक- १४-०८-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी

यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व कलम २० (२) नुसार कार्यवाही करण्याची विनंती आयोगास केली असून त्याबरोबर अपिलार्थीस झालेला मानसिक व शारिरीक मनस्तापा बद्दल १०,०००/- रुपये इतकी नुकसान भरपाई देण्यासाठी शासकीय अधिका-यास देणे भाग पाडावे, अशी विनंती, पुढे केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांनी आपले म्हणणे लेखी सादर केले आहे. या शपथपत्रामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना तीस दिवसाच्या आत माहिती दिली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. त्यांनी संबंधित जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांचे अपील सादर करण्याकरिता दिनांक- ३१-०७-२००६, ०१-०८-२००६, ०२-०८-२००६ रोजी सतत ती दिवस उपस्थित राहूनही त्यांचा अर्ज स्वीकारण्यास संबंधित कर्मचा-यांनी टाळाटाळ करुन वेळकाढूपणा केला. त्यामुळे त्यांना गावातल्या गावात देखील स्पीड पोष्टाव्दारे त्यांच्याकडे अपील अर्ज पाठवावा लागला. तथापि हा लिफाफा देण्यास पोष्टमन तहसील कार्यालयात गेले असता, संबंधिताने हा लिफाफा घेण्यास नकार दिला. त्याप्रमाणे संबंधित पोस्टमनने आपला अभिप्राय या पाकीटावर नोंदविला आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी स्वंयप्रेरणेने प्रसिध्द करावयाची माहिती देखील अद्यापपर्यंत प्रसिध्द केलेली नाही व जनअपिलीय अधिकारी यांनी अपिल स्विकृत न करुन व सुनावणी न घेऊन आपल्या कर्तव्यात कसूर केल्यामूळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) खाली कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडला की, अपिलार्थी यांची तहसीलदार अंबाजोंगाई या नात्याने बरीच प्रकरणे त्यांच्याकडे प्रलंबीत असून त्यामध्ये

अपिलार्थीस अपेक्षित असलेला निर्णय प्राप्त न झाल्याने ते अशा प्रकारे माहिती मागवून जनअपिलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्रास देण्याच्या उद्देशाने अशा प्रकारच्या कारवाया करीत असतात. जनअपिलीय अधिकारी यांनी केलेले हे आरोप खोटे असल्याचे अपिलार्थी आज सुनावणीमध्ये सांगत आहेत.

दोन्हीहि बाजूचा युक्तीवाद ऐकून घेतला असता, या प्रकरणी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलअर्जावर सुनावणी अत्यावश्यक असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. तेंव्हा असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०७-२००६ रोजीच्या माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपीलावर त्यांनी प्राधान्याने, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून, सात दिवसाच्या आत सुनावणी घेवून आपला निर्णय त्वरीत पारित करावा.जर त्यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान झाले नाही तर ते राज्य माहिती आयोगाकडे या निर्णयाविरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) प्रमाणे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

३. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

४. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा दिनांक ३१-०७-२००६ रोजीच्या माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी प्राधान्याने हे आदेश

निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत सुनावणी घेवून आपला निर्णय त्वरीत पारित करावा.

औरंगाबाद ( वि.बा.बोरगे)
दिनांक- २४-०८-२००७. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

६. श्री.नहुषकुमार शामराव सेलूकर, देशपांडे गल्ली, अंबाजोगाई, जिल्हा-बीड.

७. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) तहसील कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा-बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,अंबाजोगाई,जिल्हा-बीड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

१०. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४१९

निर्णय दिनांक २४-०८-२००७

श्री. रावसाहेब देवराव नाडे, : अपिलार्थी

मु. पो. ढोरकीन, तालुका पैठण

जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता,

दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण

नियंत्रण मंडळ, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रावसाहेब देवराव नाडे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी श्री. महमद मोईजोद्दीन सिध्दीकी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी श्री. चंद्रशेखर वसंतराव तुंगे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पैठण संतपिठाच्या कामाबाबत जून २००६ ते ०१ नोव्हेंबर २००६ पर्यतच्या कालावधीतील, माहिती खालील प्रमाणे मागविली होती.

“ पैठण येथे संतपिठाचे काम चालू आहे. सदर कामात अनेक गैरव्यवहार झालेले आहे. सदर काम हे निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. अनावश्यक ठिकाणी सदर कामातील

निधीचा उपयोग करण्यात आला आहे. त्याची आपल्या गुणनियंत्रण मंडळामार्फत चौकशी करण्याचे मा. सांस्कृतिक मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दिलेल्या चौकशीच्या आदेशानुसार आपल्या कार्यालयाने त्यांना सादर केलेल्या चौकशी अहवालाची आतापर्यत केलेल्या खर्चाच्या तपशीलासह व निकृष्ट काम झाले असेल तर त्या निधीचा दुरुपयोग केला म्हणून संबंधितावर काय कार्यवाही काही याचा संपूर्ण अहवालासह माहिती मिळणेबाबत."

सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०३-११-२००६ रोजी प्राप्त झाला असून अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-११-२००६ च्या पत्रान्वये प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी संदर्भित केलेल्या कामाच्या चौकशीची कारवाई प्रगतीत आहे असे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दिनांक २७-१२-२००६ रोजी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी म्हणजे दिनांक २७-१२-२००६ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये सदर कामाची चौकशी चालू असून चौकशीचे काम पूर्ण झाल्यानंतर अपिलार्थीस या संदर्भात अवगत करण्यात येईल असे आश्वासीत केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन

माहिती अधिकारी यांनी त्यांना माहितीपासून वंचित ठेवल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडला की, त्यांना ही माहिती व्यापक जनहित साधण्यासाठी हवी असून, त्यांनी या कामासाठी मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांनी चौकशी करण्याचे आदेश देऊनही एक वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही अद्यापपर्यंत चौकशी झाली नसल्याचे आयोगास निदर्शनास आणून दिले आहे. पैठण येथील संतपिठाच्या कामासंदर्भातील ही चौकशी आहे. सार्वजनिक बांधकाम विभागा-तील दक्षता व गुण नियंत्रण मंडळाने चौकशी प्रक्रियेस विहीत मुदतीपेक्षा जास्त कालावधी लावल्याने या वाढीव कालावधीतील संबंधीत कर्मचा-यांनी / अधिका-यांनी केलेला कथित गैरव्यवहार आता कदाचित उघडकीस येऊ शकणार नाही असे त्यांना वाटते. म्हणून ही माहिती त्यांना शक्यतो लवकरात लवकर उपलब्ध व्हावी असे त्यांचे प्रयत्न आहे. या दृष्टीकोनातून, त्यांनी ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमाचा असा वापर करुन मिळण्याचा प्रयत्न केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून असा युक्तिवाद मांडला गेला की, मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांनी पैठण संतपिठाच्या कामाला दिनांक २८-०७-२००६ रोजी भेट देऊन या विषयावर चर्चा करण्याकरिता एक बैठक घेतली होती. या बैठकीच्या इतिवृत्तांतामध्ये संतपीठ इमारतीच्या व रस्त्याच्या बांधकामाच्या दिनांक २८-०७-२००६ पर्यंत करण्यात आलेल्या कामाची तपासणी करुन ते काम योग्य प्रकारे झाले आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांचे मार्फत त्यांना सादर करण्याचे अधीक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण यांना सूचित केले होते. त्याप्रमाणे या कामाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७ ऑगस्ट २००७ रोजी तपासणी केली असून तपासणी अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकून घेतला असता असे दिसून येते की, मंत्रीमहोदय (सांस्कृतिक कार्य) यांनी पैठण येथील संतपीठ कामाची तपासणी अधीक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ यांच्यामार्फत करुन घेऊन हे काम योग्य प्रकारे झाले आहे किंवा कसे या बाबतचा अहवाल त्यांच्याकडून मागविला होता. मंत्रीमहोदयांच्या या कामाची चौकशी करण्याच्या निर्णयासंदर्भातील आदेशाबाबत दैनिक लोकमत यांच्या दिनांक ३१-०७-२००६ च्या औरंगाबाद आवृत्तीमध्ये बातमी प्रसिध्द झाली आहे. या अपिलाच्या आधारे अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या कडे माहिती मागविली होती. जन अपिलीय अधिकारी यांनी वर उल्लेख केल्याप्रमाणे या कामाला दिनांक १७-०८-२००७ रोजी प्रथम भेट देऊन आपला पाहणी अहवाल तयार करण्याचे काम सुरु केल्याचे आज रोजी केलेल्या युक्तिवादात आढळून आले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २१-११-२००६ च्या पत्रामध्ये व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-१२-२००६ च्या सुनावणी आदेशामध्ये चौकशी चालू असल्याचा उल्लेख केला आहे. जर अधीक्षक अभियंता यांनी या कामास मंत्रीमहोदयांच्या सुचनेनंतर दिनांक १७-०८-२००७ रोजी प्रथम भेट दिली तर गेल्या वर्षभराच्या कालावधीमध्ये काय चौकशी केली असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता ते आयोगास समाधानकारक खुलासा करु शकले नाहीत. या कालावधीमध्ये संबंधीत कार्यकारी यंत्रणेकडून ते माहिती गोळा करत असल्याची माहिती त्यांनी आयोगास दिली तथापि या पुष्ट्यर्थ संबंधीत यंत्रणेस पाठविलेल्या एखाद्या पत्राचा संदर्भ ते आज आयोगास सादर करु शकले नाहीत. या सर्व घडमोडीवरुन व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुरुवातीची जी माहिती दिली ती दिशाभूल करणा-या स्वरुपाची होती. त्याच बरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रत्यक्ष वस्तुस्थितीची पाहणी न करता, वस्तुस्थिती जाणून न घेता अपिलार्थीस कळविले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाने एक प्रकारे अपिलार्थीस खरी माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आता हा तपासणी अहवाल ते येथून पुढे १५ दिवसात पूर्ण करुन मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांना अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांच्यामार्फत पाठविणार असल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले. त्याच बरोबर सदर तपासणी अहवाल अपिलार्थीस विनामूल्य देण्यास ते तयार आहेत.

उपरोक्त घटनाक्रम व वस्तुस्थिती पाहता असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सत्य माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्यामुळे त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून या सक्त ताकीदीची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घ्यावी असे अधीक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ यांना पुढे सूचित करण्यात येत आहे. दिशाभूल करणारी माहिती देण्याच्या त्यांच्या या प्रवृत्तीचा बिमोड करण्याच्या दृष्टीने त्यांना ही सक्त ताकीद देण्यात येत आहे. (२) सदर कामाच्या तपासणीचा अहवाल अधीक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ यांनी १५ दिवसाच्या आत तयार करुन, साक्षांकीत तपासणी अहवाल अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अधीक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ यांनी १५ दिवसाच्या आत तपासणी चा अहवाल तयार करुन, साक्षांकीत तपासणी अहवाल अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सत्य माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्यामुळे त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून या सक्त ताकीदीची नोंद अधीक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ यांनी जन माहिती अधिकारी यांच्या सेवा पुस्तकात घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रावसाहेब देवराव नाडे, मु. पो. ढोरकीन, तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद
२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४१३

निर्णय दिनांक २८-०८-२००७

मे. प्रिंट-एन-कोट, : अपिलार्थी

बी-१०, एम. आय. डी. सी. चिकलठाणा,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य

वित्तीय महामंडळ, महावीर भवन, स्टेशन रोड,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुख्य
कार्यालय, युनायटेड इंडिया बिल्डींग, मुख्य
कार्यालय, १ ला मजला, सर पी. एम. रोड,
(आर. बी. आय. जवळ),
मुंबई – ४०० ००१

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी यांच्या वतीने श्री. रामप्रकाश राजाराम मंत्री (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, श्री. विजय पुंडलीक बोडके (यापुढे त्यांना जन माहिती

अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीमध्ये प्रथमच अपिलार्थी यांच्यातर्फे आयोगाकडे एक अर्ज सादर करण्यात आला असून त्यामध्ये त्यांनी राज्य माहिती आयोगाला, त्यांचे व्दितीय अपील मागे घेण्याची परवानगी मागितली आहे. अपिलार्थी यांची संबंधीत प्राधिकरणाबरोबर "एक रकमी कर्जफेड" या योजनेखाली तडजोड झाली असून त्यांना आवश्यक ती माहिती मिळाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मागे घेण्याची विनंती केली आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येत असून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे दिनांक १८-०७-२००६ चे व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ मे. प्रिंट-एन-कोट, बी-१०, एम. आय. डी. सी. चिकलठाणा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, महावीर भवन, स्टेशन रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. विजय पुंडलीक बोडके, व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुख्य कार्यालय, युनायटेड इंडिया बिल्डींग, फोर्ट, मुंबई – ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक्ष्ठ, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुख्य कार्यालय, युनायटेड इंडिया बिल्डींग, मुख्य कार्यालय, १ ला मजला, सर पी. एम. रोड, (आर. बी. आय. जवळ), मुंबई – ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४७०

निर्णय दिनांक २८-०८-२००७

श्री. मनोहरराव किशनराव तरटे, : अपिलार्थी

“गिरीमाहूर”, १२-शारदाश्रम सहकारी

गृहनिर्माण संस्था, पैठणगेट, निराला बाजार

मार्ग, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप आयुक्त (प्रशासन), आयुक्त

महानगरपालिका यांचे कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मनोहरराव किशनराव तरटे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना महानगरपालिका श्री. रविंद्र दत्तात्रय जोशी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग महानगरपालिका हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९ मार्च २००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शारदाश्रम सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सुधारीत लेआऊटची प्रत, इमारत बांधकाम परवानगी घेत असतांना वापरावयाची पध्दती व चटई क्षेत्र निर्देशांक, (क्षेत्रनिहाय) या विषयावरील १२ ऑगस्ट १९६७ या दिवसाच्या कालावधीतील खालील प्रमाणे ५ मुद्यावर माहिती मागितली होती.

१) “ शारदाश्रम सहकारी गृहनिर्माण संस्थेची (नोंदणी क्रमांक २५३, दिनांक २०-०५-१९६०, पैठणगेट) महानगरपालिकेने त्यांचे आदेश क्रमांक एम्. सी.

कॉन-एआर-१४४/६७ दिनांक १२-०८-१९६७ रोजी मंजूर केलेल्या सुधारीत लेआऊटची साक्षांकीत प्रत,

२) इमारत बांधकामाची परवानगी मागतांना लागणा-या कागदपत्रांची यादी,

३) अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये,

४) औरंगाबाद महानगरपालिकेतील कोणता भाग गावठाण क्षेत्रामध्ये मोडतो ? बांधकामाची परवानगी देतांना किती चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे ? क्षेत्रनिहाय तपशील कृपया देण्यात यावा.

५) गावठाण क्षेत्राच्या बाहेर परंतु महानगरपालिका हद्दीत कोणती क्षेत्रे येतात ? व या क्षेत्रामध्ये इमारत बांधकामाची परवानगी देतांना किती चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे ? क्षेत्रनिहाय तपशील कृपया द्यावा.''

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०४-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या पाचही मुद्दयांवर माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि वरील उत्तराने समाधान झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०६-२००६ रोजी घेऊन त्याच दिवशी आपला निर्णय पारीत केला. यामध्ये अपिलार्थीस, सशुल्क माहिती पुरविण्याविषयी जन माहिती अधिकारी यांना सूचना दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. यामध्ये त्यांनी आपल्या मूळ

माहितीची मागणी कायम ठेऊन ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे निःशुल्क पुरवण्यात यावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने असा युक्तिवाद मांडला की, त्यांनी त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहीत कालावधी मध्ये मिळालेली नाही. अपिलार्थीने केलेल्या प्रथम अर्जावर त्यांना दिनांक ०८-०४-२००६ अखेर अगर तत्पुर्वी माहिती मिळणे अपेक्षीत होते तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०४-२००६ रोजी म्हणजे माहिती देण्याची मुदत संपून गेल्यानंतर २१ दिवस इतक्या विलंबाने त्यांना या संदर्भात काही माहिती दिली आहे. विहित मुदत संपून गेल्याने त्यांना अपेक्षीत असलेली माहिती आता मोफत मिळावी असा युक्तिवाद मांडला. जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०४-२००६ च्या पत्रान्वये माहिती पुरविलेली आहे. तथापि अपिलार्थीचे त्यावर समाधान झाले नसेल तर अपिलार्थीने मागितलेली इतर पूरक माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असून ते आजही ते अपिलार्थीस ती माहिती देण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक २९-०४-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस जरी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे तरी ती निश्चित स्वरुपाची नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ३ ह्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ उप कलम २ अन्वये स्वंयप्रेरणेने घोषीत करावयाचा भाग आहे. तथापि महानगरपालिकेने स्वंयप्रेरणेने घोषीत करावयाच्या १७ कलमांवर माहिती घोषीत केली आहे किंवा कसे या संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना माहीत नाही. वास्तविक १५ ऑक्टोंबर २००५ पुर्वी अशा प्रकारच्या स्वंयप्रेरणेने घोषीत करावयाची माहिती

महानगरपालिकेच्या वेबसाईटव्दारे, छापील पुस्तिकेव्दारे किंवा इतर माध्यमातून जनतेस उपलब्ध करुन देणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य महानगरपालिकेने पार पाडलेले दिसून येत नाही. तेव्हा आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (२) प्रमाणे अभिप्रेत असलेली सर्व १७ मुद्दयावरील माहिती त्यांच्या वेबसाईटवर (वेबसाईट असल्यास ) अथवा छापील पुस्तिकाव्दारे किंवा इतर माध्यमातून हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १० दिवसाच्या आत प्रसिध्द करावी.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ४ व ५ संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्यातर्फे असा मुद्दा मांडला की त्यांच्याकडे औरंगाबाद महानगरपालिकेचा सुधारीत विकास योजनेचा नकाशा उपलब्ध आहे. अपिलार्थी हे यांच्या कार्यालयात गेल्यास त्यांना तो पाहता येईल व त्या नकाशावरुन त्यांना आवश्यक असलेल्या नोंदी ते घेऊ शकतील किंवा या विकास योजना नकाशाची नील प्रतही ते अपिलार्थी यांना देण्यास तयार आहेत. या प्रती प्राप्त झाल्यावर त्या नील प्रतीवर अपिलार्थीने त्यांना आवश्यक त्या नोंदी करुन घ्याव्यात असा त्यांनी प्रस्ताव मांडला.

वरील प्रमाणे युक्तिवाद ऐकल्यानंतर व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात ठोस व निश्चित स्वरुपाची माहिती स्पष्टपणे न देता सर्वसाधारण स्वरुपात देऊन अपिलार्थीस अपेक्षित विशिष्ट माहिती दिली नाही - अपिलार्थीस त्यांना हवी असलेली माहिती विहित मुदतीत मिळणे हा माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये त्यांचा हक्क आहे. त्यांच्या हक्काची जपणूक करणे हे आयोगाचे कर्तव्य आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सरळ व स्पष्ट माहिती न देण्याची कारणे त्यांच्याकडे आज उपलब्ध नाहीत. कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणकडे नागरिकाने माहिती मागितल्यास, त्याला ती माहिती कशी देता येणार नाही याकडेच प्राधिकरणातील अधिका-यांचा

सर्वसाधारणतः कल असतो. हे प्रकरण अशा अनेक प्रकरणापैकी एक असून या परिच्छेदात वर उल्लेखिल्याप्रमाणे जन सामान्यांच्या अधिकारितेची जपणूक करण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की :

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती,हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

२. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (२) प्रमाणे अभिप्रेत असलेली सर्व १७ मुद्दयावरील माहिती त्यांच्या वेबसाईटवर (वेबसाईट असल्यास ) अथवा इतर माध्यमांव्दारे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १० दिवसाच्या आत जनसामान्यंकरिता उपलब्ध करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (२) प्रमाणे अभिप्रेत असलेली सर्व १७ मुद्दयावरील माहिती त्यांच्या वेबसाईटवर (वेबसाईट असल्यास ) अथवा इतर माध्यमाव्दारे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १० दिवसाच्या आत जनसामांन्यकरिता उपलब्ध करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनोहरराव किशनराव तरटे, "गिरीमाहूर", १२-शारदाश्रम सहकारी गृहनिर्माण संस्था, पैठणगेट, निराला बाजार मार्ग, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), आयुक्त महानगरपालिका यांचे कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/३२१

निर्णय दिनांक- २९-०८-२००७.

श्रीमती रजनी शामराव सेलूकर, : अपिलार्थी
देशपांडे गल्ली, अंबाजोगाई
तालूका-अंबाजोगाई, जिल्हा-बीड

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी

नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय, अंबाजोगाई,
जिल्हा-बीड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,अंबाजोगाई, जिल्हा- बीड.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २९-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती. रजनी शामराव सेलूकर, ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी नायब तहसीलदार (महसूल) तहसील कार्यालय, अंबाजोगाई, श्री. सुजीत अंगदराव नरहरे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, श्री. प्रशांत सुरेशराव सूर्यवंशी (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

दिलेल्या मानसिक व शारिरीक मनस्तापा बद्दल १०,०००/- रुपये इतकी नुकसान भरपाई देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर शपथपत्राव्दारे व प्रत्यक्षतः त्यांचे म्हणणे मांडले आहे त्यांच्या म्हणण्यानूसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी त्यांच्या पत्नीच्या नावाने त्यांच्या कार्यालयात पूर्वी वेगळया प्रकरणा संदर्भात अर्ज करुन हस्तगत केली आहे. त्यांनी या प्रकरणाशी संदर्भीत माहिती मिळण्यापोटी आवश्यक ते शुल्क भरण्याचे पत्र अपिलार्थीस पाठविले असता, ते विनातामिली परत आले व तेच पत्र दिनांक- २७-०६-२००६ रोजी अपिलार्थीस पाठवून देखील त्या पत्रास अपिलार्थीने

कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्याचबरोबर अपिलार्थी व त्यांचे कुटूंबीय हे वारंवार अर्ज करुन वेगवेगळया प्रकारची माहिती वारंवार मागवित असतात, त्यांच्या कार्यालयातील अभिलेख शाखेकडूनही अपिलार्थी अशा प्रकारची मागणी करुन, त्यांच्या या कृतीव्दारे ते अधिका-यावर एक प्रकारे दडपण आणण्याचा प्रयत्न करीत असतात. जनमाहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती तयार असून देखील ती घेवून न जाता माहिती मिळविण्यासाठी अपिलार्थी अपीलाच्या मार्गाचा अवलंब हे करीत आहेत.

अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात तयार केलेली कागदपत्रे ही बनावट असून त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे पत्र आजतागायत प्राप्त झाले नाही. तसेच त्यांना जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून या अर्जात विनंती केलेली कोणत्याही प्रकारची माहिती आजतागायत मिळालेली नाही.

सुनावणीच्या या टप्यावर जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी हे एकाच शहरात राहूनही एकमेंकाची पत्रे प्राप्त न झाल्याची विधाने करीत आहेत. तसेच एकमेकावर आरोप प्रत्यारोप करीत आहेत. सुनावणीच्या या टप्यावर जनअपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार अपिलार्थीच्या प्रथम अपीलावर त्वरीत सुनावणी घेवून आपला आदेश देणे उचित राहील, असे आयोगास वाटते. तेंव्हा या प्रकरणी असे आदेशित करण्यात येते की, जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक- ३१-०७-२००६ रोजीच्या प्रथम अपीलावर दिनांक- ०१-०९-२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घ्यावी व आपला सुनावणीचा निर्णय त्यांनी त्यानंतर सात दिवसाच्या आत पारीत करावा. अपिलार्थीचे जनअपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयावर अपील करावयाचे झाल्यास त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे आपले अपील दाखल करता येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

५. अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

६. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक- ३१-०७-२००६ रोजीच्या प्रथम अपीलावर दिनांक- ०१-०९-२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घ्यावी व आपला सुनावणीचा निर्णय त्यांनी त्यानंतर सात दिवसाच्या आत पारीत करावा.

औरंगाबाद ( वि.बा.बोरगे)
दिनांक- २९-०८-२००७. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

११. श्रीमती रजनी शामराव सेलूकर, देशपांडे गल्ली, अंबाजोगाई, जिल्हा-बीड.

१२. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) तहसील कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा-बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१३. जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,अंबाजोगाई,जिल्हा-बीड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

१५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३९०

निर्णय दिनांक २९-०८-२००७

श्री. आत्माराम जगन्नाथ चौधरी, : अपिलार्थी

(प्रा.शिक्षक) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,

नंदगाव पो. तासखेडा, तालुका अमंळनेर,

जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा चेअरमन, गुरुकुल सहकारी गृहनिर्माण

संस्था, मर्या.

व्दारा , ३८, महावीर कॉलनी, चोपडा

जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सहाय्यक निबंधक,

सहकारी संस्था, चोपडा, तालुका चोपडा,

जिल्हा जळगाव

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. आत्माराम जगन्नाथ चौधरी, चोपडा हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, गुरुकुल सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या. यांचे वतीने त्यांचे वकील श्री. सुनिल अनंतराव कुलकर्णी व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्री. जितेंद्र गुलाबराव कंडारे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे गुरुकुल सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या. चोपडा या संस्थेची संस्था नोंदणीपासून ते अपिलार्थीने अर्ज केलेल्या दिनांकापर्यंतची एकूण ११ मुद्दयावर माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये –

" सदर गृहनिर्माण संस्थेचे प्रवर्तक व चेअरमन यांनी नोंदणीसाठी केलेला अर्ज नियम ४ (१) नमुना-अ, या नमुन्यात केलेल्या अर्जाची प्रमाणित नक्कल, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, संस्थेच्या उपविधीची नक्कल, उपविधीत सुधारणा झालेली असल्यास त्याची प्रमाणित नक्कल, संस्थेच्या हिशोब तपासणीचे ज्ञापन, संस्थेच्या दरवर्षाच्या आज अखेरपर्यंतची ताळेबंद नक्कल, वास्तुशास्त्रांनी प्रमाणित केलेली घरांची अंदाजित किंमतीची प्रत, संस्थेने आजतागायत घेतलेल्या सभा अजेंड्याच्या नकला, त्यामध्ये प्रोसिडींगच्या नकला, संस्थेच्या सदर बांधकामा-करिता नेमलेल्या कन्स्ट्रक्शन कंपनीचे नांव, अभियंत्यांची नांवे व पत्ते व त्यांच्या नेमणुकीच्या ठरावाची माहिती, संस्था चेअरमन, सचिव व कार्यकारी मंडळाची प्रमाणित यादी व संस्थेने

सभासदांना केलेल्या प्लॉट वाटपाचे क्षेत्रफळनिहाय तपशील व संबंधीत प्लॉटधारकांचे नांव – '' या माहितीचा समावेश होता.

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

सदर अर्ज अपिलार्थीने विलास बळीराम पाटील चेअरमन गुरुकुल सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या. तथा शासकीय माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने दिनांक ३०-११-२००५ रोजी सादर केला होता. रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेले सदर टपाल, ''मालक घेत नाही सबब पाठविणा-यास परत'' असा शेरा नोंदवून पोस्टाने परत केल्यामुळे अर्जदार यांना आवश्यक असलेल्या संदर्भातील माहिती मिळण्याप्रित्यर्थ त्यांनी दिनांक २०-०१-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०२-२००६, १५-०२-२००६, २१-०२-२००६ व २८-०२-२००६ रोजी घेऊन नंतर आपले अंतीम आदेश दिनांक ०३-०३-२००६ रोजी पारीत केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या आदेशामध्ये अपिलार्थीस अनुक्रमे ०१ ते ११ मुद्दयाची माहिती दिलेली आहे असे नमूद करुन प्रस्तुत अपील करण्याचे अपिलार्थीस कोणतेही कारण घडले नसल्याचे नमूद करुन अपिलार्थीचे अपील खारीज केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार दिनांक २२-०५-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांचा माहिती मिळण्यासाठीचा अर्ज त्यांनी स्विकृत न केल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी २५० रुपये शास्ती लावण्याची कारवाई करावी व त्यांना अपिलार्थीस सर्व माहिती विनामूल्य देण्यास भाग पाडावे अशी विनंती केली आहे. त्याच बरोबर अपिलार्थीस

आयोगाकडे केलेल्या अपील अर्जाबाबत झालेल्या ५००० रुपये इतक्या खर्चाची नुकसान-भरपाई मंजूर करावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी गैरहजर आहेत. आयोगाकडे त्यांनी आपले म्हणणे दिनांक २८-०६-२००७ रोजी लेखी स्वरुपात सादर केले आहे. अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या या पत्रकामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम १८ (१) (क), (ग), (ड), (च) तसेच कलम (इ), (क), (ड) कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे ते व्यथित झाल्याने सदरचे अपील अर्ज आयोगाकडे सादर केले आहे असे म्हटले आहे. या पत्रकामध्ये अपिलार्थीने त्यांना मिळालेली माहिती चुकिची, खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे पुढे म्हटले आहे. या अर्जामध्ये त्यांनी अंतीमतः त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोफत मिळावी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांच्यावर माहिती अधिकारी अधिनियम २००५ अन्वये कलम २० (१), (२) च्या तरतुदीनुसार कारवाई करावी व अपिलार्थीस या अपील अर्जासंदर्भात झालेला खर्चापोटी रुपये ५००० ही नुकसानभरपाई मंजूर करावी अशी आयोगास विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडला गेला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती एकूण ३ टप्प्यामध्ये दिलेली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपोटी मुद्दा क्रमांक १ ते ४ पूर्ण व ३ अंशतः या मुद्दयावरील माहिती अपिलार्थी यांना दिनांक १५-०२-२००६ रोजी दिलेली आहे. मुद्दा क्रमांक ६, ७ च्या संदर्भात दिनांक २१-०२-२००६, मुद्दा क्रमांक १० व ११ संदर्भातील माहिती २१-०२-२००६ रोजी दिली आहे तर मुद्दा क्रमांक ८ व ९ या संदर्भातील माहिती अपिलार्थीस दिनांक २८-०२-२००६ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीने सदर संस्थेकडे हिशोब तपासणीच्या ज्ञापनाची नकल मागितली होती तथापि संस्थेची हिशोब तपासणी आजतागायत झाली नसल्याने त्याची नक्कल देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे व त्याप्रमाणे

अपिलार्थीस तोंडी सांगितले आहे. आता त्यांनी या मुद्दयावरील सद्यस्थिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ दिवसाच्या आत सद्यस्थिती कळवावी.

अपिलार्थीस वेगवेगळ्या टप्प्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे माहिती पुरविली असल्याचे या प्रकरणी दिसून येते तथापि ही माहिती अपिलार्थीस विलंबाने प्राप्त झाली हे निश्चित. अपिलार्थीस संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था चोपडा यांनी प्रचलीत सहकार अधिनियमाप्रमाणे योग्य ती प्रशासकीय कारवाई करणे उचीत ठरेल. त्याच बरोबर या संस्थेची जी कागदपत्रे गहाळ झाली आहेत त्या संदर्भात संबंधीत पोलीस स्टेशनकडे त्याची संस्थेने तक्रार नोंदवावयास हवी तथापि त्यांनी त्याप्रमाणे कारवाई केल्याचे दिसून येत नाही. तेव्हा सदर संस्था त्यांच्या गहाळ झालेल्या सर्व कागदपत्रासंबंधी संबंधीत पोलीस स्टेशनकडे तक्रार नोंदवील याची खात्री सहाय्यक निबंधक सहकारी संस्था चोपडा यांनी करुन घ्यावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये वेळोवेळी त्यांना पुरविण्यात आलेली माहिती ही खोटी असल्याचा उल्लेख केला आहे. तेव्हा अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीतील सत्यसत्यता पडताळण्याच्या दृष्टीने संस्थेकडील संपूर्ण अभिलेखे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था चोपडा यांनी त्यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत मागवून घ्यावे व त्याच वेळी अपिलार्थीसही बोलावून हे अभिलेखे अपिलार्थीस पाहण्यासाठी त्यांनी उपलब्ध करावे.

अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये वारंवार माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ मधील तरतुदींचा भंग झाल्यामुळे असा उल्लेख केला आहे व त्यामुळे त्यांनी कलम १९ (३) खाली राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे असे म्हटले आहे. वस्तुतः माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ मध्ये राज्य माहिती आयोगा कडे वेळोवेळी प्रयत्न करुनही माहिती मिळण्यापासून एखाद्या व्यक्तिला वेगवेगळ्या प्रकारे

वंचित ठेवले असल्यास वा माहिती न दिल्यास त्या व्यक्तिकडून ज्या तक्रारी दाखल होतील त्या तक्रारीसंदर्भात चौकशी करावयाच्या कार्यवाही संदर्भातील तरतुदी आहेत. कलम १८ च्या तरतुदींचा भंग झाल्यामुळे अपिलार्थी कलम १९ खाली राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करु शकत नाही कारण मूलतः कलम १९ व कलम १८ या दोन्ही कलमातील तरतुदी या पुर्णतः भिन्न असून याचा वापर दोन वेगवेगळ्या परिस्थिती मध्ये करावयाचा आहे. कलम १८ व कलम १९ मधील तरतुदी एकमेकाशी संबंधित नाहीत. याच बरोबर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती_लावण्याची, व प्रशासकीय कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची सदर विनंती आयोगास मान्य करता येणार नाही कारण जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची अथवा त्यांची विभागीय चौकशी करण्याची आधिकारिता आयोगास नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या अपिलाची सुनावणी पाहता त्यामध्ये त्यांनी कोणत्याही प्रकारच्या नियमाचे उल्लंघन किंवा वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केल्याचे आयोगास आढळून येत नाही. केवळ अपिलार्थीने त्यांची मागणी मान्य न झाल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द शास्तीची कारवाई करण्याची आयोगाकडे विनंती केली आहे ती वर उल्लेख केलेल्या कारणामुळे फेटाळून लावण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था चोपडा यांनी गुरुकुल सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या. चोपडा या संस्थेकडून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती संदर्भातील सर्व

नस्त्या त्यांच्या कार्यालयात मागवून घेऊन त्या अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्याव्यात.

३. जन माहिती अधिकारी गुरुकुल सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या. चोपडा यांच्यावर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी महाराष्ट्र सहकार कायदा १९६० मधील प्रचलीत तरतुदीप्रमाणे कारवाई करावी.

४. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. आत्माराम जगन्नाथ चौधरी, (प्रा.शिक्षक) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नंदगाव पो. तासखेडा, तालुका अमंळनेर, जिल्हा जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, गुरुकुल सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या. व्दारा , ३८, महावीर कॉलनी, चोपडा जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चोपडा, तालुका चोपडा, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चोपडा, तालुका चोपडा, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रा-तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/४०२

निर्णय दिनांक- २९-०८-२००७.

श्री.सदाशिव सटवा रायबोले : अपिलार्थी
सरस्वती कॉलनी किनवट, जिल्हा- नांदेड.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी,जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालय, नांदेड. : प्रतिवादी

२. जनअपिलीय अधिकारी तथा
कृषि उपसंचालक,
जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी, नांदेड.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २९-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी यांचे वतीने ॲड. जी.एम.रायबोले ( यापुढे

त्यांना  अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी सहाय्यक प्रशासन अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय,नांदेड, श्री.नथ्थुजी बाळकृष्ण कोळपवार  (यापुढे त्यांना  जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा कृषि उपसंचालक, श्री.अ.रा.हसनाबादे (यापुढे त्यांना  जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल)  हे हजर आहेत.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही नांदेड जिल्हयातील एकूण १६ तालुक्याशी संबंधित असून  विस्तृत स्वरुपाची व सहा वर्षाची अशी आहे. नांदेड जिल्हयामध्ये सन २००६ मध्ये अतिवृष्टि व महापूर आल्यामूळे शेतक-यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नूकसान झाले. या नूकसानभरपाई संदर्भात अनुदान वाटपाचे काम त्यांनी प्राधान्यानी केल्याने त्यांना माहिती संकलित करुन देण्यासाठी विलंब झाला आहे. ही माहिती १६ वेगवेगळया तालुक्याकडून एकत्रित करुन अपिलार्थीस देणे, हे जिकरीचे काम होते. तथापि अंतिमतः त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिनांक- ०६-०२-२००७ रोजी रजिष्टर पोष्टाने पाठविली आहे. या पृष्ठयर्थ त्यांनी सदर माहिती अपिलार्थीस रजिष्टर केल्याची पोष्टाची पावती दाखविली. या पोष्टाच्या पावतीचा क्रमांक ४४०३, दिनांक- ०६-०२-२००७ असा आहे. सदर माहिती दिनांक- ०६-०२-२००७ रोजीच अपिलार्थीस पाठविल्याचे यावरुन सिध्द होत आहे.

अपिलार्थी यांचा असा युक्तीवाद आहे की, त्यांनी मागितलेली माहिती ही जिल्हास्तरीय कार्यालयात उपलब्ध असतांना माहिती अधिका-याने सर्व तालुक्याकडून ही माहिती मागविणे गरजेचे नव्हते. त्यांना ही माहिती ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस देणे सहज शक्य होते. कारण ही  माहिती जिल्हास्तरावर एकत्रीत स्वरुपात ठेवलेली असते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद ऐकला असता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रशासकीय विभाग प्रमूख म्हणून संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात असणे क्रमप्राप्त आहे. कारण या कामाचे संनियंत्रण (मॉनिटीरिंग) करतांना अपिलार्थीने मागितलेल्या सर्व कामांच्या तपशिलाची माहिती त्यामध्ये समाविष्ट होणे स्वाभाविक आहे. तथापि अपिलार्थी यांना जनमाहिती अधिकारी किंवा जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी यांना विहित मुदतीमध्ये माहिती देण्यामध्ये काय अडचणी होत्या, हे निश्चीतपणे समजू शकले नाही. तथापि अपिलार्थीने एकूण सहा वर्षाची व १६ तालुक्यातील विस्तृत स्वरुपाची माहिती मागविली, हेही तितकेच खरे आहे. आता शासकीय कार्यालयामध्ये संगणकाचा वापर मोठया प्रमाणात केला जात असल्यामूळे अपिलार्थीने विचारलेली माहिती जनमाहिती अधिका-यास संगणकात इतर सर्व बारीक तपशिलासह साठवून ठेवणे सहज शक्य आहे. जेणेकरुन शेती विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयामध्ये अशा प्रकारची माहिती ज्या नागरीकाला आवश्यक आहे त्या नागरीकाला देणे सहज शक्य होईल.

त्यामूळे जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी महापूराचे दिलेले कारण या प्रकरणी लागू होत नाही व अपिलार्थीस त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील विहित मुदतीनंतर ४५ दिवस इतक्या उशिराने माहिती दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील ५ (५) मधील तरतूदीनूसार माहिती अधिका-यास संबंधित माहिती देण्यास जे इतर जनमाहिती अधिकारी आहेत तेही या अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना विलंबाने देण्यास तितकेच जबाबदार ठरतात. सबब असे आदेशित करण्यात येते की, सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई यांनी या प्रकरणी ज्या जनमाहिती अधिका-याकडून अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यामध्ये विलंब झाला आहे, अशा सर्व जनमाहिती

अधिका-यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी व आयोगास आपला अहवाल हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीन महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

७. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

८. सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई यांनी या प्रकरणी ज्या जनमाहिती अधिका-याकडून अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यामध्ये विलंब झाला आहे, अशा सर्व जनमाहिती अधिका-यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी व आयोगास आपला अहवाल, हे आदेश प्राप्त झाल्यापासून, तीन महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि.बा.बोरगे)
दिनांक- २९-०८-२००७. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

१६. श्री.सदाशिव सटवा रायबोले, सरस्वती कॉलनी, किनवट, जिल्हा- नांदेड.

१७. जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१८. जनअपिलीय अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कार्यालय, नांदेड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१९. सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२०. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

२१. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४४३

निर्णय दिनांक २९-०८-२००७

श्री. सुधीर मारोती जोर्वेकर, : अपिलार्थी
जुनी गिरमे चाळ, कोपरगाव, तालुका
कोपरगाव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक,
मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,
अकोले, तालुका अकोले,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा प्राचार्य,

मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,

अकोले, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सुधीर मारोती जोर्वेकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय श्री. सुरेश पर्वतराव देशमुख (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, श्री. शांताराम सतू गजे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००६ चे पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राध्यापक चंद्रकांत मारोती जोर्वेकर यांनी त्यांच्या संस्थेत केलेल्या रजेच्या मुदतीतील कामासंबंधी व इतर विषयावर खालील प्रमाणे एकूण सहा मुद्यावर माहिती मागितली होती.

१. “ प्राध्यापक श्री. चंद्रकांत मारुती जोर्वेकर यांच्या संदर्भात मी दिनांक ०७-११-२००५ रोजी माहितीच्या अधिकारा अंतर्गत आपल्या संस्थेत अर्ज केला होता व दिनांक ०३-१२-२००५ रोजी रिमाईडर देखील दिलेले होते परंतू आज अखेर मला कुठल्याही प्रकारे माहिती पुरवली गेली नाही. त्याचे सबळ कारण मला माहिती व्दारे मिळावे.

२. शैक्षणिक वर्ष २००३-२००४ मध्ये प्राध्यापक श्री. चंद्रकांत मारुती जोर्वेकर यांनी आपल्या संस्थेत “रसायनशास्त्र” या विषयाचे सह शिक्षक म्हणून किती दिवस

काम केले ? त्यांची रुजू होणेची तारीख, संस्थेतून मुक्त झालेची तारीख, त्यांना कोणत्या हेतुव्दारे (बेस) काम करण्याची संधी दिली व त्यांना लेखी स्वरुपात ऑर्डर दिली होती काय ? याचे सविस्तर विवरण मिळावे.

३. श्री. जोर्वेकर हे आपल्या संस्थेत रुजू होण्यापुर्वी आपण पेपरला जाहिरात दिली होती काय ? नसल्यास त्यांना कुणाच्या विनंतीवरुन वा शिफारशीवरुन कामावर रुजू करुन घेतले ? सदर पदावर त्यांना किती काळ काम करण्याची संधी दिली गेली ? दिनांक ०७-१२-२००५ रोजी कोणत्या कारणास्तव त्यांना कामावरुन कमी करण्यात आले ? तत्पुर्वी त्यांना कामावरुन कमी करण्याबाबत वा त्या अनुषंगाची "कारणे दाखवा नोटीस" (मेमो) देण्यात आली होती काय ? दिली असल्यास तिचा तपशील व नक्कल मिळावी. यदाकदाचित तशी नोटीस दिली नसल्यास का दिली गेली नाही ? आपले संस्थेत सेवकांना सूचना लेखी वा तोंडी यापैकी कशा दिल्या जातात, याचे सविस्तर विवरण मिळावे.

४. प्राध्यापक श्री. चंद्रकांत जोर्वेकर यांना कमी केल्यानंतर संस्थेतील विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते काय ? घोषणाबाजी केली होती काय ? जोर्वेकर यांना परत कामावर घ्यावे म्हणून विद्यार्थ्यांनी संस्थेकडे लेखी निवेदन दिले होते. त्या निवेदनाची सर्टिफाईड कॉपी मिळणेस विनंती आहे.

५. आपल्या संस्थेत लिव्ह व्हॅकन्सीवर शिक्षक नेमणेची प्रोसिजर कशी आहे व नेमलेला शिक्षक मस्टरवर सही करतो की नाही ? नसल्यास का करीत नाही वा मस्टर उपलब्ध नसते काय ? याविषयी सविस्तर माहिती पाहिजे आहे.

६. लिव्ह व्हॅकन्सीवर काम करणा-या शिक्षकांची सेवा पूर्ण झाल्यानंतर त्याला मानधन कसे दिले जाते ? किती दिवसांनी दिले जाते ? त्याला काही मुदत असते काय ? असल्यास किती मुदत असते ? व श्री. जोर्वेकर यांना मानधन किती व केव्हा

दिले गेले ? दिले गेलेले नसल्यास त्याबाबतच्या दिरंगाईचे कारण दिले गेले काय ? याचे सविस्तर विवरणपर माहिती मिळावी. ”

सदर माहितीचा कालावधी अपिलार्थीने ०१ जुलै २००४ ते ३१ डिसेंबर २००४ व दिनांक ०७-११-२००५ ते ०३-१२-२००५ असा दर्शविला असून ही माहिती अपिलार्थीने समक्ष अपेक्षिली आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण ६ मुद्यांपैकी ४ मुद्यावर अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात व उर्वरीत २ मुद्दयावर अंशतः प्रश्नार्थक व अंशतः सरळ माहिती विचारल्याचे दिसते. प्रश्नार्थक स्वरुपात विचारलेली माहिती अपिलार्थीस देता येणार नाही हे अपिलार्थीस सुनावणीच्या वेळी स्पष्ट करण्यात आले.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास संस्थेचे प्राचार्य (जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत) यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०४-२००६ च्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस एकूण ५ मुद्दयावर माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीचे या मिळालेल्या माहितीवर समाधान न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०५-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थी यांच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने अपील केलेल्या दिवशी म्हणजे दिनांक ०६-०५-२००६ रोजी अपिलार्थीस एक पत्र देऊन त्यांना प्राचार्यानी दिलेले दिनांक ०७-०४-२००६ चे पत्र अंतीम समजावे अशा अर्थाचे उत्तर दिले आहे.

अपील ठरविण्याची जन अपिलीय अधिकारी यांची ही पध्दत चुकीची असून त्यांनी अपिलार्थीच्या प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून, दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेऊन आपला अंतिम निर्णय जारी करणे हे अपील ठरविण्याच्या प्रक्रियेत अभिप्रेत आहे तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अशा कोणत्याही प्रकारच्या पध्दतीचा अवलंब न करता एक पत्राव्दारे अपिलार्थीस आपला निर्णय कळविणे हे चुकीचे आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी सदर संस्थेने जाणुन-बुजून असत्य, चुकीची व अपूर्ण माहिती दिली असे अपील करण्याचे कारण दर्शवून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती खोटी आहे. सदर माहिती खोटी असल्याच्या पुराव्याप्रित्यर्थ त्यांनी संस्थेने सहकार बॅक शाखा अकोले यांना संस्थेकडील दिनांक २७-०५-२००५ च्या पत्राची प्रत दाखविली या पत्रामध्ये अपिलार्थीस जुलै २००४ चा पगार काढण्या-साठी बॅकेस खाते नंबर देण्याची बॅकेस विनंती केली आहे. यावरुन अपिलार्थी हे जुलै २००४ च्या कालावधीमध्ये सदर संस्थेकडे कामास असल्याचे सिध्द होत आहे. तर त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक ०७-०४-२००६ च्या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी त्यांना संस्थेकडे दिनांक २१ सप्टेंबर २००४ ते २५ ऑक्टोंबर २००४ या कालावधीमध्ये काम केले असे म्हटले आहे. अपिलार्थीने या दोन्ही पत्रातील विसंगती आयोगाच्या निदर्शनास आणून दिली आहे. यावरुन आयोगास जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेली माहिती प्रत्यक्ष वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे दिसून येते. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांना विचारले असता

त्यांनी हे पत्र त्यावेळचे मुख्याध्यापक श्री. काशीनाथ सोनाजी मुरकुटे यांनी दिले आहे असे सांगितले. त्यांची आता दुस-या शाळेत बदली झाली असून यासंबंधीचे स्पष्टीकरण तेच देऊ शकतील असे सांगितले. या प्रकरणी संस्थेने केलेला पत्रव्यवहार व या कालावधीतील संस्थेच्या शिक्षकांची हजेरीपत्रके पाहिली असता या प्रकरणी निश्चितपणे संशयास जागा घेण्यास भरपूर वाव आहे असे आयोगास वाटते. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी या प्रकरणाची संपूर्णतः तपासणी करुन त्यांना आवश्यक वाटल्यास, संबंधीतावर योग्य ती नागरी / फौजदारी कारवाई करुन आपला चौकशी अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून एक महिन्याच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडला गेला की, त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती शाळेच्या अभिलेख्यावरुन दिली असून ती बरोबर आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दयातील एकूण ६ मुद्दयापैकी ४ मुद्दयावर पुर्णतः प्रश्नार्थक व उरलेल्या २ मुद्दयावर अंशतः प्रश्नार्थक माहिती विचारली आहे. अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारुन देखील प्राचार्य यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०६-२००४ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविण्याचा बहुतांश प्रयत्न केला आहे. अपिलार्थीस हवी असलेली प्रश्नांची उत्तरे या माहितीमध्ये दिसून येतात. अपिलार्थीस संस्थेने अमूक एक कृती का केली अथवा या संदर्भातील निर्णय का घेतला याची कारणे हवी आहेत. अपिलार्थीस जर या प्रकारातील कारणे शोधण्यात स्वारस्य असेल तर त्याला ही कारणे या विषयावरील संबंधीत नस्ती त्यांनी पाहिल्यानंतर, उपलब्ध होऊ शकतील असे आयोगास वाटते. "माहिती" या शब्दाची व्याप्ती माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) मध्ये पुरेशा प्रमाणात स्पष्ट आली आहे. या कलमा-तील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देणे अभिप्रेत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी बहुतांश माहिती या व्याख्येत बसत नाही व त्याच बरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस विहीत मुदतीत पुरविली आहे हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस संबंधीत संस्थेकडे या विषयावरील सर्व नस्त्या पाहण्याकरिता उपलब्ध करुन घेणे हे उचित होईल असे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम माहितीचा अर्ज संस्थेचे प्राचार्यांकडे केला व या निर्णयाचे अपील देखील संस्थेच्या प्राचार्याकडे केल्याचे दिसून येते. वस्तुतः या संस्थेमध्ये संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी असून प्राचार्य हे जन अपिलीय अधिकारी आहेत. विशेषतः अपिलार्थीने केलेला प्रथम अर्ज प्राचार्यानी संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक – जे या प्रकरणी जन माहिती अधिकारी आहेत – त्यांच्याकडे सदर अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठविणे क्रमप्राप्त होते तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही व ही माहिती स्वतः देण्याचा प्रयत्न केला आहे. याच बरोबर त्यांच्याकडे अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये दिनांक ०६-०५-२००६ रोजी दाखल झालेले अपील ठरवितांना त्यांनी योग्य त्या पध्दतीचा अवलंब केल्याचे दिसून येत नाही. त्यांनी हे अपील ठरवितांना कोणती कारवाई करणे अपेक्षीत आहे याचा खुलासा वरील परिच्छेदामध्ये केला आहे. या संस्थेतील कर्मचा-यांना / शिक्षकांना / प्राचार्याना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात किमान आवश्यक ते ज्ञान अद्यापही प्राप्त नसल्याचे अनुमान आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन काढण्यात हरकत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती मिळविण्याकरिता अपिलार्थीने सदर संस्थेकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार संदर्भीय प्रकरणातील सर्व नस्त्या पाहण्यासाठी अर्ज करावा. अपिलार्थीचा सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधीत नस्त्या, जन माहिती अधिकारी, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, ऑर्टस, मॉडर्न हायस्कूल अकोले व हिंदसेवा मंडळ अहमदनगर यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीकडून त्याप्रमाणे अर्ज प्राप्त झाल्यानंतर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीस अनुसरुन, ७ दिवसाच्या आत त्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्याव्यात.

३. संस्था व्यवस्थापनाने प्राचार्य, शिक्षक व इतर सर्व कर्मचा-यांकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींच्या अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा व शिबिरे आयोजीत करावीत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधीर मारोती जोर्वेकर, जुनी गिरमे चाळ, कोपरगाव, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, अकोले, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, अकोले, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४६४

निर्णय दिनांक २९-०८-२००७

श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी

रा. पिंपळगाव रेणुकाई, तालुका भोकरदन,

जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता,

स्थानिक स्तर लघु पाटबंधारे उपविभाग

कार्यालय, जालना जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे

स्थानिक स्तर, जालना जिल्हा जालना

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गजानन संतुकराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, श्री. भास्कर काशीनाथराव जाधव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, श्री. रघुवीर गणपतराव यादव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थी यांनी आयोगासमोर एक शपथपत्र सादर केले असून त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे दिनांक ०५-१०-२००६ रोजी केलेल्या अर्जातील संपूर्ण माहिती आता दिनांक ११-०८-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले दिनांक ०१-०३-२००७ रोजीचे व्दितीय अपील मागे घेत असल्याचे आपले म्हणणे शपथपत्राव्दारे राज्य माहिती आयोगास सादर केले आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील ते स्वेच्छेने आता मागे घेत असल्याने त्यांचे राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१.	अपीलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद 	( वि. बा. बोरगे )

दिनांक 	२९ ऑगस्ट २००७ 	राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, रा. पिंपळगाव रेणुकाई, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, स्थानिक स्तर लघु पाटबंधारे उपविभाग कार्यालय, जालना जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, जालना जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/३२४

निर्णय दिनांक- ३०-०८-२००७.

श्री. शाम बाळकृष्णराव सेलूकर, : अपिलार्थी
देशपांडे गल्ली, अंबाजोगाई

तालूका-अंबाजोगाई, जिल्हा-बीड

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ जनमाहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल),<br>तहसील कार्यालय, अंबाजोगाई,<br>जिल्हा-बीड. | : | प्रतिवादी |
| २. जनअपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,अंबाजोगाई, जिल्हा- बीड. | | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ३०-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.शाम बाळकृष्णराव सेलूकर, यांच्यावतीने श्री.नहुषकुमार सेलूकर ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी नायब तहसीलदार (महसूल) तहसील कार्यालय, अंबाजोगाई, श्री. सुजीत अंगदराव नरहरे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, श्री. प्रशांत सुरेशराव सूर्यवंशी (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

आज रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांच्याकडून झालेला पत्रव्यवहार जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही. असे जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी स्पष्ट केले. तर संबंधित जनमाहिती अधिकारी व

जनअपिलीय अधिकारी हे अपिलार्थीच्या कडून कोणताही अर्ज  अथवा अपील स्वीकृत करीत नाहीत.  असा अपिलार्थीने युक्तीवाद केला.

दोन्हीही पक्षकार एकमेकांशी पत्रव्यवहार करतांना तो खरोखरीच करतात व सदर पत्रव्यवहार दुसरे पक्षकार स्वीकृत करतात किंवा कसे, हे कळण्यास मार्ग नाही. तेंव्हा घटनाक्रमाच्या या टप्पावर अपिलार्थीच्या दिनांक- ३१-०७-२००६ च्या  प्रथम अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी प्रथम सुनावणी घेणे गरजेचे आहे. या निष्कर्षाप्रत आयोग पोंहचला आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार अपिलार्थीच्या प्रथम अपीलावर त्वरीत सुनावणी घेवून आपला आदेश देणे उचित राहील, असे आयोगास वाटते. तेंव्हा या प्रकरणी असे आदेशित करण्यात येते की, जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक- ३१-०७-२००६ रोजीच्या प्रथम अपीलावर दिनांक- ०१-०९-२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घेवून आपला सुनावणीचा निर्णय त्याच दिवशी पारीत करावा. अपिलार्थीस जनअपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयावर अपील करावयाचे झाल्यास त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार विहित मुदतीत राज्य माहिती आयोगाकडे आपले व्दितीय अपील दाखल करता येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

९. अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

१०. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक- ३१-०७-२००६ रोजीच्या प्रथम अपीलावर दिनांक- ०१-०९-२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घ्यावी व आपला सुनावणीचा निर्णय त्याच दिवशी पारीत करावा.

औरंगाबाद ( वि.बा.बोरगे)
दिनांक- ३०-०८-२००७. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

२२. श्री. शाम बाळकृष्णराव सेलूकर, देशपांडे गल्ली, अंबाजोगाई, जिल्हा-बीड.

२३. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) तहसील कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा-बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२४. जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,अंबाजोगाई,जिल्हा-बीड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

२६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४६३

निर्णय दिनांक ३०-०८-२००७

श्री. सुरजमल गिरधारीलाल जैन, : अपिलार्थी

व्दारा – जैन ॲटो सर्वो,

जाफर गेट, मोंढा रोड,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहाय्यक संचालक,

नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा आयुक्त,

महानगरपालिका, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुरजमल गिरधारीलाल जैन, औरंगाबाद (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका श्री. रविंद्र दत्तात्रय जोशी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका

श्री. असीम कुमार गुप्ता (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे महानगरपालिका हद्दीतील पेट्रोलपंपासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. " महानगरपालिकेच्या हद्दीत नवीन पेट्रोलपंप परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र सन २००१ ते २००६ पर्यत बांधकाम परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र याची संपूर्ण प्रत मिळणेबाबत.

२. विकास नियंत्रण नियमावली एन-२२६ नुसार रोड जक्शनची परिभाषाबद्दलची माहिती मिळणेबाबत.

३. पेट्रोलपंपाकरिता ना हरकत प्रमाणपत्र व बांधकाम परवानगी करिता कोणत्या अधिका-याची सही लागते याचा खुलासा. "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक ०६-०६-२००६ चे पत्रानुसार प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ व ३ वर आवश्यक असलेली माहिती पुरविली असल्याचे दिसते. तथापि अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती बरोबर नसल्याचे दिसून येते. तदनंतर दिनांक ०९-०६-२००६ रोजी त्यांनी अपिलार्थीस परत पत्र लिहून रुपये ४१६ इतके शुल्क, ही माहिती देण्यापोटी लागणारा खर्च म्हणून त्यांच्या कार्यालयात भरण्याविषयी सूचित केले. अपिलार्थीने रुपये ४१६ इतक्या रकमेचा भरणा महानगरपालिका कार्यालयामध्ये दिनांक १२-०६-२००६ रोजी केला. अपिलार्थीने या रकमेचा भरणा केल्याची नोंद मनपाच्या बुक नंबर, पावती क्रमांक १७७८४७

इतकी आहे. अपिलार्थीने सदर रकमेचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक २२-०६-२००६ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिल्याचे दिसून येते.

तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०८-२००६ रोजी होऊन जन अपिलीय अधिकारी यांनी त्याच दिवशी आपला निर्णय पारीत केला आहे. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे आदेश दिले आहेत की, "मनपा अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या अपिलार्थीने मागणी केलेली पेट्रोलपंपाच्या संचिका अर्जदार यांना दिनांक २८-०८-२००६ रोजी दुपारी ०१-०० वाजता समक्ष दाखवाव्यात. सदर संचिकेचे निरीक्षण करुन अर्जदार यांनी त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रास खूणा करुन द्याव्यात व त्याची योग्य ती रकम जमा करुन घेतल्यानंतर प्राप्त करुन द्याव्यात."

अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित केलेल्या दिनांकास व वेळेत ते त्यांच्या कार्यालयात गेले परंतु त्यांना ही माहिती दाखविण्यात आली नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे या सुनावणी आदेशाप्रमाणे रक्कम भरण्या-प्रित्यर्थ नेमकी स्थिती काय आहे हे कळण्यास मार्ग नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना २० पृष्ठांची माहिती देऊन सोबत ३ नकाशाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्या आहेत. शासनाच्या अधिनियमात विहीत केल्या प्रमाणे प्रती पृष्ठ २ रुपये इतके शुल्क त्यांच्या कडून जन माहिती अधिकारी यांनी घ्यावयास हवे होते तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जादा शुल्क लावले आहे. त्याच बरोबर पेट्रोलपंप, बांधकाम परवानगी प्रकरणी अपिलार्थीने पोलीस आयुक्त औरंगाबाद व अग्नीशमन, मनपा यांच्याकडे याच विषया-वर त्याचवेळी मागणी केली असता पोलीस आयुक्त औरंगाबाद यांनी ३० पेट्रोल पंपाची परवानगी दिल्याचे तर अग्नीशमन दलाने ३२ पेट्रोलपंपाची परवानगी दिल्याचे अपिलार्थीस लेखी कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना फक्त ५ पेट्रोलपंपाची माहिती प्राप्त झाली आहे. या माहितीमध्ये असलेल्या विसंगतीमुळे शहरात काही पेट्रोलपंप अनाधिकृतरित्या चालत असल्याची त्यांनी शंका व्यक्त केली व अशा अनाधिकृत पेट्रोलपंपाचा शोध लावल्यानंतर नियमाप्रमाणे मनपास त्यांचेकडून नंतर काही दंडनीय रक्कम प्राप्त होऊन पुढे मनपाच्या नियमीत उत्पन्नामध्ये भर पडेल असा आशावाद त्यांनी पुढे मांडला.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती त्यांच्या बांधकाम परवानगी विभागाकडून दिल्या गेलेल्या माहितीवर आधारीत आहे. औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये सिडको या शासनाच्या विकास प्राधिकरणातंर्गत काही क्षेत्र निश्चित करण्यात आले असून त्या क्षेत्राचे नियोजन प्राधिकरण ‘‘सिडको’’ हे असल्याने त्यांच्या क्षेत्रामध्ये बांधकाम परवानगीस महानगरपालिकेची आवश्यकता नसते तथापि हे प्राधिकरण देखिल मनपाची अग्निशमन यंत्रणा वापरत असल्याकारणाने त्यांच्या कार्यक्षेत्रातील पेट्रोल पंप परवानगीकरिता ते मनपाच्या अग्निशमन यंत्रणेकडून ना हरकत दाखला घेत असतात. त्याच बरोबर पोलीस आयुक्त औरंगाबाद यांचे कार्यक्षेत्र औरंगाबाद जिल्ह्यातील काही भागात व महानगरपालिका

हद्दी पलिकडे आहे त्यामुळे पोलीस आयुक्त औरंगाबाद यांनी दिलेल्या माहितीमध्ये व महानगरपालिकेने दिलेल्या माहितीमध्ये तफावत दिसून येते.

अपिलार्थीकडे त्यांना अग्नीशमन, मनपा, औरंगाबाद व पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची यादी उपलब्ध आहे. सदर यादीशी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील यादीशी तुलना करुन अद्यापही त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये विना परवानगी कोणते पेट्रोलपंपाचे बांधकाम झाले आहे काय हे तपासून पहावे व यामध्ये जी बांधकामे अनाधिकृतरित्या झालेली आहेत त्यावर त्यांनी मनपाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे तात्काळ कारवाई करणे उचित राहील असे आयोगाचे मत आहे.

अपिलार्थीच्या मनपास दिलेल्या ४१६ रुपयाच्या शुल्कासंदर्भात असे आदेशित करण्यात येते की, मनपाने अजून अपिलार्थीस काही माहिती द्यावयाची राहून गेली असल्यास ती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत पुरवावी व अशा प्रकारे मूळ पुरविलेली माहिती व नंतर पुरविलेल्या माहितीपोटी घ्यावे लागणारे शुल्क अपिलार्थीकडून जमा केलेल्या शुल्कामधून वजा करुन उर्वरीत बाकी रक्कम अपिलार्थीस ७ दिवसात परत द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी –

अपिलार्थीकडे असलेल्या पेट्रोल पंपाच्या यादीशी त्यांनी परवानगी दिलेल्या पेट्रोल पंपाच्या यादीची तुलना करुन त्यामध्ये जे पेट्रोल पंप विना परवाना बांधले गेल्याचे

आढळेल त्यांचेवर मनपाच्या संबंधीत प्रचलीत नियमाप्रमाणे त्यांनी सात दिवसात कार्यवाही करुन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जमा केलेल्या ४१६ रुपयाच्या मोबदल्यात जन माहिती अधिकारी यांचेकडून अजूनही अपिलार्थीस काही माहिती द्यावयाची राहून गेली असल्यास ती त्यांनी अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत पुरवावी व अशा प्रकारे मूळ पुरविलेली माहिती व नंतर पुरविलेली माहिती देण्याप्रित्यर्थ लागणारे शुल्क अपिलार्थीकडून जमा केलेल्या शुल्कामधून वजा करुन उर्वरीत बाकी रक्कम अपिलार्थीस ७ दिवसात द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३० ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरजमल गिरधारीलाल जैन, व्दारा – जैन ॲटो सर्वो, जाफर गेट, मोंढा रोड, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४६९

निर्णय दिनांक ३०-०८-२००७

श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी, : अपिलार्थी

नोमानियानगर, तरोडा (बु.), नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अधीक्षक अभियंता,

यांत्रिकी मंडळ, उ. स. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता,

यांत्रिकी मंडळ, उ. स. नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी, नांदेड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता, नांदेड श्री. बाबुराजा पंढरीनाथ पोटपेलवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड श्री. शंकर बाळाजी पल्हाळ (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००३ ते २८-०६-२००६ या कालावधीतील श्री. प्रशांत सुधाकरराव कुलकर्णी शाखा अभियंता यांचे गोपनीय अहवाल व स्वंयमूल्य निर्धारण अहवाल संदर्भात खालील प्रमाणे एकूण ४ मुद्दयावर माहिती मागविली होती.

१. “ श्री. प्रशांत सुधाकरराव कुलकर्णी शाखा अभियंता (विद्युत) हे अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ.सं.) नांदेड अंतर्गत कार्यरत आहेत. त्यांनी वर्ष ०१-०४-२००३ ते ३१-०३-२००४ व ०१-०४-२००४ ते ३१-०३-२००५ या दोन वर्षात कार्यक्षेत्रावर केलेल्या कामाची नोंद स्वंयमूल्य निर्धारण अहवालात नमूद केलेली असणारच. कार्यक्षेत्रावर केलेली कामे गोपनीय नसल्यामुळे सदर दोन्ही वर्षाचे स्वंयमूल्य निर्धारण अहवालात (परिशिष्ट-ब भाग-३) नमूद केलेली वैशिष्टपूर्ण कामे बाबत माहिती देण्यात यावी.

२. वरील दोन्ही गोपनीय अहवाल लिहिलेल्या प्रतिवेदन अधिकारी यांचे नांव व पदनाम व त्यांनी या गोपनीय अहवालात (परिशिष्ट-ब भाग-४) कोणती शेरे नोंदलेली आहेत यांची माहिती द्यावी.

३. वरील दोन्ही गोपनीय अहवालाचे पुनर्विलोकन कोणत्या पुनर्विलोकन अधिका-यांनी केले त्यांचे नांव व पदनाम व गोपनीय अहवालात (परिशिष्ट-ब भाग-५) नमूद केलेली अभिप्राय व दिलेली प्रतवारी याबाबत माहिती देण्यात यावी.

४. माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार श्री. प्रशांत सुधाकरराव कुलकर्णी शाखा अभियंता (विद्युत) यांचे वर्ष ०१-०४-२००३ ते ३१-०३-२००४ व ०१-०४-२००४ ते ३१-०३-२००५ या दोन वर्षाचे गोपनीय अहवाल मला दाखविण्यात यावे.नियमानुसार मी शासनाचे शुल्क भरणा करण्यास तयार आहे.”

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर, अपिलार्थीने मागितलेली माहिती गोपनीय अहवाल संदर्भात असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी राज्य मुख्य माहिती आयुक्तांकडे या प्रकरणी त्यांच्या कडील ०१ जुलै २००६ च्या पत्रान्वये मार्गदर्शन मागितले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्राच्या संदर्भात त्यांना जलसंपदा विभागाकडून २१ जुलै २००६ रोजी अपिलार्थीने मागितलेली माहिती केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील अनुभाग ८ (१) (ज) नुसार देता येणार नाही असा खुलासा करण्यात आला. शासनाकडून अशा प्रकारे मार्गदर्शन प्राप्त झाल्यनंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कडील दिनांक ०१-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये ही माहिती देता येणार नसल्याचे अपिलार्थीस कळविले. ही माहिती न देण्याचे कारण म्हणून जन माहिती अधिकारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील अनुभाग ८ (१) (ज) चा संदर्भ दिला आहे. तथापि तदनंतर शासनाच्या आदेशात दुरुस्ती करुन शासनाने दिनांक ०७-१०-२००६ च्या पत्रानुसार जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (त्र) या कारणास्तव ही माहिती देता येणार नाही असे कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिला-मध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन दिनांक ०९-०८-२००६ रोजी आपले आदेश पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी शासन निर्णयावर कोणतेही भाष्य करणे संयुक्तीक नाही अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०९-२००६ रोजी  व्दितीय अपील केले.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांना अपेक्षित असलेली माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी न दिल्यामुळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शास्ती लावण्याची राज्य माहिती आयोगाने कारवाई करावी.  सदर माहितीने व्यापक जनहित साध्य होणार आहे असे त्यांचे म्हणणे आहे.  या प्रकरणी श्री. प्रशांत सुधाकरराव कुलकर्णी हे कनिष्ठ अभियंता असून त्यांच्यावर श्री. म. मा. स्वामी उप अभियंता यांचे नियंत्रण आहे तर श्री. स्वामी यांचेवर श्री. वि. वि. भागानगरे कार्यकारी अभियंता यांचे नियंत्रण आहे व या सर्वांवर श्री. ज. म. जाधव यांचे अधीक्षक अभियंता म्हणून नियंत्रण आहे.  सर्वसाधारण परिस्थितीमध्ये श्री. प्रशांत कुलकर्णी यांचे गोपनीय अहवाल श्री. म. मा. स्वामी उप अभियंता यांनी लिहून पाठवावयाचे असतांना श्री. वि. वि. भागानगरे या कार्यकारी अभियंत्याने कनिष्ठ अभियंत्याचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन अधिकारी या नात्याने लिहिले.  वास्तविक ते या प्रकरणी पुनर्विलोकन अधिकारी आहेत.  श्री. भागानगरे यांनी लिहिलेल्या गोपनीय अहवालावर श्री. ज. म. जाधव यांनी पुनर्विलोकन अधिकारी म्हणून या अहवालाचे पुनर्विलोकन केले आहे.  शासनाने विहीत केलेल्या पध्दतीशी ही पध्दत पुर्णपणे विसंगत असून या प्रकरणी कनिष्ठ अभियंता या अधिका-याचे नियंत्रण अधिकारी उप अभियंता आहेत.  अशा प्रकारे उप अभियंत्याच्या गोपनीय अहवालाला डावलण्यात आलेले असून त्यांचे शेरे कोठेही विचारात घेण्यात आलेले नाहीत.  कनिष्ठ अभियंत्यास उत्कृष्ट अथवा अतिउत्कृष्ट शेरे प्राप्त झाल्यानंतर त्यांना शासनातर्फे आगाऊ वेतनवाढी प्राप्त होत असतात.  सदर आगाऊ वेतनवाढ ही शासनाने पात्र नसलेल्या कर्मचा-यांना दिल्यास शासनाचे आर्थिक नुकसान होऊ शकते.  या प्रकरणामध्ये श्री.

प्रशांत कुलकर्णी यांना आगाऊ वेतनवाढ दिल्यास शासनाचे नुकसान होऊ शकेल व ते नुकसान टाळण्याच्या दृष्टीने त्यांनी ही माहिती मागितल्याचे प्रतिपादन केले व पुढे शासनाने विहीत केलेल्या पध्दतीचा अवलंब न करता आपणास गैरसोईच्या वाटणा-या अधिका-यास डावलून इतरांनी गोपनीय अहवाल लिहिण्याच्या या प्रकरणामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असल्याची शंका त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये वर्तवली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, अपिलार्थी यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिलेली उत्तरे ही शासनाकडून त्यांना प्राप्त झालेल्या मार्गदर्शनानुसार दिली असून त्यामध्ये अपिलार्थीस माहिती न देण्याचा अथवा अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा त्यांचा उद्देश नव्हता.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ४ मुद्दयावर माहिती मागितली होती. त्यापैकी पहिल्या मुद्दयामधील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यास काहीच हरकत नाही कारण श्री. प्रशांत कुलकर्णी यांनी त्यांच्या स्वंयमूल्य निर्धारण अहवालामध्ये ज्या उल्लेखनीय कामाचा उल्लेख केला आहे ती कामे सार्वजनिक स्वरुपाची आहेत व ती सर्व जनतेला माहीत आहेत. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक २ व ३ मध्ये श्री. कुलकर्णी यांचे गोपनीय अहवाल लिहिलेले प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी यांची नांवे व पदनाम मागितले आहे. संबंधीत प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी यांची नांवे सर्वांना माहीत असल्यामुळे ती माहिती दिल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ च्या कोणत्याही तरतुदीस बाधा येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ मध्ये अनुक्रमे प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी यांनी श्री. प्रशांत कुलकर्णी यांच्या गोपनीय अहवालात कोणते शेरे नोंदविले आहेत याची माहिती मागितली आहे व त्याच बरोबर मुद्दा क्रमांक ४ मध्ये श्री. प्रशांत कुलकर्णी, शाखा

अभियंता यांच्या २००३-२००४ व २००४-२००५ या दोन वर्षाचे गोपनीय अहवाल दाखविण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीने मागितलेली मुद्दा क्रमांक २ व ३ मधील अंशतः माहिती (गोपनीय अहवालामधील शेरे) व मुद्दा क्रमांक ४ व्दारे श्री. कुलकर्णी यांचा गोपनीय अहवाल त्यांना दाखविण्याची केलेली विनंती आयोगास मान्य करता येणार नाही कारण कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये वरिष्ठ अधिका-याने कनिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहून त्यांच्या कामाची दरवर्षी नियमितपणे मूल्यमापन करण्याची पध्दत गेली अनेक वर्ष चालत आलेली आहे व ती काळाच्या कसोटीवर योग्य असल्याचे सिध्दही झाले आहे. कर्मचा-यांच्या वर्षभरात केलेल्या कामाच्या मूल्यनिर्धारणाच्या दर्जावर त्यांची पदोन्नती व वेतनवाढ अवलंबून असते. कनिष्ठ अधिका-यांवर व कर्मचा-यांवर वरिष्ठ अधिका-यांनी नियंत्रण ठेवण्याच्या प्रक्रियेमध्ये कनिष्ठ अधिका-यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याचा वरिष्ठ अधिकारी यांना दिलेला अधिकार हा एक महत्वाचा घटक आहे. आपले गोपनीय अहवाल लिहिण्याचे अधिकार वरिष्ठांना असल्यामुळे त्यांच्या सूचना कनिष्ठ अधिकारी व त्यापरत्वे कर्मचारी पाळत असतात व काम होऊन, अंतिमतः सार्वजनिक प्राधिकरणास त्यांना नेमून दिलेले काम करता येते. जर अपिलार्थी यांची विनंती मान्य केली तर, या निर्णयाचे दूरगामी परिणाम प्रशासनामधील सौहार्दाचे वातावरण कायम ठेवण्यास बाधा आणू शकतील असे आयोगाचे मत आहे. या पध्दतीला छेद देऊन जर कोणाही त्रयस्त व्यक्तिने कोणाही कर्मचा-याच्या / अधिका-याच्या गोपनीय अहवालाचे अवलोकन करण्याची मागणी मान्य झाल्यास प्रशासन व्यवस्थेमध्ये नियंत्रणास आवश्यक असा समतोल राहणे अवघड तर होईलच परंतु संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेमध्ये काम करण्यासाठी कोणतेही पोषक वातावरण राहणार नाही. अधिकारी व कर्मचारी यांच्यातील आपापसातील हेवेदावे वाढीस लागून परिणामी जनतेची कामे पार पाडण्याच्या प्रक्रियेमध्ये अनेक अडथळे निर्माण होतील. अपिलार्थी हे नांदेड

यांत्रिकी मंडळामध्ये कारकून या पदावर सध्या कार्यरत आहेत त्यांनी त्यांचे वरिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी यांच्या गोपनीय अहवालातील शेरे व २००३-४ व २००४-०५ च्या गोपनीय अहवालाचे अवलोकन करण्याची त्यांची विनंती मान्य करण्यासाठी आयोगाकडे विनंती केली आहे. या प्रकरणी त्यांची विनंती मान्य झाल्यास व्यापक जनहित साध्य होईल असे त्यांचे म्हणणे आहे. तथापि अपिलार्थीचे हे म्हणणे त्यांनी संदर्भीय एकच प्रकरण नजरेसमोर ठेऊन आयोगासमोर मांडले आहे. अपिलार्थीस या प्रकरणी काही गैरप्रकार झाले असल्याची शंका असल्यास ते जलसंपदा खात्यातील वरिष्ठांकडे त्याप्रमाणे स्वतंत्र अर्ज करुन त्याची दाद मागू शकतात. अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे आदेश द्यावयाचे झाल्यास ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (त्र) च्या तरतुदीस छेद तर देतीलच परंतु या आदेशाचे दूरगामी परिणाम सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रशासकीय व्यवस्थेस निश्चितपणे मारक ठरतील यात शंका नाही. सार्वजनिक प्राधिकरणातील प्रशासकीय व्यवस्था निकोप निरोगी राहण्याच्या दृष्टीने व प्रशासनात सौहर्दपूर्ण वातावरण राहण्याच्या दृष्टीने अपिलार्थीने त्रयस्त व्यक्ती संदर्भात केलेल्या मागणीची पुर्तता करणे उपरोक्त परिस्थितीत, विशेषतः त्यांचे दूरगामी परिणाम लक्षात घेता आयोगाने मान्य करणे उचित राहणार नाही असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत असून खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी श्री. प्रशांत सुधाकरराव कुलकर्णी शाखा अभियंता यांनी त्यांच्या स्वंयमूल्य निर्धारण अहवालात ज्या वैशिष्टपूर्ण कामाचा उल्लेख केला आहे त्या कामाची माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत द्यावी.

३. श्री. प्रशांत सुधाकरराव कुलकर्णी शाखा अभियंता यांचे सन २००३-२००४ व २००४-२००५ चे गोपनीय अहवाल लिहिणारे प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी यांची नांवे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत कळवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३० ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी, नोमानियानगर, तरोडा (बु.), नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, उ. स. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, उ. स. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४७१

निर्णय दिनांक ३०-०८-२००७

श्री. तुळशीराम एकनाथ फुलारी, : अपिलार्थी
सम्राट चौक, श्रीकृष्णनगर,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (म.), तहसील
कार्यालय, चाकूर तालुका चाकूर, जिल्हा
लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, चाकूर,
जिल्हा लातूर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. तुळशीराम एकनाथ फुलारी, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय, चाकूर व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, चाकूर कोणीही उपस्थित नाहीत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १९-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे रोहिणा तालुका चाकूर येथील जमिनीच्या संदर्भात खालील प्रमाणे काही कागदपत्रांची मागणी केली होती.

“ मौजे रोहिणा तालुका चाकूर येथील माझ्या नावे असलेल्या जमिनीचा गाव नमुना ८ अ ची प्रमाणित प्रत (गट नंबर २४३ व २४४ धारण जमिनीची खतावणी जमाबंदी पत्रक, धारण जमिनीची गाव नमुना ८ अ ची प्रमाणित प्रत दिनांक १९-१२-२००५) मल पृष्ठावर दिनांक ३१-०८-१९९२ च्या उता-याची झेरॉक्स (पडताळणीसाठी).”

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थी यांच्या वरील अर्जास प्रतिसाद म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २७-१२-२००५ चे पत्रान्वये ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क म्हणून रुपये ६ भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने हे शुल्क आयोगास जन माहिती अधिकारी यांचेकडे भरले किंवा कसे यावर कागदपत्राच्या उपलब्धतेअभावी आयोगास काहीही भाष्य करता येत नाही.

सदर माहिती अपिलार्थीस विहीत मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार दिनांक १०-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थी यांच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे कळण्यास जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे तसेच संबंधित कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे, मार्ग नाही. तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये मौजे रोहिणा येथील गट क्रमांक २४३ व २४४ धारण जमिनीचा गाव नमुना ८ अ ची प्रमाणित प्रत पाठविल्याचे दिसून येते. त्याच बरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी परत अपिलार्थीस दिनांक १०-०८-२००६ च्या त्यांचेकडील

पत्रानुसार अपिलार्थीस दिनांक ०८-०८-२००६ च्या अपील अर्जास अनुसरुन त्यांनी मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती दिल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अपेक्षीत असलेली माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले असून त्यात आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उशिराने चुकिची माहिती दिली, माहिती देण्याचे टाळले त्यामुळे त्यांना मनस्ताप झाल्याचे नमूद केले आहे व संबंधीत जमिनीच्या अचूक ८ अ ची प्रमाणित प्रत मिळण्याची विनंती केली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे कोणीही उपस्थित नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीस निश्चितपणे काय माहिती हवी आहे याचा बोध होत नाही, तथापि अपिलार्थीने संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रतीवरुन अपिलार्थीस मौजे रोहिणा तालुका चाकूर येथील गट क्रमांक २४३ व २४४ च्या गाव नमुना ८ अ ची प्रमाणित प्रत व या जमिनीच्या खतावणीची जमाबंदी हवी असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये विहीत केलेल्या नमुन्यामध्ये अपिलार्थीने आपला अर्ज संबंधीत प्राधिकरणाकडे योग्य वेळी केलेला आहे व संबंधीत प्राधिकरणाकडून अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे आयोगास उपलब्ध झालेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तेव्हा अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा जन माहिती अधिकारी यांनी शोध घेऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली अचूक माहिती “ मौजे रोहिणा तालुका चाकूर येथील गट क्रमांक २४३, २४४ च्या ८ अ ची

प्रमाणित प्रत " हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस अपेक्षीत असलेली "मौजे रोहिणा तालुका चाकूर येथील गट क्रमांक २४३, २४४ च्या ८ अ ची अचूक व प्रमाणित प्रत" विनामूल्य पुरवावी व तदनंतर आपला अनुपालन अहवाल ८ दिवसाच्या आयोगास आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३० ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. तुळशीराम एकनाथ फुलारी, सम्राट चौक, श्रीकृष्णनगर, लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय, चाकूर तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/४७२

निर्णय दिनांक- ३०-०८-२००७.

श्री.दामोधर शंकरराव घुगे, : अपिलार्थी
मु.पो.पांगरी, ता.जिंतूर, जिल्हा-परभणी.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक, जिजामाता विद्यालय,
भुजंगवाडी गल्ली जिंतूर, जिल्हा-परभणी.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
सचिव, जिजामाता विद्यालय, भुजंगवाडी
गल्ली जिंतूर, जिल्हा-परभणी.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ३०-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.दामोधर शंकरराव घुगे ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिजामाता

विद्यालय,जिंतूर (यापुढे त्यांना  जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा सचिव, जिजामाता विद्यालय,जिंतूर (यापुढे त्यांना  जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल)  हे गैरहजर आहेत.

आज झालेल्या  सुनावणीच्या वेळेस जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्वजण गैरहजर आहेत. तथापि या प्रकरणाची आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन छाननी करण्यात आली असता, असे दिसून येते की, अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणत्याच प्रकारची माहिती कळविली नाही व या संदर्भात त्यांनी आपले कोणतेही म्हणणे आयोगास सादर केलेले नाही. त्याचबरोबर या प्रकरणी शिक्षण  विभागाचे दिनांक- ०२-०८-२००६ रोजीच्या परिपत्रकानूसार जनअपिलीय अधिकारी म्हणून सदर संस्थेचे सचिव आहेत. ही साधी माहिती देखील जिल्हापरिषद, परभणीचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे अपिलार्थीस देवू शकले नाहीत. याची आयोगाने सखेद नोंद केली आहे. खुद शिक्षणाधिका-यास त्यांच्या कार्यक्षेत्रात येणा-या संस्थेमध्ये जनअपिलीय अधिकारी कोण आहेत,  एवढी साधी माहिती नसावी, ही बाब त्यांच्या मनात माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रति असलेला अनादर व बेफिकीरवृत्ती स्पष्ट करते. त्यांच्या या वृत्तीची नोंद शिक्षण संचालक (माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी घ्यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे त्यांनी मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पुरविली नसल्याने असे आदेशित करण्यात येते  आहे की, जनमाहिती

अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर सात दिवसाच्या आत अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, साक्षांकित करुन व स्पष्ट स्वरुपात विनामूल्य पुरवावी.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विहित मुदतीत देण्या प्रित्यर्थ जी उदासीन बेफिकीरवृत्ती दाखविली आहे. त्याबद्दल त्यांच्यावर संबंधित संस्थेने प्रचिलत सेवा नियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत असून खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

११. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

१२. जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर सात दिवसाच्या आत अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, साक्षांकित करुन व स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरवावी.

१३. संबंधित मुख्याध्यापक जिजामाता विद्यालय (जिंतूर) यांचेवर संस्थेच्या व्यवस्थापनाने प्रचलीत सेवा नियमानुसार, त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल, यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी.

औरंगाबाद                                   ( वि.बा.बोरगे)
दिनांक- ३०-०८-२००७.                          राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

१. श्री.दामोधर शंकरराव घुगे, मु.पो.पांगरी, तालूका-जिंतूर, जिल्हा-परभणी.

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिजामाता विद्यालय, भुजंगवाडी गल्ली जिंतूर, जिल्हा-परभणी, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा सचिव, जिजामाता शिक्षण संस्था, जिंतूर संचलित जिजामाता विद्यालय, भुजंगवाडी गल्ली जिंतूर, जिल्हा- परभणी, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, परभणी, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१५. शिक्षण संचालक ( माध्यमिक ) शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे-१, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१६. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

१७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/४७३

निर्णय दिनांक- ३१-०८-२००७.

श्री.शेख नईम शेख लाल : अपिलार्थी
जिल्हाध्यक्ष, समाजवादी पार्टी, हिंगोली.
नवीन पाण्याच्या टाकीजवळ,
पलटन हिंगोली.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा गटप्रमुख : प्रतिवादी
जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हापरिषद,हिंगोली.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हापरिषद, हिंगोली.

## <u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ३१-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.शेख नईम शेख लाल ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा गटप्रमूख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हापरिषद,हिंगोली, श्री.तुकाराम मल्लन्ना आऊलवार (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा

अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,हिंगोली, श्री.उत्तमराव सवाईराम चव्हाण (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, अपिलार्थीने मूळात मागणी केलेली माहिती ती मोठया प्रमाणात व विस्तृत स्वरुपाची होती. ही माहिती गोळा करण्याकरिता त्यांना २२ संस्थाशी संपर्क साधून १३८ गावातील माहिती गोळा करावी लागली. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्यातर्फे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व ती गोळा करण्याकरिता लागणारे मनुष्यबळ हे दोन मुद्दे प्रामूख्याने उपस्थित करण्यात आले. सदर माहितीची सद्यस्थिती काय आहे, असे विचारले असता, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी एकूण ७० टक्के माहिती त्यांच्याकडे आजरोजी तयार असल्याचे त्यांनी सांगितले. अपिलार्थीने प्रत्येक संस्थेने प्रत्येक कामावर केलेला खर्च, पासबूक, चेकबूक इत्यादीच्या सत्यप्रति मागितल्या असल्यामूळे ही माहिती गोळा करण्यास त्यांना वेळ लागला. असे त्यांनी सुनावणीमध्ये कबूल केले. तथापि कोणत्याही परिस्थितीत अपिलार्थीना त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली शतप्रतिशत माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता जास्तीत जास्त १५ दिवस इतका कालावधी त्यांना लागणार असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पहाता, जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी आज युक्तीवादामध्ये उपस्थित केलेले मुद्दे जरी योग्य असले तरी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीस आज एक वर्षाहून जास्त कालावधी लोटला आहे. ही वस्तुस्थिती नजरेआड करुन चालणार नाही. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांना त्यांचे नित्याचे काम सांभाळून माहिती अधिकार कायद्याच्या सदंर्भातील

माहिती पुरविण्याचे काम करावे लागतात, हे लक्षातघेता व जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याकरिता त्यांच्याकडे जी माहिती तयार आहे. तिचे अवलोकन करता जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये स्वारस्य आहे, हे दिसून आले आहे. आता केवळ १५ दिवसाच्या कालावधीत उर्वरित माहिती गोळा केल्यास त्यांना ही पूर्ण माहिती अपिलार्थीस देता येईल, अशी स्थिती आहे. अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लागणारा विलंब विहित कालावधीपेक्षा जास्त असल्याने जनमाहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. त्यामुळे अपिलार्थीने या कामापोटी लागणारे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरावे, हा त्यांचा मुद्दा आयोग मान्य करीत नाही. अपिलार्थीस माहिती देण्यास मुद्यामहून टाळाटाळ करणे अथवा असद्‌हेतूने ही माहिती लपवून ठेवणे, असा प्रकार या प्रकरणात न आढळल्याने जनमाहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही शास्तीची कार्यवाही आयोग करणार नाही. तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या अनुषंगाने ज्यावेळी त्यांच्याकडे असे विविध माहितीसाठी अर्ज प्राप्त होतील, त्यावेळी अशा अर्जावर त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित मुदतीत सकारात्मक प्रतिसाद देवून, यापूढे भविष्यात विहित मुदतीत माहिती देण्याबाबत सतर्क राहावे, अशा सूचना त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहेत.

प्रसंगावशात् असे आढळून आले आहे की, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाने एखादे विकास काम किंवा एखादे विकास योजना राबविण्यासाठी सुरुवात केल्यानंतर जनसामान्याच्या मनामध्ये या योजने संबंधी कुतूहल वाढत जाते व ते संबंधित प्राधिकरणाकडे माहिती अधिकार कायद्याखाली वेगवेगळया प्रकारची माहिती मागवित असतात. प्रत्येकवेळी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली व आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध नाही, अशा प्रकारचे कारण सांगून अंतिमतः जनसामान्यापर्यंत त्यांना आवश्यक ती माहिती मिळत नाही अथवा

पोंहचण्यास विलंब लागतो. तेंव्हा असे प्रकार टाळण्याच्या दृष्टीने जिल्हापरिषदे सारख्या सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांच्याकडे चालू असलेल्या विविध योजने संदर्भात या प्रकरणी अपिलार्थीने विचारलेल्या मुद्यांवरील माहती स्वयंप्रेरणेने घोषित करण्याच्या सूचना सचिव, (ग्रामविकास) मंत्रालय, मुंबई यांनी प्रस्त्त करावयात व अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून १ महिन्याचे आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१८. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

१९. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळअर्जा व्दारे मागणी केलेली माहिती, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत, विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर सात दिवसांच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक- ३१-०८-२००७.

( वि.बा.बोरगे)
राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

२७. श्री.शेख नईम शेख लाल, जिल्हाध्यक्ष,समाजवादी पार्टी, हिंगोली, नवीन पाण्याच्या टाकीजवळ पलटन हिंगोली.

२८. जनमाहिती अधिकारी तथा गटप्रमूख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हापरिषद, हिंगोली, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२९. जनअपिलीय अधिकारी तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जालना, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३०. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३१. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

३२. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४७५

निर्णय दिनांक ३१-०८-२००७

श्री. गोविंद शिवप्रसाद बजाज, : अपिलार्थी

निवासी संपादक, दैनिक भूमिपुत्र,

डॉ. बजाज हॉस्पिटल, वजिराबाद,

नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,

नांदेड

(सहाय्यक प्रशासन अधिकारी)

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक कृषि अधिकारी,

नांदेड

(कृषि उपसंचालक)

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोविंद शिवप्रसाद बजाज, नांदेड हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा (सहाय्यक प्रशासन अधिकारी) श्री. नथुजी बाळकृष्ण कोलपवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक कृषि अधिकारी (कृषि उपसंचालक) श्री. आण्णाराव राजकुमार हसनाबादे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-०४-२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड जिल्ह्यातील २००० ते २००५ या कालावधीतील “ नदी खोरे पाणलोट विकास प्रकल्प, आदिवासी विकास उपाययोजना अंतर्गत पाणलोट विकास, इत्यादी बाबतची वर्षनिहाय, गावनिहाय, पाणलोट कामनिहाय, मंजूर रक्कम

व खर्च रक्कम, नदी खोरे पाणलोट विकास प्रकल्पातील प्रवेशानुकूल कृती कार्यक्रम, प्रशिक्षण, सामुहिक संघटन याबाबतची पाणलोट समिती गावनिहाय व पाणलोट समितीने केलेल्या गावनिहाय व बाबनिहाय खर्च " ही माहिती मागविली होती.

अपिलार्थीने त्यांना अपेक्षीत असलेली माहिती एका प्रपत्राच्या स्वरुपात मागितली होती.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागितलेली माहिती जिल्ह्यातील सर्व तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी व त्यांच्या कार्यालयातील संबंधीत शाखेशी संबंधीत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०४-२००६ रोजी सर्व तालुका कृषि अधिकारी व अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील संबंधीत शाखा प्रमुखास ही माहिती अपिलार्थीस परस्पर देण्यास सुचविले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुचनेनुसार नांदेड जिल्ह्यातील एकूण १६ तालुका कृषि अधिका-यांपैकी ९ तालुका कृषि अधिका-यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील विहित केलेल्या कालावधीमध्ये माहिती दिली. लोहा, कंधार, नायगाव व मुखेड तालुका कृषि अधिकारी यांनी अनुक्रमे २, ४, १३ व १६ दिवस इतक्या विलंबाने अपिलार्थीस माहिती पुरविली तर माहूर, किनवट व भोकर या तालुका कृषि अधिका-यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही.

अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलाची सुनावणी न घेऊन त्यांच्या मनात

माहिती अधिकार अधिनियमाबद्दल असलेला अनादर व त्यांच्यातील बेपर्वाई वृत्ती स्पष्टपणे सिध्द केली आहे. सचिव (कृषि) यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या या वृत्तीची यथायोग्य-रित्या नोंद घ्यावी असे त्यांना या प्रकरणी सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे त्यांची मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेऊन, दिनांक १२-०९-२००६ नुसार व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी त्यांना अद्यापपावेतो २३ पाणलोट क्षेत्राची माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी गैरहजर होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस जिल्हास्तरावरील माहिती दिनांक २४-०५-२००६ रोजी व्यक्तिशः दिली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याबद्दल अपिलार्थीची पोच पावती त्यांनी आयोगास दाखविली. अपिलार्थीस अपेक्षीत असलेल्या तालुका स्तरावरील माहिती संदर्भात त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थीस ९ जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत माहिती दिली असून ४ जन माहिती अधिकारी (लोहा, कंधार, नायगाव व मुखेड) यांनी अपिलार्थीस विहित मुदतीतपेक्षा थोड्या उशिराने माहिती दिली आहे तर माहूर, किनवट व भोकर येथील जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचे त्यांनी आज सुनावधीमध्ये कबूल केले आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जिल्हास्तरीय कार्यालयातील जन माहिती अधिका-याकडे माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती त्यांच्या अधिनस्त असलेल्या, व त्यांच्याच प्राधिकरणाचा भाग असलेल्या इतर कार्यालयाकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे, त्यामुळे त्यांच्याकडून ती गोळा करुन घेऊन अपिलार्थीने अर्ज केल्यापासून ३० दिवसाच्या आत त्यांना ही एकत्रित माहिती देणे हे जन माहिती अधिकारी यांचेवर बंधनकारक होते. तथापि त्यांनी

तसे केलेले आढळून येत नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेली माहिती ३ तालुका कृषि अधिका-यांनी अद्याप पर्यत म्हणजेच अपिलार्थीने मागणी केल्यापासून सव्वा वर्षाचा कालावधी लोटला गेल्यानंतरही दिलेली नाही हेही आज सुनावणीमध्ये आढळून आले आहे. संबंधीत जन माहिती अधिका-यांची ही कृती म्हणजे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या मूळावर घाव घालण्यासारखी आहे असे आयोगास वाटते. ज्या ३ जन माहिती अधिका-यांना अपिलार्थीस माहिती देणे अद्यापही शक्य झाले नाही त्यांचे आयोगास सखेद आश्चर्य वाटते, त्यांनी अपिलार्थीस यांना विहित मुदतीत माहिती न देऊन केवळ आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभावच या कृतीतून स्पष्ट केला नाही तर या कायद्याप्रती त्यांच्या मनात असलेला अनादर त्यांनी दर्शविला आहे. ज्या ४ कृषि अधिका-यांकडून अपिलार्थीस विहित मुदतीपेक्षा विलंबाने माहिती दिली आहे त्या ४ कृषि अधिका-यांना (लोहा, कंधार, नायगाव व मुखेड) आयोगातर्फे त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्या-पोटी लावलेल्या विलंबाबाबत ताकीद देण्यात येत असून या ताकीदीची नोंद अधीक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या सेवापुस्तकात घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्याच बरोबर तालुका कृषि अधिकारी माहूर, किनवट व भोकर यांनी सव्वा वर्ष इतका कालावधी ओलांडून गेल्यानंरही ही माहिती अपिलार्थीस न देण्याची त्यांची कृती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील २० (२) च्या तरतुदीनुसार निश्चितपणे त्यांचेवर प्रशासकीय कारवाईची शिफारस करण्यास पात्र ठरते तेव्हा सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी तालुका कृषि अधिकारी, माहूर, किनवट व भोकर यांच्यावर प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल आयोगास ३ महिन्याच्या आत सादर करावा. त्याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिका-याकडे ज्या तालुक्यासंदर्भात माहिती मागविली आहे त्या तालुक्यातील माहिती, अधीक्षक कृषि अधिकारी यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी, यांनी स्वतः एकत्र करावी व ती अपिलार्थीस हे

आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असेही जन माहिती अधिकारी यांना पुढे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे व खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील मान्य.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (कृषि) यांनी तालुका कृषि अधिकारी माहूर,किनवट व भोकर यांच्यावर त्यांनी याप्रकरणी त्यांच्या कार्यशैलीमध्ये दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचे वर प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन ३ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोविंद शिवप्रसाद बजाज, निवासी संपादक, दैनिक भूमिपुत्र, डॉ. बजाज

हॉस्पिटल, वजिराबाद, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड (सहाय्यक प्रशासन अधिकारी)यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड (कृषि उपसंचालक) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४७६

निर्णय दिनांक ३१-०८-२००७

श्री. अशोक सर्जेराव देशमुख, १५, : अपिलार्थी

स्वानंदनगर, न्यू श्रेयनगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहाय्यक संचालक, (उप अभियंता),

नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा आयुक्त, (सहाय्यक संचालक)

महानगरपालिका, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अशोक सर्जेराव देशमुख, औरंगाबाद (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका श्री. विष्णू गोपाळ वझे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना महानगरपालिका श्री. रविंद्र दत्तात्रय जोशी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-१२-२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

अ) “ लता अनंत पुराणीक/शुभांगी स. वैद्य गट नं. ७ नक्षत्रवाडी, सुचित नकाशा मंजुरीची सत्यप्रत, (कालावधी ९३-९४)

ब) लता पुराणीक व इतर जी.पी.ए. नंदकिशोर निकम अंतीम रेखांकन मंजुरीची सत्यप्रत, (कालावधी २००४-२००५)

क) मोजणी नकाशा गट नं. ७ क्र. मोर/एबीडी/२३८८/८२ ची सत्यप्रत. (कालावधी १९८२)”

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडील दिनांक ०८-०१-२००७ चे पत्रान्वये अपिलार्थीस असे कळविले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या रेखांकनाच्या अंतीम मंजुरीच्या नकाशाची सत्यप्रत त्यांच्या कार्यालयाकडे २५ रुपये इतके शुल्क भरल्यास ती साक्षांकीत करुन दिली जाते सबब त्या अनुषगाने अपिलार्थी यांनी कार्यवाही करावी, तर मोजणी नकाशा संदर्भात तालुका निरीक्षक भूमी अभिलेख औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडून तो उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी वरील प्रमाणे सूचना दिल्यानंतर अपिलार्थी यांनी त्याप्रमाणे तात्पुरत्या व अंतीम मंजूर रेखांकनाच्या सत्यप्रती साक्षांकीत करुन घेण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्या दोन प्रती एका पत्राव्दारे देऊन, त्याकरिता लागणारे आवश्यक शुल्क रुपये ५० हे त्यांच्या कार्यालयात दिनांक १९-०१-२००७ रोजी भरले व या रेखांकनाच्या प्रती साक्षांकीत करुन देण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली. अपिलार्थीने पैसे भरलेल्या पावतीचा क्रमांक ३८७६ दिनांक १९-०१-२००७ असा आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे कारवाई करुन देखील अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक १२-०२-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जानंतर त्यांनी दिनांक १७-०२-२००७ रोजी आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत – त्यांच्याकडे त्यासंबंधी परत स्मरणपत्र दिले. या स्मरणपत्रामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडनीय कारवाई करण्याची आयुक्त महानगरपालिका यांना विनंती केली आहे. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०२-२००७ रोजी प्रथम सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थी यांची विनंती मान्य करुन, सदर माहिती त्यांच्याकडे

तयार असल्याने अपिलार्थीस त्याच दिवशी जन अपिलीय अधिकारी यांच्या स्वीय सहाय्यकाच्या कार्यालयातून दुपारी ०४ वाजेपर्यंत माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात केलेल्या कारवाईचा अहवाल त्यांच्याकडे उलट टपाली मागविला. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थी हे आयुक्तांच्या स्वीय सहाय्यकाच्या कार्यालयामध्ये उपस्थित राहिले असता संबंधितातानी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा "ब" शी संबंधीत इतकीच माहिती अपिलार्थीस ते देऊ शकतात व उर्वरीत माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस सांगितले. यावेळी त्यांनी अपिलार्थीस फक्त जन अपिलीय अधिकारी यांच्या त्या दिवशी सुनावणीमध्ये पारित केलेल्या आदेशाची प्रत दिली. अपिलार्थीस अखेर त्या दिवशी त्यांना मूळतः अपेक्षीत असलेली माहिती मिळाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय होऊन व आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुन देखील अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने त्यांनी व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३०-३-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) नुसार व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी आपली माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांनी आवश्यक ती फी भरुनही त्यांना पाहिजे असलेल्या कागदपत्राच्या नकला त्यांना विहित मुदतीत मिळाल्या नाहीत. त्यांना आवश्यक ती माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांचे वरिष्ठ -- आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका यांनी देखील जन माहिती अधिकारी यांना त्याच दिवशी माहिती देण्याचे सूचित करुनही अपिलार्थीस माहिती मिळाली नाही. अपिलार्थीने एकूण ३ मुद्दयावर माहिती मागविली असता अपिलार्थीस यापैकी एका मुद्दयावरील माहिती पोस्टाने नंतर घरी पाठविली.

या सर्व प्रकारामुळे व्यथित होऊन अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत व्दितीय अपील करणे भाग पडले. या प्रकरणी त्यांना बराच मनःस्ताप सहन करावा लागल्याने संबंधीत जन माहिती अधिका-यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दंडनीय कारवाई करावी अशी मागणीही त्यांनी पुढे केली.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, अपिलार्थीने एकूण ३ मुद्दयावर माहिती मागविली होती त्यापैकी मुद्दा "क" हा त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नसून त्यांनी त्याप्रमाणे अपिलार्थीला त्यांच्याकडील दिनांक ०८-०१-२००७ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्याच बरोबर अपिलार्थीस प्रथम सुनावणीच्या वेळी जी माहिती देणे आवश्यक होते ती माहिती आज रोजी उपलब्ध असून ते ती माहिती आज अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दाखविली असता अपिलार्थी यांनी हीच माहिती त्यांना त्यांच्या मूळ अर्जाव्दारे अपेक्षीत असल्याचे आयोगासमोर कबूल केले. अपिलार्थीस ही माहिती, अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क भरुनही ६ महिने इतका कालावधी व्यापगत होऊन इतक्या विलंबाने का देण्यात आली या प्रश्नावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उत्तर नाही.

या प्रकरणात असे दिसून आले आहे की, अपिलार्थीस हवी असलेली माहिती त्यांनी आवश्यक ते शुल्क भरुनही त्यांना ६ महिने इतका कालावधी गेल्यानंतरही मिळू शकली नाही. अपिलार्थीस ही माहिती हवी असल्याचे त्यांनी जन माहिती अधिका-यांना दिनांक २०-१२-२००६ रोजी कळविले होते. सर्वसाधारण परिस्थितीत त्यांना ही माहिती उशिरात उशिरा दिनांक १९-०१-२००७ पर्यत मिळणे अपेक्षीत होते तथापि अपिलार्थीने दिनांक १९-०१-२००७ रोजी ती माहिती देण्यापोटी लागणा-या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी तदनंतर तात्काळ पुरविणे माहिती

अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अभिप्रेत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता त्यांना जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिलेले नकाशे साक्षांकित करुन देणे इतकेच काम बाकी होते. अपिलार्थीने माहितीपोटी लागणारे आवश्यक ते शुल्क १९ जानेवारी २००७ रोजी भरुन आज सुनावणीच्या दिवशी म्हणजेच दिनांक ३१-०८-२००७ रोजी अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे तयार आहे असे सांगणे म्हणजेच जन माहिती अधिकारी यांच्या निष्क्रीयतेचा कळस असल्याचे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी मनपा अधिका-यांनी आपली — नुसती निष्क्रीयताच दर्शविली नाही तर त्यांच्यातील निगरगट्टपणा त्यांच्या या कृतीने दर्शविला आहे कारण स्वतः आयुक्तांनी देखील दिनांक १७-०२-२००७ रोजीच त्यांच्या स्वीय सहाय्यकाचे कार्यालयातून ही माहिती दुपारी ०४ वाजेपर्यत घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित करुन देखील अपिलार्थीस ही माहिती त्या दिवशी प्राप्त झाली नाही. यावरुन खुद्द आयुक्तांनी दिलेल्या सूचनांचे वेळीच अनुपालन करण्याची कर्तव्य परायणता देखील जन माहिती अधिकारी यांनी दर्शविली नसल्याचे या प्रकरणी सिध्द होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यास लावलेल्या विलंबाबद्दल आज त्यांच्याकडे कोणतेही समर्थन नाही. मनपा कार्यालयात या ना त्या निमित्ताने सामान्य नागरिकांचे ब-याच वेळा काम पडते. सामान्य नागरिकांना मनपाचे कर्मचारी व अधिकारी कशा त-हेने वागणूक देत असतील याची कल्पना या प्रकरणावरुन सर्वसामान्यांना यावी. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणातील वर्तणूकीमध्ये जनताभिमूख प्रशासनाचा अभाव आयोगास स्पष्टपणे जावणत आहे. त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती, अपिलार्थीने शुक्ल भरुनही विहित मुदतीत न दिल्यामुळे ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या कारवाईस निश्चितपणे पात्र ठरत आहेत असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचनात स्पष्ट केलेल्या कारणामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी जो असमर्थनीय विलंब लावला त्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे या प्रकरणी रुपये २५००० शास्ती लावण्यात येत असून सदर शास्तीची रक्कम हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत खालील शिर्षाखाली जिल्हा कोषागारात जमा करावी.

“ ००७० इतर प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम,

१८ माहितीचा अधिकार, ००७०-००६-१ ”

व तसे केल्याचा अहवाल आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ४५ दिवसाचे आत आयोगास सादर करावा.

“जन माहिती अधिकारी” यांच्या व्याख्येमध्ये त्यांना अपिलार्थीस ही माहिती देण्याप्रित्यर्थ सहाय्य करणारे इतर सर्व कर्मचारी व अधिकारी यांचा समावेश होतो आहे. सदर शास्ती या सर्वांवर मिळून लावण्यात येत आहे. या शास्तीची कर्मचारीनिहाय रक्कम आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी ठरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे व खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील मान्य.

२. अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जात मागणी केल्याप्रमाणे हवी असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी एक दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी जो असमर्थनीय विलंब लावला त्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे या प्रकरणी रुपये २५००० शास्ती लावण्यात येत असून सदर शास्तीची रक्कम हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत खालील शिर्षाखाली जिल्हा कोषागारात जमा करावी --

" ००७० इतर प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम,

१८ माहितीचा अधिकार, ००७०-००६-१ "

व सर्व संबंधीतांनी शास्ती भरल्याचा अहवाल आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ४५ दिवसाचे आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३० ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोक सर्जेराव देशमुख, १५, स्वानंदनगर, न्यू श्रेयनगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, (उप अभियंता), नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, (सहाय्यक संचालक)महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४७९

निर्णय दिनांक ३१-०८-२००७

श्री. दासरे लक्ष्मण गणपतराव, : अपिलार्थी
हेंगणे निवास, शिवनगर,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण उप संचालक,
लातूर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दासरे लक्ष्मण गणपतराव लातूर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), यांचे प्रतिनिधी उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री. डुरे लव माधवराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक श्री. अरुण ठाकरे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०९-२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुख्याध्यापक अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालय लातूर यांच्यावर शास्ती लावण्याच्या संदर्भात केलेल्या कारवाईबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती खालील प्रमाणे होती.

> " सदरहू मागितलेली काही मुद्दयाची माहिती मा. मुख्याध्यापक यांनी दिनांक १६-०८-२००६ रोजी दिली. जी काही माहिती दिली ती माहितीची मागणी केली त्या दिवसापासून साधारणपणे ७ महिने उशिरा दिली. माहितीच्या मागितलेल्या कागदपत्रा-च्या विलंबाबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन मा. शिक्षणाधिकारी यांनी लेखी दिल्याने मी दिनांक १६-०८-२००६ रोजी आमरण उपोषण सोडले तेव्हा मा. शिक्षणाधिकारी यांनी आपल्या लेखी आश्वासनाप्रमाणे सदरहू मा. मुख्याध्यापक यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसास रुपये २५० (दोनशे पन्नास) प्रमाणे शास्ती करावी व यास संदर्भातील केलेल्या कार्यवाहीची मला माहिती द्यावी ही विनंती. "
>
> सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-१०-२००६ रोजीच्या त्यांच्या अपील अर्जान्वये प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागद पत्रावरुन आढळून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या प्रतिसादा-मुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०२-२००७ नुसार व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी मुख्याध्यापक अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालय लातूर यांना शास्ती लावण्यास शिक्षणाधिका-यांने विलंब केल्याबाबत असा -- माहितीचा विषय दिला आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडला गेला की, त्यांनी मुख्याध्यापक अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालय लातूर यांच्याकडे काही माहिती मागितली असता ती माहिती त्यांना ७ महिने उशिराने व अर्धवट प्राप्त झाली यावर शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी संबंधीत मुख्याध्यापकास कोणताही दंड लावला नाही. सदर मुख्याध्यापकावर दंड लावावा अशी अपिलार्थी यांनी शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना दिनांक १६-१०-२००६ च्या पत्राने विनंती केली होती. त्या अर्जावर काय कारवाई झाली आहे याची अपिलार्थीस माहिती हवी आहे. अपिलार्थीच्या या दिनांक १६-१०-२००६ च्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-११-२००६ रोजी उत्तर दिले असून त्यामध्ये त्यांच्या कार्यालयाने या प्रकरणी दिनांक ०८-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन दिलेला निर्णय (या प्रकरणी) कायम ठेवला असून या निर्णयानुसार शास्ती लावण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले आहे किंवा कसे हे अपिलार्थी

सांगू शकले नाहीत. सदर पत्र अपिलार्थीस त्यांच्या मुख्याध्यापकामार्फत पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीस जर दिनांक १३-११-२००६ च्या पत्राची प्रत मिळाली नसेल तर जन माहिती अधिकारी यांनी ती त्वरीत पुरवावी असे आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी मुख्याध्यापकास (जन माहिती अधिका-यास) शास्ती लावण्याचे अधिकार माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीमध्ये शिक्षणाधिका-यास नसल्याने, मुख्याध्यापक अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालय, लातूर यांचेवर शास्तीची त्यांना कारवाई करता येणार नाही हे उघड आहे त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जावर पुढे काहीही कारवाई झाली नसणार असेही अनुमान काढता येईल तथापि मुख्याध्यापक अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालय लातूर यांनी अपिलार्थीस उशिरा माहिती दिल्याच्या संदर्भात, शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी, त्यांच्या पातळीवर हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याचे आत चौकशी करावी व या प्रकरणी त्यांच्याच पातळीवर त्यांनी निर्णय घेऊन तो अपिलार्थीस त्वरित कळवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१ ऑगस्ट २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दासरे लक्ष्मण गणपतराव, हेंगणे निवास, शिवनगर, लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ रा.मा.आ./ अपिल/सीआर-४८०
निर्णय दिनांक ३१-०८-२००७.

१. श्री.व्यंकटेश ईलेक्ट्रीक कंपनी तर्फे .. अपिलार्थी.
मुखत्यारनामा आम तथा व्यवस्थापक,
श्री.व्दारकादास गोविंद प्रसाद बजाज
रा.राहुल निवास, जुना मोंढा,
मु.पो.ता. गंगाखेड,
जिल्हा-परभणी- ४३१५१४.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
जिल्हापरिषद, हिंगोली.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हापरिषद, हिंगोली.

## <u>विवेचन</u>

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ३१-०८-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. व्दारकादास गोविंदप्रसाद बजाज, (येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हापरिषद, हिंगोली, श्री.प्रभाकर मुरलीधर दिक्षीत (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) व जनअपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, हिंगोली यांचे वतीने अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.उत्तमराव सवाईराम चव्हाण (येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचे दिनांक- ०६-०२-२००६ च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या कंपनीच्या नावाने जनमाहिती अधिकारी यांच्या खात्यामार्फत केलेल्या व्यवहारा संदर्भात सन २००४-२००५ या कालावधीतील एकूण एकूण ९ मुद्यावर माहिती मागविली होती. या माहितीमध्ये अर्जदाराच्या कंपनीच्या नावाने सहा कामाच्या निवीदा कोणी दाखल केल्या व कोणती कामे केली याचा तपशील, या कामाच्या बीलाच्या रक्कमेचा चेक कोणास व किती रक्कमेचा दिला त्याची संपूर्ण माहिती, ही कामे ज्या अधिका-याच्या देखरेखीखाली करण्यात आली त्याची माहिती, ज्या शाखा अभियंत्याने सदरील कामाचे मार्कआऊट कोणास दिले याची संपुर्ण माहिती, सहा कामे ज्या कंपन्यानी केली त्याची निवीदा नक्कल, या कामाचे चेक कोणी व कोणत्या अकांऊटमध्ये वठविले त्याचा तपशील, दिनांक- २३-०९-२००५ रोजी अर्जदाराने मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी अर्थ विभाग, जिल्हापरिषद हिंगोली यांना कुरीयरने पाठविलेल्या अर्जाची नक्कल, चेक

स्विकारणा-या व्यक्तिचे नाव व अर्जदाराच्या कंपनीच्या नावाने ज्यांनी काम केले त्यांचा तपशील - या मुद्याचा समावेश होता.
अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- २७-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. यामध्ये अपिलार्थीने मागितलेल्या एकूण ९ मुद्यांवरील माहितीपैकी ५ मुद्दे ( मुद्दा क्र.१,३,४,५ व ९) बांधकाम विभागाशी सबंधित असल्याचे दर्शवून उरलेल्या ४ ( मुद्दे क्र.२,६,७ व ५ ) मुद्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये काही माहिती दिल्याचे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे या पत्रान्वये दिलेल्या माहितीचे पथकरण केले असता, त्यांनी अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक-२ वर अंशतः माहिती दिली. मुद्दा क्रमांक-६ व ७ वर माहिती दिलेली नाही व मुद्दा क्रमांक ८ वर माहिती दिल्याचे दिसून येते. यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरविल्याचे सिध्द होते. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार त्यांच्याकडील दिनांक- २७-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपील केले. यामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिका-यास शास्ती लावण्याची प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे विनंती केली होती.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही किंवा अपिलार्थीच्या अपील अर्जास अन्य मार्गाने सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. जनअपिलीय अधिकारी यांनी आपल्या या

कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव दर्शविला आहे. त्यांच्या कार्यशैलीमधील या कर्तव्यपरायणतेच्या अभावाची दखल सचिव, (ग्रामविकास) मंत्रालय, मुंबई/ विभागीय आयुक्त (महसूल) औरंगाबाद  यांनी यथा योग्य घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारचा प्रतिसाद मिळाल्यामूळे व्यथीत होवून, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे  दिनांक- १२-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये  अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलाचा निर्णय दिला नाही हे कारण दर्शवून आपल्या मूळमाहितीची मागणी त्यांनी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, असे दिसून येते की,  अपिलार्थी  हे श्री.व्यंकटेश ईलेक्ट्रीक कंपनी तर्फे मुखत्यार आम तथा व्यवस्थापक, म्हणून कार्यरत असून हिंगोली जिल्हापरिषदेमध्ये त्यांच्या कंपनीच्या नावावर जिल्हापरिषदेच्या कर्मचा-यांनी व अधिका-यांनी मिळून रुपये २,९५,६५०/- इतक्या रक्कमेचा अपहार केला आहे. प्रश्नाधीन सहा कामे ही अपिलार्थी यांनी केली नसून  जिल्हापरिषदेच्या कर्मचा-यांनी व अधिका-यांनी त्यांच्या कंपनीच्या नावावर ही कामे झाल्याचे दाखवून बीले काढली व त्या प्रित्यर्थ मिळालेले चेक  सुंदरलाल  सावजी को-ऑ.बँक, शाखा शिवाजीनगर, परभणी येथे जमा करुन नंतर त्या खात्यातून पूर्ण रक्कम त्यांनी काढून घेतली व अशा प्रकारे रक्कमेचा अपहार केला.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की - सदर कामाच्या बीलामधील टीडीएस व टॅक्सची प्रमाणपत्रे जिल्हापरिषदेच्या अर्थ विभागाकडून त्यांना दिनांक ३०-०७-२००५ रोजी प्राप्त झाल्यानंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला. तदनंतर त्यांनी या व्यवहाराच्या सुरु केलेल्या चौकशीमध्ये त्यांना काही कागदपत्राची आवश्यकता वाटल्यावरुन त्यांनी संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्याकडे हा माहितीचा अर्ज केला. जनमाहिती अधिकारी यांच्याशी वारंवार संपर्क साधून देखील त्यांना ही माहिती अद्यापही प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी आयोगासमोर सांगितले व तसेच त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले व त्याचबरोबर संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली.

जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे युक्तिवाद मांडतांना त्यांनी सांगितले की, ते आता नुकतेच रुजू झाले असून विचाराधीन प्रकरण तत्कालीन जनमाहिती अधिकारी याच्या कार्यकाळातील म्हणजे (श्री.मुस्तनसिर हुसेन) यांच्या कार्यकाळातील आहे. त्यांनी जिल्हापरिषद हिंगोली येथील मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा पदाचा कार्यभार दिनांक ०५-०९-२००६ रोजी घेतल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक असणारी माहिती त्यांनी तयार केली. त्यांच्या नजरेस अपिलार्थीचे प्रकरण माहे जूलै, २००७ प्रथम रोजी आले. हे प्रकरण नजरेस आल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस लागणारी सर्व माहिती तयार करुन ठेवली आहे व ती तयार केलेली माहिती कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठविली आहे. वस्तुतः जनमाहिती अधिकारी यांना जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हापरिषद प्राधिकरणामध्ये स्वतंत्र अस्तित्व असतांना त्यांनी ही माहिती अपिलार्थीस त्यांचे विनंतीप्रमाणे सरळ द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी तसे न करता दुस-या प्राधिकरणाकडे - कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठविली व कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे अपेक्षिले. त्यांची ही कृती सर्वस्वी चुकीची आहे.

त्यांना एकदा जिल्हापरिषद प्राधिकरणाने स्वतंत्र जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित केल्यानंतर त्यांच्याकडे आलेल्या माहिती अधिकार कायद्यातील कोणताही अर्ज त्यांनी स्वतंत्रपणे हाताळावयास हवा होता. तथापि त्यांनी तसे केले नाही. आता ते अपिलार्थीस आवश्यक असलेली, त्यांच्या शाखेशी संबंधित एकूण ४ मुद्यावरील माहिती आजही देण्यासाठी तयार आहेत. त्यांनी अपिलार्थीस देण्याकरिता केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी सुसंगत अशी दिसून येते. सदर माहिती अपिलार्थीस दाखविली असता या माहितीने त्यांना अपेक्षित माहिती मिळून त्यांचा उद्देश साध्य होईल, असे त्यांनी आयोगा पूढे कबूल केले आहे.

दोन्हीही बाजूचा युक्तीवाद व घडलेला घटनाक्रम पहाता, हे प्रकरण मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, हिंगोली यांनी अद्यापपर्यंत फारसे गांभीर्याने घेतले नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या अर्जाची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००७ रोजी ( प्रकरण क्रमांक- २००७/३८१ ) मध्ये सुनावणी झाली असता त्या निकालपत्रामध्ये या प्रकरणाशी सर्व संबंधित बाबींचा सविस्तर परार्मश घेतलेला आहे. त्यामूळे सदर परामर्शाची पुनरावृत्ती करणे येथे फारसे प्रस्तुत वाटत नाही. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत जरी माहिती दिली असेल तरी त्यांनी अपिलार्थीच्या सर्व मुद्यांना सुसंगत उत्तरे न देता एकूण ४ मुद्यापैकी एका मुद्यावर अंशतः माहिती दिली. दोन मुद्यांवर माहिती दिली नाही व एका मुद्यावर पूर्ण माहिती दिली आहे. हे पहाता, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. आज जे जनमाहिती अधिकारी कार्यरत आहेत. ते अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती देण्यास आजमितीस तयार आहेत परंतू तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना ती माहिती अपिलार्थीस देणे कोणत्याही परिस्थितीत अशक्य नव्हते. त्याच बरोबर या प्रकरणात

तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, हिगोली यांनी कोणत्याही प्रकारे चौकशी करण्या संदर्भात अथवा अपिलार्थीच्या अपीलावर निर्णय न देवून आपले कर्तव्य बजावण्यात जी उदासिनता दाखविली आहे ती राज्याच्या प्रशासनास निश्चीतपणे भूषणावह नाही, असे आयोगास वाटते. त्यांनी दाखविलेल्या या प्रकरणातील त्यांच्या कार्यपध्दतीची यथायोग्य नोंद सचिव, (ग्रामविकास) मंत्रालय,मुंबई / विभागीय आयुक्त (महसूल) यांनी घेतल्यास अपिलार्थीस थोडयाफार प्रमाणात न्याय मिळू शकेल, असे आयोगास वाटते.

उपरोक्त विवेचनावरुन असे आदेशित करण्यात येते की,

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती साक्षांकित करुन हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

३. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याबद्दल, काही माहिती अपिलार्थी पासून दडविल्याबद्दल त्यांच्यावर सचिव (वित्त) लेखा व कोषागारे यांनी प्रचलित सेवा नियमानूसार यथा योग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास आपला अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक- ३१-०८- २००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.व्यंकटेश ईलेक्ट्रीक कंपनी तर्फे मुखत्यारनामा आम तथा व्यवस्थापक, श्री.व्दारकादास गोविंदप्रसाद बजाज, जुना मोंढा, गंगाखेड, जिल्हा-परभणी.

२ जनमाहिती अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हापरिषद, हिंगोली, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,हिंगोली, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त (महसूल) विभाग औरगाबाद यांना, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, (ग्रामविकास) मंत्रालय, मुंबई-३२, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव (वित्त) लेखा व कोषगारे, मंत्रालय, मुंबई-३२, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

८ निर्णय नस्ती.